नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २१७ * * नागपूर * | गुरुवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## ओम नमो देवेंद्राय !

आपल्या देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री म्हणून महायुतीच्या देवेंद्र फडणवीस यांचे नाव घोषित केलेले आहे. महायुतीला बहुमत मिळाले किंवा बहुमत मिळण्याची आशा असली. तर महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा अमित शहा यांनी करावी. याला तसे फार महत्त्व आहे. देवेंद्र फडणवीस 2014 ते 2019 अशी पूर्ण पाच वर्ष मुख्यमंत्री होते. एक वसंतराव नाईक सोडले, तर महाराष्ट्राला सलग पाच वर्षाची कालावधी पूर्ण करणारा मुख्यमंत्री लाभला नव्हता. वसंतराव नाईक यांचा काळ वेगळा होता. तेव्हा पक्षांतर्गत स्पर्धा असूनही मुख्यमंत्री पदावर अल्पसंख्यांक समाजाचे असलेले वसंतराव नाईक तीन वेळा शपथ घेते झालेले होते. 2019 सालीही भाजप आणि शिवसेना यांना बहुमत मिळाले होते. पण कुठेतरी बिनसले आणि देवेंद्रजींचे मुख्यमंत्रीपद घसरले ते घसरले. त्यानंतरच्या अडीच वर्षांच्या महाविकास आघाडीचा इतिहास सर्वज्ञात आहे. कधी नव्हे ते ठाकरेकुलोत्पन्न हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे कनिष्ठ चिरंजीव उद्धवराव मुख्यमंत्री पदावर आरूढ झाले. लगेच उद्धवरावांनी मंत्रिमंडळ बनवले आणि त्यात आपले 'खासम् खास' एकनाथ शिंदे यांना महत्त्वाची खाती देऊन टाकली. त्या महत्त्वाच्या खात्यांमध्ये अति महत्त्वाचे शहर नियोजन आणि विकास हे खाते सुद्धा दिले. आतापर्यंतच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी हे खाते विचार करून जाणीवपूर्वक आपल्याकडे ठेवले होते. मुंबई-पुण्यासारख्या शहरातील शहर नियोजन व विकास खाते ज्यांच्याकडे असते. तो माणूस देशातील सर्वाधिक शक्तीशाली मंत्री असतो. अडीच वर्षानंतर जेव्हा सुरत आणि गुवाहाटी प्रकरण झाले. तेव्हा उद्धवजींना आपली चूक कळली असावी. त्यानंतर सत्ता परिवर्तन होताना त्या परिवर्तनाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री बनतील. अशी अगदी दुपारपर्यंत आशा होती. त्यानंतर कुठून कुठे कशी कळ फिरली आणि त्यानंतर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदावर बसवून संपूर्ण सत्ता बहाल करण्यात आली. मग शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आले आणि शहर विकास आणि नियोजन विभाग तर त्यांच्याकडे होताच होता. आता निवडणुकीच्या ऐन तोंडावर उद्धवजींनी केलेली चूक मुख्यमंत्रीपदी शिंदे यांना घेऊन घोडचूक ठरली की काय? असे भारतीय जनता पक्षाला सध्या तरी वाटत आहे. कारण आता शिंदे सरकारचा घोडा अगदी भरधाव दौडत आहे. असे म्हणतात की, आता शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे आहे. पण दिल्लीवरून नरेंद्रजींचा खास आदेश आहे की, आता मात्र देवेंद्रजीच पाहिजे आहेत. 2014 ते 2019 या पाच वर्षात देवेंद्रजींनी अनेक कल्याणकारी योजना महाराष्ट्राला दिल्या. जनतेला मोलाची अशी वैद्यकीय सेवा सुद्धा दिली. पण त्यांच्या पदरी 2019 किंवा सत्तापालट झाल्यावर 2022 ला सुद्धा मुख्यमंत्री पदाची खुर्ची आली नाही. त्यानंतर सव्वा वर्षांच्या दोन चाकी गाडीवरून सरकार तीन चाकी गाडीवर आले आणि आता इतर दोन पक्षप्रमुखांच्या अपेक्षा इतक्या गगनभेदी झाल्या आहेत की, त्याबाबत काही बोलणे चुकीचे ठरेल. शिंदे यांना मुख्यमंत्री पद सोडायचे नाही आणि अजित पवार यांना तेच ते उपमुख्यमंत्री पद सोडून वरची पायरी गाठायची आहे. पण त्या गाडीचे खरे वारस सर्वाधिक जागा लढवणाऱ्या पक्षाचे सर्वमान्य नेते देवेंद्र फडणवीस हेच राहतील. हे आता भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठांनाही मान्य करावे लागत आहे. सध्याच्या परिस्थितीत देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाला महाराष्ट्रात तोड नाही. फक्त जात सोडली तर त्यांच्या समोर इतर सर्व बडेबडे नेते 'नवजात' वाटतात. यामुळेच आता प्रचंड यंत्रणा उभारून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आशीर्वाद घेऊन भारतीय जनता पक्ष प्रणित युतीला संधी मिळाली. तर देवेंद्रजी यांच्याशिवाय दुसरा पर्याय दिसत नाही. महाराष्ट्रात अजूनही अनेक ठिकाणी नियमित जलपूर्ती होत नाही. राष्ट्रीय महामार्ग सोडले तर इतर मार्गावरील बऱ्याचशा सडका अगदी बेहाल आहेत. त्यामुळेच दळणवळण म्हणजेच यातायात अतिशय कठीण झालेली आहे. राज्यात पर्यावरण बिघडत चाललेले आहे. हवेच्या प्रदूषणासह, ध्वनी प्रदूषणाच्या कर्कश्श मारामुळे कित्येकांचे कान बहिरे झालेले आहेत. येत्या काळात राजकीय दृष्ट्या पूर्वी केलेल्या घोषणांची परिपुर्ती करणे, गरजेचे झालेले आहे. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस हेच एकमात्र समस्या मुक्त महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकणारे मुख्यमंत्री ठरू शकतात. मतदार राजा आता कोणता कौल देतो. ते 23 तारखेला कळेल. त्यासोबतच युतीला वाटते की, आपल्यालाच सारे काही फळेल आणि त्याचे फळ देवेंद्र फडणवीस असतील अशी सर्वांनाच आशा वाटते.

आशामुखी अमरधन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## फडणवीस यांना अडकवण्याचे वाझे, परमबीरांचे प्रयत्न

### न्या. चांदीवाल यांचे गौप्यस्फोट ■ अनिल देशमुखांना क्लीनचीट नाहीच

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
राज्यात खळबळ उडवणाऱ्या शंभर कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात आता न्यायमूर्ती चांदीवाल यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनिल देशमुख यांना क्लीनचीट दिली नसल्याचे म्हटले आहे.



या प्रकरणात सचिन वाझे यांनी अजित पवार आणि शरद पवार या दोन राजकीय व्यक्तिमत्त्वांची नाव घेतली होती. मात्र ती नावे मी रेकॉर्डवर घेणार नाही, असे वाझेंना सांगितले. फडणवीस यांना गुंतवण्याचा देखील प्रयत्न वाझे आणि अनिल देशमुख यांनी केला. मात्र तेही मी रेकॉर्डवर घेतले नाही, असे न्या. चांदीवाल मुलाखतीत म्हणाले.

इतकच नाही तरी या प्रकरणातील पुरावे आयोगासमोर येऊ दिले नसल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर न्या. चांदीवाल यांनी दिलेल्या या मुलाखतीमुळे आता राज्यातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघेल.

देशमुख आणि वाझे यांच्याकडून या प्रकरणात देवेंद्र फडणवीस यांना अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे न्यायमूर्ती चांदीवाल म्हणाले. शपथपत्रात वाझे यांनी अजित पवार आणि शरद पवारांची नावे घेतली. मात्र, नाव घेण्यामागचे कारण ओळखून ती नावे मी रेकॉर्डवर घेतली नसल्याचे चांदीवाल यांनी म्हटले आहे. आयोगाच्या अहवालात क्लीनचीट असा शब्दप्रयोगच नाही. उलट योग्य साक्षी पुरावे मिळाले नाहीत, अशी टिप्पणी या अहवालात केली असल्याचे देखील न्या. चांदीवाल यांनी म्हटले आहे.


राज्यात गाजलेल्या या १०० कोटी वसूलीच्या प्रकरणातील वाझे, परमबीर सिंग आणि देशमुख हे एकमेकांना भेटायचे. त्यानंतर वाझे यांनी साक्ष फिरवली. 'तेरी भी चूप और मेरी भी चूप' असे सगळे सुरू होते. साक्ष पुराव्यासाठी जबरदस्ती करू शकत नाही. सत्य बाहेर येऊ नये यासाठी प्रयत्न झाले, अहवालामधील बाबी कोणत्याच सरकारच्या पचणी पडणार नसल्याचा दावा देखील न्या. चांदीवाल यांनी केला आहे.

सचिन वाझे आणि परमबीर सिंग यांच्याकडे पुरावे होते. मात्र त्यांनी ते दिले नसल्याचा उल्लेख आपण अहवालात केला आहे. अनिल देशमुख यांना क्लीनचीट आपण दिलेली नाही. असा शब्दच आपण अहवालात वापरलेला नाही. असे देखील त्यांनी स्पष्ट केले.




## १०० कोटींच्या वसुली प्रकरणात पवार, ठाकरेंचा हस्तक्षेप

१०० कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात न्यायमूर्ती चांदिवाल यांनी दिलेल्या माहितीला माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांनी दुजोरा दिला आहे. चांदिवाल योग्यच सांगत आहेत. लक्ष्मीकांत पाटील बदल्यांच्या प्रकरणात आणि वसूलीच्या प्रकरणात थेट सहभागी होते, असे परमबीर सिंग म्हणाले आहेत.



परमबीर सिंग म्हणाले की, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांच्या सांगण्यावरून लक्ष्मीकांत पाटील या प्रकरणात हस्तक्षेप करत होते. साक्षीदारांवर लक्ष्मीकांत पाटील दबाव आणत होते. आघाडी सरकार असताना अनिल देशमुख हे सातत्याने पोलिसांच्या बदल्या आणि नियुक्त्यांमध्ये ढवळाढवळ करत होते.

खंडणीची मागणी, पोलिसांच्या बदल्यांमध्ये हस्तक्षेप याचे सर्व पुरावे मी सीबीआय आणि ईडीला दिल्याचे सिंग म्हणाले.

माजी न्यायमूर्ती चांदिवाल यांनी केलेला खुलासा स्पष्ट करत आहे की आघाडी भ्रष्टाचारात संपूर्णतः बुडाली होती, असे सांगत आशिष शेलार यांनी सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.

## काँग्रेसमध्ये असताना खूप सोसावे लागले

### अशोक चव्हाण यांची खंत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
काँग्रेसमध्ये असताना १४ वर्षे आपल्याला खूप सोसावे लागले असल्याचे अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे.



सध्या माझ्यामागे चारीही बाजूने हल्ले होत आहेत. काँग्रेसचे सर्व नेते भोकर मध्ये तळ ठोकून आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री येथे येत आहेत.

काँग्रेसचे राष्ट्रीय नेते देखील याच मतदारसंघात आहेत. सर्व आमदार येथे तळ ठोकून आहेत. हे सर्व कशाकरता? सर्वांनी भोकरच का धरले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदींची आज मुंबईत सभा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, गुरुवारी राज्याच्या दौऱ्यावर येत असून ते दिवसभरात तीन सभा घेणार आहेत.
पंतप्रधान मोदी यांची पहिली सभा आज दुपारी १ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे होईल. त्यानंतर नवी मुंबईतील सेंट्रल पार्क खारघर येथे दुपारी ४ वाजता मोदींची दुसरी सभा पार पडेल. संध्याकाळी ६ वाजता दादर, शिवाजी पार्क येथे आयोजित सभेला संबोधित करतील. दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आज मंगळवेढा, पंढरपूरमी नळदुर्ग, तुळजापूर आणि इचलकरंजी येथे सभा होतील.

## कुलगाममध्ये चकमक

■ वृत्तसंस्था, कुलगाम, दि.१३ :
जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात बुधवारी दुपारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, यारीपोरा येथील बडीमार्ग येथे ही चकमक सुरू आहे.

मंगळवारीही कुपवाडा जिल्ह्यातील नागमार्ग भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. येथे दोन दहशतवादी लपून बसल्याचा संशय होता. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आणि मंगळवारी रात्री उशिरापर्यंत शोध घेतला, मात्र दहशतवादी सापडले नाहीत.

## वक्फ बोर्डाचा कायदा मंजूर करून घेणार

■ वृत्तसंस्था, परभणी, दि. १३ :
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची परभणी येथील जिंतूर येथे सभा पार पडली. यावेळी अमित शहा म्हणाले, जिंतूरवासियांना सांगायला आलोय. महाराष्ट्रातील सर्व विभागात जाऊन आलो. महाराष्ट्र विधानसभेचा निकाल पाहायचा आहे का? २३ तारखेला महाविकास आघाडीचा सुपडा साफ होणार व महाराष्ट्रात महायुतीचे सरकार बनणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. अमित शहा म्हणाले, उद्धव ठाकरे यांना सांगायला आलो आहे. आघाडी सरकारने काय केले याची लिस्ट घेऊन या,



पुढे बोलताना अमित शहा म्हणाले, जेवढा विरोध करायचा तेवढा करा. आम्ही डंके की चोट पे वक्फ बोर्डाचा कायदा मंजूर करून घेणार आहोत. सोनिया गांधींनी वीस वेळा राहुल नावाचे प्लेन निवडणुकीत लँड करण्याचा प्रयत्न केला. मात्र निवडणुकीत तुमचा राहुल नावाचे प्लेन क्रॅश होणार आहे, हे लक्षात ठेवा. हरियाणातही यांनी प्रयत्न केला, मात्र तिथेही आमचे सरकार आल्याचे ते म्हणाले.

## अजित पवारांचे घुमजाव?

■ वृत्तसंस्था
पुणे, दि. १३ :
2019 च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा भाजपसोबत जाण्याचा निर्णय झाला होता. त्यावेळी सत्तास्थापणेसाठी एका उद्योगपतीच्या बैठक झाली होती. त्या बैठकीत अमित शाह, देवेंद्र फडणवीस, शरद पवार साहेब, प्रफुल पटेल यासह गौतम अदानी उपस्थित होते, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला होता.



मात्र आता अजित पवार यांनी त्यांच्या विधानावरून घुमजाव केले आहे. अशी कोणतीही बैठक तसेच मध्यस्थी झाली नसल्याचे अजित पवार म्हणाले. अशी कोणतीही मध्यस्थी झाली नाही नसल्याचे सांगितले. त्यामुळे अजित पवारांनी 24 तासांच्या आत घुमजाव केले आहे.

## ३१ विधानसभेसह लोकसभेच्या १ जागेसाठी मतदान

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
झारखंडमधील पहिल्या टप्प्यातील 43 जागांवर तसेच 10 राज्यांच्या 31 विधानसभा जागांसाठी आणि केरळच्या वायनाड लोकसभा जागेसाठी बुधवारी सायंकाळी 5 वाजता मतदान संपले. तर, 23 नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.

पश्चिम बंगालमधील उत्तर 24 परगणा जिल्ह्यातील जगतदल भागात काही लोकांनी बॉम्बफेक केली आणि टीएमसी नेते अशोक साहू यांच्यावर गोळीबार केला. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. ते टीएमसीचे वॉर्ड अध्यक्ष राहिले आहेत.

राजस्थानमधील देवली-उनियारा मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोर आणि अपक्ष उमेदवार नरेश मीणा यांनी एसडीएम अमित चौधरी यांना थप्पड मारली. ते सामरावता मतदान केंद्रात जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न करत होते.

बिहारमधील तरारी विधानसभा जागेवर मतदानावरून दोन पक्षांमध्ये हाणामारी झाली. दोन गटात झालेल्या मारामारीत सहा जण जखमी झाले आहेत. एका तरुणाचे डोके फुटले. याठिकाणी पोलिसांना फ्लॅग मार्च काढावा लागला. अनेक केंद्रावर हिंसाचार झाल्याची माहिती आहे.

## फडणवीसांसह, शिंदे, आठवलेंच्या सामानाची तपासणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचार सभेसाठी काटोल येथे आले होते. त्यांचे हेलिकॉप्टर उतरताच निवडणूक अधिकाऱ्यांनी सामानाची तपासणी केली.

तिकडे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या बॅगची निवडणूक अधिकाऱ्यांनी तपासणी केली. रामदास आठवले पुणे येथे हेलिकॉप्टरने आले होते. त्यावेळी निवडणूक अधिकाऱ्यांकडून त्यांच्या हेलिकॉप्टरमधील बॅगांची तपासणी करण्यात आली. दरम्यान, आज पालघरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बॅगची देखील तपासणी झाली. अजित पवार यांच्या बॅगची तपासणी निवडणूक अधिकाऱ्यांनी केली.

## मराठा आरक्षणासाठी दोघांची आत्महत्या

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १३ :
मराठा आरक्षणासाठी वाकोद (ता.फुलंब्री) आणि सेलू (जि.परभणी) येथील दोन युवकांनी आत्महत्या केली. फुलंब्री तालुक्यात आतापर्यंत ६ युवकांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केली आहे.
वाकोद येथील कैलास छगन लहाने (४०) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सकाळी ६ वाजता त्यांचे लहान भाऊ दिगंबर लहाने शेतातून घरी आल्यावर हा प्रकार उघडकीस आला.

मृत कैलास लहाने यांच्या खिशात चिठ्ठी आढळली. यात मराठा समाजाला आरक्षण देण्यास सरकार टाळाटाळ करत आहे. मी कर्जबाजारी झालो आहे, त्यामुळे मी आत्महत्या करत आहे, असा मजकूर चिठ्ठीत नमूद केला आहे.

**सेलूत युवकाने घेतले विष**

सेलू येथे रवी बबनराव वटणे (३५) या युवकाने मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी विषारी द्रव प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना सकाळी ९ वाजेच्या सुमारास घडली. आत्महत्येपूर्वी त्याने चिठ्ठी लिहून ठेवली होती. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याच्याही मागे मोठा परिवार आहे.

## केवळ भांडवल करण्याची सवय

### फडणवीसांचे टीकास्त्र

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १३ :
उद्धवजींच्या आधी माझी बॅग तपासल्या गेली. सर्वांच्याच बॅग तपासल्या जात आहेत. मात्र, काही लोकांना प्रत्येक गोष्टीचे भांडवल करण्याची सवय असते. अधिकाऱ्यांचा अपमान करण्याचा अधिकार त्यांना कोणी दिलेला नाही,ह्वअशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर आज टीकास्त्र सोडले.



मूर्तिजापूर येथे प्रचार सभेसाठी आले असता देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंचा खरपूस शब्दात समाचार घेतला. वणी येथे प्रचार सभेसाठी आले असता उद्धव ठाकरे यांची निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी बॅग तपासणी केली गेली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या उद्धव ठाकरेंनी त्याची चित्रफित तयार करून तीव्र रोष व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या देखील बॅगा तपासा, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी दिले होते. त्याला आज देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले.

फडणवीस म्हणाले, माझी बॅग उद्धव ठाकरे यांच्या अगोदर तपासल्या गेली. त्याचा व्हिडिओ आपण सगळ्यांनी बघितला आहे. आजही मी येथे उतरलो, तर माझी बॅग तपासण्यात आली आहे. सगळ्यांच्या बॅगा तपासल्या जात आहेत. फक्त काही लोकांना प्रत्येक गोष्टीचे भांडवल करण्याची सवय असते. निवडणूक काळात पोलीस विभागाचे हे काम आहे.

## मला हलक्यात घेतल्याने टांगा पलटी

### शिंदेंचा टोला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पालघरमध्ये झालेल्या जाहीर सभेमध्ये जोरदार टोलेबाजी केली. हे दुतोंडी साप आहेत. त्यांनी जनाची नाही पण मनाची लाज ठेवावी. कोणी मायका लाल आला, तरी लाडकी बहीण योजना बंद पडू देणार नाही, असे सांगत मी पोकळ धमक्यांना घाबरत नाही, मला हलक्यात घेतल्यामुळे टांगा पलटी झाला, असा टोला शिंदे यांनी महाविकास आघाडीला लगावला आहे. तसेच विरोधकांचे सरकार येण्याचे सर्व दरवाजे बंद झालेत, असा दावा देखील त्यांनी केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज पालघरमध्ये जाहीर सभा पार पडली. यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांचा समाचार घेतला. सावत्र दृष्ट भावांनी माझ्या लाडक्या बहिणींचा अपमान केला आहे. लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी ते कोर्टामध्ये गेले होते. पण कोणी मायका लाल आला, तरी योजना बंद पडू देणार नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

आम्ही बेरोजगारांसाठी काय केले यावरून विरोधक बोंबाबोंब करत होते. पण २५ लाख रोजगार निर्मितीचा निर्णय आमच्या महायुती सरकारने घेतला. विरोधक निराश झाले आहेत, विरोधकांचे सरकार येण्याचे दरवाजे आता पूर्णपणे बंद झालेत, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या वीज बिल माफीपाठोपाठ आता १० कलमी कार्यक्रमात कर्जमाफीचा निर्णय घेतला. विरोधकांनी आमच्या कल्याणकारी योजनांबद्दल अपप्रचार चालवला. लवकर खात्यात जमा झालेले पैसे काढा नाहीतर सरकार काढून घेईल, असाही प्रचार केला. परंतु आमचे सरकार देणारे आहे, घेणारे नाही. कोणी कोर्टात जाऊ दे, कोणी कुठेही गेले तरी ही योजना बंद होऊ देणार नसल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.



महाविकास आघाडीने आमच्या योजना चोरून आपला वचननामा बनवत महिलांना प्रतिमाह ३ हजार रुपये देण्याचे जाहीर केले आहे. मग त्यासाठी पैसा कुठून आणणार? असा सवाल करत आम्ही तर योजनेचे ५ हप्ते वाटप करूनही दाखवले. मात्र अशा प्रकारे कॉपी करून कुणीही पास होऊ शकत नाही, अशा शब्दांत सीएम एकनाथ शिंदे यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

# अतिज्येष्ठ नागरिकांच्या मतदानाला सुरुवात

विधानसभेच्या निवडणुकीसाठी ८५ वर्षे वयावरील अतिज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांच्या मतदानाला आरंभ झाला असून अनेक मतदारांनी गृहमतदान केले आहे. या निवडणुकीमध्ये कुणीही मतदानापासून वंचित राहू नये यासाठी लोकसभा निवडणुकीप्रमाणेच मतकेंद्रापर्यंत पोचू शकत नाहीत अशा मतदारांना घरून मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली गेली आहे. यासाठी आधी नोंदणी करावी लागते. ४० टक्के अपंगत्व असलेले आणि ८५ वायवरील वृद्ध यांच्याकरिता १२ डी हा फॉर्म भरून दिल्यानंतर ही सुविधा प्रदान करण्यात येते. अर्थात इच्छुक



मतदारांनी विधानसभेची अधिसूचना जाहीर झाल्यावर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे १२ डी फॉर्म दिला असेल त्यांनाच या मतदानाचा लाभ घेता येणार आहे. या मतदानाच्या वेळी एक मायक्रो ऑब्झर्व्हर, दोन कर्मचारी, एक पोलिस असे पथक असणार आहे. ते मतदाराच्या घरी जाईल. संबंधित विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराचे प्रतिनिधीही त्यावेळी उपस्थित राहू शकतात.




# शिक्षणमंत्री केसरकर चक्रव्यूहात

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील सावंतवाडी विधानसभा मतदारसंघामध्ये या वेळी अगदी रंगतदार लढत रंगण्याची चिन्हे आहेत. शिवसेना शिंदे गटातील ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री दीपक केसरकर हे रिंगणात असल्याने या मतदारसंघाकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सलग तीन निवडणुकांमध्ये विजय मिळवून हॅटट्रिक मिळवणारे केसरकर या वेळी विजयी चौकार ठोकण्याच्या इराद्याने रिंगणात उतरले आहेत; मात्र या वेळी केसरकर यांच्यासमोर अवघड आव्हान आहे. येथे महायुती आणि महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात महायुती आणि महाविकास आघाडीमधून प्रत्येकी एका इच्छुकाने बंडखोरी केल्याने येथील गणिते बदलली आहे. सावंतवाडीमध्ये महायुतीकडून शिंदे गटाचे दीपक केसरकर विरुद्ध ठाकरे गटाचे राजन तेली अशी मुख्य लढत होत आहे; मात्र महायुतीमध्ये भाजपकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेले युवा नेते विशाल परब आणि महाविकास



आघाडीमध्ये शरद पवार गटाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या अर्चना घारे-परब यांनी बंडखोरी केल्याने येथील निवडणूक चौरंगी झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधील बंडखोरी शमवण्यासाठी वरच्या पातळीवरून फारसे प्रयत्न झाले नाहीत. आता बंडखोरांवर निलंबनाची औपचारिकता पार पडली असली, तरी येथे नेमका कुठल्या पक्षाचा पाठिंबा कुणाला आहे, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. त्यामुळे केसरकर सध्या चक्रव्यूहात सापडले असून, निवडणुकीतील चुरस वाढली आहे. संपूर्ण मतदारसंघामध्ये असलेला व्यापक जनसंपर्क, सावंतवाडीसारख्या मोठ्या शहरात असलेला प्रभाव तसेच ग्रामीण भागात छोट्या छोट्या विकासकामांमधून जोडलेला निश्चित समर्थक वर्ग या केसरकर यांच्या जमेच्या बाजू आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीमध्ये सहकार्य केल्याने मदतीला आलेले नारायण राणे आणि त्यांचे समर्थक यामुळे सुद्धा केसरकर यांचे बळ वाढलेले आहे; मात्र सलग १५ वर्षे मतदारसंघाचं प्रतिनिधित्व आणि सात साडेसात वर्षे मंत्रिपद भूषवल्यानंतरही मतदारसंघातील काही समस्या सोडवण्यात केसरकर यांना यश आलेले नाही. येथील तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न, दर्जेदार रुग्णालयाची वानवा, सावंतवाडी टर्मिनसचे रखडलेले काम, मायनिंग हे केसरकर यांना अडचणीत आणणारे मुद्दे आहेत.

केसरकर यांच्याविरोधात ठाकरे गटाने राजन तेली यांना उमेदवारी दिली आहे. तेली हे काही दिवसांपर्यंत भाजपमध्ये होते. सावंतवाडीची जागा महायुतीमध्ये शिंदे गटाला सुटणार हे निश्चित झाल्यानंतर ते भाजपमधून ठाकरे गटामध्ये दाखल झाले आणि त्यांनी उमेदवारी मिळवली. मागच्या दोन निवडणुकांमध्येही तेली यांनी केसरकर यांना आव्हान दिले होते; मात्र त्यात ते अपयशी ठरले होते. या वेळी त्यांनी केसरकर यांना घेरण्याची जोरदार तयारी केली आहे; मात्र भाजपमधून ठाकरे गटामध्ये जाताना ते येथील भाजपच्या संघटनेला फार मोठं खिंडार पाडू शकलेले नाहीत. शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर येथील ठाकरे गटाचे संघटन विस्कळीत झालेले आहे; मात्र तरीही येथे

**सावंतवाडी विधानसभा मतदारसंघांमध्ये विद्यमान आमदार आणि शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि राजन तेली यांच्यामध्ये सामना होत आहे. मागील तीन टर्मचा विचार करता या वेळी केसरकर आणि तेली या दोन चेहऱ्यांव्यतिरिक्त विशाल परब आणि अर्चना घारे हे दोन नवीन चेहरे मैदानात उतरले आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्येही बंड झाले असून बंडाचा नेमका फटका कुणाला बसतो, हे पाहायचे.**

ठाकरे गटाची बऱ्यापैकी ताकद आहे. त्याशिवाय केसरकरांवर नाराज असलेला मतदार तेलींच्या बाजूने वळू शकतो. एवढेच नाही तर तेली हे बरीच वर्षे भाजपमध्ये असल्याने भाजपचे काही कार्यकर्तेही वैयक्तिक संबंधातून त्यांच्याकडे वळू शकतात; मात्र तेली हे मूळचे कणकवलीतील आहेत. त्यामुळे बाहेरचे उमेदवार हा शिक्का त्यांच्यासाठी अडचणीचा ठरू शकतो. केसरकर आणि तेली यांच्या व्यतिरिक्त दोन अपक्ष उमेदवारांनी सावंतवाडीमधील लढतीमध्ये रंगत आणली आहे. या मतदारसंघामध्ये अर्चना घारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तर विशाल परब यांनी भाजपकडून उमेदवारीसाठी प्रयत्न केले. सावंतवाडी मतदारसंघाची सद्यस्थिती पाहता चारही उमेदवारांमध्ये मत विभागणी होणार असल्याचे चित्र आहे. महायुतीमध्ये छुप्या पद्धतीने भाजपची मते विशाल परब यांच्याकडे वळण्याच्या शक्यता नाकारता येत नाही. भाजपमधल्या काही पदाधिकाऱ्यांनी परब यांचे काम सुरू केले आहे. त्यामुळे जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांनी परब यांच्या निलंबनाबरोबरच संबंधित पदाधिकाऱ्यांना अल्टीमेटम दिला आहे. केसरकर यांच्यावर असलेली भाजपतील लोकांची नाराजी यामागचे मूळ कारण आहे. ही नाराजी दूर करणे भाजपमधील नेत्यांसमोर आव्हान आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी विशाल परब यांनी जोरदार तयारी केली होती. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ते मतदारांशी जोडले गेले होते; मात्र भाजपने ही जागा केसरकर यांना दिल्याने विशाल परब यांनी बंडखोरी केली. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना प्रमुख उमेदवारांना धक्का बसेल असे शक्तिप्रदर्शन केले होते. विशाल परब यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली असली, तरी भाजपमधील एका वर्गाचा त्यांना पाठिंबा आहे. विशेषत: तरुणवर्ग त्यांच्याकडे वळण्याची शक्यता आहे. मात्र विशाल परब हे निवडणुकीच्या राजकारणामध्ये नवखे आहेत, त्यात सध्या सिंधुदुर्गमध्ये भाजपवर वर्चस्व असलेले नारायण राणे आणि त्यांचे समर्थक विशाल परब यांच्या विरोधात असल्याने ही बाब विशाल परब यांच्यासाठी अडचणीची ठरू शकते. सावंतवाडी विधानसभा

### रण तापले

मतदारसंघामध्ये महायुतीप्रमाणेच महाविकास आघाडीमध्येही बंड झालं आहे. मागच्या अनेक वर्षांपासून सावंतवाडीमधून उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुक असलेल्या शरद पवार गटाच्या अर्चना घारे परब प्रयत्न करत होत्या. ही जागा ठाकरे गटाला गेल्यानंतर त्यांनी बंडखोरी केली आहे. अर्चना घारे परब यांनीही सामाजिक कार्याच्या माध्यमातून या भागामध्ये आपली ओळख निर्माण केली होती; मात्र येथे शरद पवार गटाची ताकद मर्यादित असल्याने त्यांचा उमेदवारीवरील दावा कमकुवत झाला. एकंदरीत दोन प्रमुख उमेदवार आणि दोन तुल्यबळ अपक्ष उमेदवार अशा चौरंगी लढतीमध्ये मतविभाजन हा कळीचा मुद्दा ठरणार आहे.

# काका-पुतण्याचा अस्तित्त्वासाठी संघर्ष

पुणे जिल्ह्यामध्ये विधानसभेचे २१ मतदारसंघ आहेत. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपने तब्बल ११ जागा जिंकल्या होत्या; मात्र त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने या ठिकाणी आपले वर्चस्व निर्माण केले. पुण्यातील राजकीय वर्चस्वाबाबत बोलायचे झाले, तर पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, पुणे कॅन्टोन्मेंट आणि वडगाव शेरी हे विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यात सहाही विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपची बऱ्यापैकी पकड आहे. जिल्ह्याबाबतचे चित्र जरा वेगळे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (पक्षफुटीनंतर आता सर्व जागा अजित पवार गटाकडे गेल्या आहेत) १० आमदार आहेत. त्यापाठोपाठ भाजपचे आठ आमदार तर काँग्रेसचे तीन आमदार आहेत. जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांपैकी सात मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि अजित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर सात मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी विरोधात राष्ट्रवादी अशा लढती रंगणार आहेत. जिल्ह्याच्या राजकारणामध्ये कोणत्या पवारांचे वर्चस्व एकहाती राहणार, या दृष्टीने या लढतींकडे पाहिले जात आहे. पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अजित पवार भाजप-शिवसेना शिंदे पक्षाच्या सरकारमध्ये सामील झाले. त्या वेळी पुणे, पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील अनेक आमदार, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी अजित पवार यांना जाहीर समर्थन दिले; मात्र लोकसभा निवडणुकीमध्ये अजित पवार यांना विशेष प्रभाव दाखविता आला नाही. बारामतीमध्ये अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा यांचा पराभव झाला. त्याउलट राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला लोकसभा निवडणुकीमध्ये चांगले यश मिळाले. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्यासाठी अनेकांची चढाओढ सुरू झाली. अजित पवार यांच्याकडील काही आमदारही शरद पवार यांच्या संपर्कात होते; मात्र त्यांना पक्षात न घेता शरद पवार यांनी नवे उमेदवार दिले आहेत. त्यामुळे अजित पवार विरोधात शरद पवार अशा लढती सात ठिकाणी होत आहेत.



अजित पवार यांना बारामतीमधून त्यांचे पुतणे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांचे कडवे आव्हान राहणार आहे. शिरूरमध्ये राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख माउली कटके यांना पक्षामध्ये घेत उमेदवारी दिली आहे. विद्यमान आमदार अशोक पवार यांना शेळके यांचे आव्हान आहे. इंदापूरमध्ये माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना पक्षामध्ये घेऊन शरद पवार यांनी महायुतीला धक्का दिला आहे. इंदापूरमध्ये अजित पवार समर्थक आमदार दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटील अशी लढत होणार आहे. त्यातच येथे शरद पवार गटामध्ये बंडखोरी झाली आहे. प्रवीण माने यांनी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली आहे. शरद पवार यांचे कार्यकर्ते आप्पासाहेब जगदाळे भरणे यांना जाऊन मिळाले आहेत. आंबेगाव तालुक्यामध्ये अजित पवार यांचे समर्थक दिलीप वळसे पाटील यांना त्यांचे एकेकाळचे सहकारी देवदत्त निकम यांना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून आव्हान दिले आहे. पुरंदर मतदारसंघात महायुतीमध्ये बंडखोरी झाली आहे. शिंदे गटाच्या विजय शिवतारे यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी दंड थोपटून मैदानात उडी घेतली आहे. येथे काँग्रेसचे संजय जगताप महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. जुन्नर विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी अजित

**पुणे जिल्हा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक घडामोडींसाठी महत्त्वाचा आहे. तसाच पुण्याला खूप मोठा राजकीय वारसा आहे. पुण्यामध्ये कितीही राजकीय पक्ष आणि नेते असले, तरी या वेळच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पुणे शहर आणि जिल्ह्यावर कुणाचे राजकीय वर्चस्व आहे, हे बघण्यासाठी शरद पवार आणि अजित पवार या काका-पुतण्यांमध्ये खरा संघर्ष आहे.**

पवार पक्षाचे आमदार अतुल बेनके यांच्याविरोधात विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सत्यशील शेरकर यांना काँग्रेसमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेऊन शरद पवार यांनी उमेदवारी दिली आहे. शहरातील हडपसर मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे आमदार चेतन तुपे विरोधात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप असा

### लक्षवेधी लढत

सामान रंगला आहे, तर वडगावशेरी मतदारसंघामध्ये अजित पवार समर्थक आमदार सुनील टिंगरे यांच्यापुढे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी आमदार बापूसाहेब पठारे यांचे आव्हान आहे. पठारे यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली असून शरद पवार यांनी त्यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या सात ठिकाणी पवार कुटुंबियांची प्रतिष्ठा पणाला लागली असून या सात लढती राष्ट्रवादीचे जिल्ह्यामधील वर्चस्व ठरवणार आहेत. तसेच दौंड मतदारसंघामध्ये भाजपचे राहुल कुल आणि शरद पवार गटाच्या रमेश थोरात यांच्यामध्ये परंपरागत चुरशीची लढत होणार आहे.

# अकोला पश्चिममध्ये बंडखोरीचा फटका

गेल्या वेळेचा अकोला पश्चिमचा विधानसभा मतदारसंघाचा विचार केला असता दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा सलग पाचव्यांदा निवडून आले होते. त्यामुळे अकोला पश्चिम मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला बनला होता. त्याला कारण म्हणजे लालाजींचा कार्यकर्त्यांशी आपुलकीचा संबंध. सर्वसामान्यांची कामे करण्याची हातोटी यामुळे मतदार त्यांच्यावर खूश होता. दरम्यान आजारपणामुळे त्यांचा मृत्यू झाला आणि मतदारसंघामधील परिस्थितीही काळानुरुप बदलली. उमेदवार देते वेळी काही नावे चर्चेत आली होती. त्यापैकी बहुतांश जणांना 'तुम्ही यावेळेस थांबा' असे सांगितले आणि विजय अग्रवाल यांच्या गळ्यामध्ये उमेदवारीची माळ पडली. या उमेदवारीमुळे अनेकांनी पक्षाच्या कारवाईला न जुमानता थेट विरोध केला. त्यातील डॉ. अशोक ओळंबे आणि हरिश आलिमचंदाणी यांनी तर उमेदवारी मागे घेत नसाल तर बंडखोरी करू अशी भूमिका घेतली आणि तसेही झालेही. महाविकास आघाडीमध्ये समाविष्ट असतानाही ठाकरे गटाचे राजेश मिश्रा यांनी आपला अर्ज कायम ठेवत अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला. या समीकरणामुळे विजय अग्रवाल यांना विजयश्री खेचून आणण्यासाठी बरीच कसरत करावी लागणार असल्याचे चर्चा मतदारांमध्ये आहे. अकोला पश्चिम ही महाराष्ट्रातील महत्त्वाची विधानसभा जागा आहे. ही जागा अकोला जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. अकोला पश्चिम विधानसभा २००८ च्या परिसीमनानंतर अस्तित्वात आली होती. या जागेवर भाजपने कायमच वर्चस्व राखले आहे. या जागेवर भाजपचे नेते गोवर्धन शर्मा तीन वेळा निवडणूक जिंकले होते. शर्मा हे महाराष्ट्रातील भाजपचे मोठे चेहरा होते; परंतु नोव्हेंबर २०२३ मध्ये गोवर्धन शर्मा यांचे निधन झाले. त्यामुळे या निवडणुकीत अकोला पश्चिम सीटवर एक नवा चेहरा आणि नव्या राजकीय समीकरणांचा सामना होईल.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेपूर्वी तरी अकोला पश्चिम मतदारसंघातील बंडखोर उमेदवार हरिश आलिमचंदाणी, डॉ. अशोक ओळंबे पक्षाच्या हितासाठी काहीतरी निर्णय घेतील असे वाटले होते; परंतु तसे होऊ न शकल्याने याचा फटका आता महायुतीचे उमेदवार विजय अग्रवाल यांना बसण्याची शक्यता आहे. एकंदरीत अकोला पश्चिम मतदारसंघामधील राजकीय परिस्थिती लक्षात घेता अग्रवाल यांना पाडण्यासाठी चक्रव्यूह रचला गेला की काय, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.**



अकोला पश्चिम विधानसभा क्षेत्रामध्ये मुस्लिम समुदायाचा मोठा प्रभाव आहे आणि एकूण मतदारांपैकी सुमारे ४१ टक्के मतदार मुस्लिम आहेत. उर्वरित समाजाचे प्रतिनिधित्व कमी प्रमाणात आहे. यामुळे या क्षेत्रात मुस्लिम मतदारांचा प्रभाव महत्त्वपूर्ण ठरतो. अकोला पश्चिम विधानसभा या निवडणुकीमध्ये भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या पातळीवर मोठे बदल आणि चढाओढ दिसून येईल. अकोला पश्चिम मतदारसंघामध्ये उमेदवारीवरून घमासान सुरू होते. अकोला पश्चिममध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये सर्वाधिक बंडखोरी पाहायला मिळाली. नामांकन अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बंडखोर उमेदवारांनी अर्ज मागे घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. दरम्यान काँग्रेसचे बंडखोर आणि वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार झिशान हुसेन यांनी अखेर आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे अकोल्यातील अकोला पश्चिम मतदारसंघामध्ये 'वंचित'ला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसमधील बंडखोरी शमली असली तरी महाविकास आघाडी आणि महायुतीतील बंडखोरी कायम आहे. भाजप नेते माजी नगराध्यक्ष हरीश अलीमचंदाणी आणि भाजप नेते डॉ. अशोक ओळंबे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे, तर शिवसेना ठाकरे गटाचे बंडखोर उमेदवार राजेश मिश्रा यांनीही आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. दरम्यान 'वंचित'च्या उमेदवारानेच अर्ज मागे घेतल्याने मोठा धक्का मानला जात आहे. त्यामुळे आता वंचित बहुजन आघाडीकडून यावर नेमकी काय भूमिका घेतली जाते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अकोला पश्चिममध्ये चौरंगी लढत होत आहे. भाजपमध्ये दोन बंडखोर असल्याने भाजपची डोकेदुखी कायम आहे, तर शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार राजेश मिश्रा तटस्थ असल्याने महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढली आहे. अलीमचंदाणी हे पाच वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यात ते एकदा नगराध्यक्षसुद्धा होते. भाजपने माजी महापौर विजय अग्रवाल यांना उमेदवारी दिली. त्यानंतर इतर इच्छुक नाराज झाल्याने त्यांनी बंडखोरीचे हत्यार उपसले, पक्षश्रेष्ठींनी मनधरणी करण्याचे प्रयत्न केले; मात्र बंडखोरांनी बंडखोरी कायम ठेवत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने आता भाजपची डोकेदुखी वाढली आहे.

### लढाई रंगली

अकोला पश्चिम मतदारसंघात महाविकास आघाडीमध्येही असेच काहीसे चित्र पाहायला मिळत आहे. सहा वेळा हरलेल्या काँग्रेसला या वेळी पुन्हा हा मतदारसंघ सुटल्याने शिवसेना ठाकरे गटातील शहर प्रमुख राजेश मिश्रा यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला. त्यांचीसुद्धा मनधरणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये बंडखोरी झाल्याने यांना आधी पक्षातील बंडखोरांशी लढावे लागेल मगच विरोधी पक्षातील उमेदवाराशी सामना होईल.

# आश्वासनांची मनसोक्त खैरात

निवडणुकांची धामधुम सुरू झाली आणि नेत्यांची खरी रुपे जनतेच्या डोळ्यासमोर येऊ लागली. तिकीट मिळाले नाही म्हणून धाय मोकलून रडणारे, घरातून गायब होणारे, नाराज होऊन पक्ष बदलणारे आणि बंड पुकारून स्वत:च्याच पक्षाविरुद्ध उभे राहणारे नेते पाहून आपण नेमके कुणाला आणि का निवडून देत आहोत, हे सामान्य जनतेला कळेनासे झाले आहे. आपल्या पक्षाशी आणि पक्षविचारांशी कोणतेही देणे घेणे नसलेल्या या उमेदवारांना जनतेसाठी नव्हे तर स्वार्थासाठी सत्ता हवी आहे हे न कळायला जनता मूर्ख नाही. जनतेच्या कल्याणासाठी सत्ता मागणारे हे नेते नक्की जनतेला काय देणार आहेत? निवडणुकीसाठी प्रत्येक पक्षाने अत्यंत आकर्षक 'जाहीरनामा' प्रसिद्ध केला आहे. कुणी ब्लूप्रिंट तयार करून लोकांसमोर मांडली आहे. महायुती, महाविकास आघाडी, वंचित, मनसे असे अनेक लहानमोठे पक्ष आता कामाला लागले आहेत. येनकेनप्रकारेन लोकांना आकर्षित करायचे एकमेव ध्येय समोर असल्यामुळे आश्वासनांची मनसोक्त खैरात सुरु आहे. जुन्याच विषयांना पुन्हा उजाळा देऊन हे जाहीरनामे लोकांच्या समोर झळकवले जात आहेत. जे पक्ष काही दिवसांपूर्वी 'लाडकी बहीण' योजनेला विरोध करत होते, त्यांनी आता लाडक्या बहिणींना द्यायची रक्कम वाढवली आहे.



### मुद्दे आणि गुद्दे

गरीबांना घरे, कमी किमतीत वीज, रोजगाराच्या संधी, शेतकऱ्यांना कर्जमाफी, मुलींप्रमाणेच मुलांनाही उच्च शिक्षण फुकट यासारख्या एकापेक्षा एक रेवडी योजना जाहीर होत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात शिवरायांचे मंदिर बांधू, संविधानाचे रक्षण करू असेही कुणी म्हणत आहे. पण काही करण्यापेक्षा दुसरा किती वाईट आहे हे सांगण्यातच अनेकजण आपली अधिक शक्ती खर्च करत आहेत. जातीपाती नको म्हणता म्हणता आता सारेच जातीचे राजकारण करू लागले आहेत.

# आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामांना लागला ब्रेक

### अपघाताची मालिका सुरुच



**महासागर प्रतिनिधी,**
**महागाव, दि. १३ :** शहरातील रस्त्याचे कामे आचारसंहितेच्या नावाखाली अर्धवट स्थितीत ठप्प पडलेली आहेत. सुरुवातीपासून या कामाला घरघर लागलेली असताना आचारसंहितेच्या नावाखाली संबंधित कंत्राटदारांनी संधी साधून ठीक ठिकाणी अर्धवट स्थितीत खड्डे खोदून ठेवले आहेत. या खड्ड्यांमध्ये रोज नवीन-नवीन अपघात होत आहेत.

आधीच अरुंद रस्ता त्यामध्ये अर्धवट काम करून ठेवल्यामुळे शहरातील रहदारीचा रस्ता असूनही सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. साधारण शंभर मीटरमध्ये५० लाख रुपये सिमेंट रोडवर खर्च केली जात आहेत. दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम पेवर ब्लॉक आणि सिमेंट रोड असे हे रस्त्याचे इस्टिमेट सार्वजनिक बांधकाम उपविभाग महागाव यांनी तयार केले आहे. दर्जेदार रस्त्याची निर्मिती व्हावी याकरिताच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शहरातील साधारण दोन कोटी रुपयांचे काम देण्यात आलेली आहेत. रस्त्यात अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यावर गुन्हे दाखल करून रस्त्याचे तत्काळ काम सुरू करण्यात यावे अशी शहरवासीयांची मागणी आहे.

# भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांना कमी भावात विकावे लागते पांढरे सोने

**महासागर प्रतिनिधी,**
**किनगावराजा , दि.१३ :** मागील काही दिवसांपासून कापूस वेचणीच्या हंगामाला सुरूवात झाली आहे. परंतु शेतकऱ्यांच्या घरात कापूस येत नाही तोच कापसाला हमी भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने कापसाची विक्री करावी लागत आहे. या भावातून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुध्दा निघत नसल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

मागील काही वर्षांपूर्वी कॉटन बेल्ट म्हणून बुलडाणा जिल्ह्याची ओळख होती. परंतु दरम्यानच्या काळात कापसाला पाहिजे तसा भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा सोयाबीन कडे कल वाढला आहे. त्याचाच परिणाम म्हणून वर्षागणिक कापसाच्या पेऱ्यात घट येत आहे. असे असताना सुध्दा परिसरातील शेतकऱ्यांनी शेकडो हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड केली. परंतु शेतकऱ्याच्या घरात कापूस येत नाही तोच व्यापारी मिळेल त्या भावाने कापसाची खरेदी करत आहेत. या भावातून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुद्धा निघणे कठीण झाले आहे. त्यातच कापसाच्या गाठी आयात केल्या जात असल्यामुळे तालुक्यात कापसाचे भाव पडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे सीसीआयमार्फत शासनाने हमी भावाने कापूस खरेदी करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. परंतु अद्यापही जिल्ह्यात कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याचा सीसीआयला मुहूर्त सापडला नाही. त्यामुळे नाइलाजास्तव शेतकऱ्यांना कमी भावात शेतकऱ्यांना पांढऱ्या सोन्याची विक्री करावी लागत आहे. बी-बियाणे, रासायनिक खते, औषधी, डिझेल व इतर वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. तर दुसरीकडे शेतमालाला भाव मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी शेती करून कर्जबाजारी होण्यासाठी शेती करावी का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



मागील तीन चार वर्षांपूर्वी कापसाला प्रती क्विंटल दहा ते बारा हजार रुपये भाव देण्यात आला होता. परंतु सध्या परिस्थितीत कापसाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा कापूस खासगी व्यापारी याच कमी भावात शेतकऱ्यांकडून खरेदी करीत आहे. नाइलाजाने शेतकऱ्यांना नुकसान करून कमी भावात कापूस विकावा लागत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

त्यामुळे शासनाने कापसाला दहा हजार रुपये प्रति क्विंटल हमी भाव जाहीर करून शेतकऱ्यांना आधार द्यावा, अशी मागणी कापूस उत्पादक शेतकरी करत आहेत. मागील वर्षी वाटले कापसाचे भाव वाढतील. परंतु कापसाला भाव नाही घरात पडून पडून कापूस घटला. मात्र भाव नाही वाढला. या वर्षी तरी कापसाचे भाव वाढुन त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. त्यामुळे शासनाने भाव वाढीसाठी योग्य पाऊल उचलावे सधाकृष्ण नागरे, शेतकरी किनगावराजा

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान शासकीय कापूस खरेदी केंद्र वेळेवर सुरू होत नसल्याने व्यापारी हमी भावापेक्षा कमी भावाने कापूस खरेदी करत आहेत.

तालुक्यात सध्या कापसाला सहा हजार ते सात हजार रुपये भाव दिला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. शासनाच्या चुकीच्या आणि व्यापारी धार्जीण्या आयात निर्यात धोरणामुळे शेतकरी उद्धवस्त होत आहेत.

## आरक्षणवादी आमदार विधिमंडळात असल्याशिवाय आरक्षण वाचणार नाही-प्रकाश आंबेडकर



**महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि.१३:** भाजप आणि कॉंग्रेस हे दोन्ही पक्ष आरक्षण विरोधी आहेत. आरक्षणवादी आमदार विधिमंडळात असल्याशिवाय आरक्षण वाचणार नाही, त्यामुळे योग्य उमेदवारांना विधानसभेत पाठवण्याची जबाबदारी आपली आहे. असे प्रतिपादन केले.

यवतमाळ विधानसभा मतदारसंघातील वंचितचे उमेदवार डॉ. नीरज वाघमारे यांच्या प्रचारार्थ सोमवारी दि. ११ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता पार पडलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकरांनी सांगितले की, ओबीसींची टक्केवारी किती? हे माहीत नसल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण थांबवण्यात आले आहे. ओबीसींना खुल्या मतदारसंघातून निवडणूक लढवावी लागेल आणि अनुसूचित जाती जमातीच्या वर्गीकरणाबरोबर क्रीमिलेयरची व्याख्या सुद्धा करण्यात आलेली आहे. ज्यांनी आरक्षणाचा एकदा लाभ घेतला असेल त्यांच्या वारसांना पुन्हा आरक्षण मिळणार नाही असेही डॉ. प्रकाष आंबेडकर यांनी सांगितले. या सभेला वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हा निरीक्षक ॲड. प्रियदर्शी तेलंग, यवतमाळ मतदार संघाचे उमेदवार डॉ.नीरज वाघमारे, पुसद मतदार संघाचे माधवराव वैद्य, दारव्हा/दिग्रस मतदार संघाचे नाजुकराव धांदे, राळेगाव मतदार संघाचे किरण कुमरे, वणी मतदार संघाचे राजू निमसटकर आणि उमरखेड मतदार संघाचे उमेदवार तातेराव हनवते हे हजर होते.

## जमिनीचा वाद विकोपाला; भाच्याकडून मामाची हत्या

**महासागर प्रतिनिधी,**
**कळंब , दि. १३ :** राहत्या जागेच्या वादातून भाच्याने चक्क स्वत:च्या मामाची दगडाने ठेचून निघृण हत्या केली. ही धक्कादायक घटना कळंब तालुक्यातील नांझा येथे सोमवारी दि. ११ नोव्हेंबरला रात्री ८वाजताच्या सुमारास घडली. रामकृष्ण भाऊराव डबकर (वय ६५) वर्ष रा. नांझा असे मृतकाचे नाव असून सुनील श्रीराम मेश्राम (वय २८) वर्ष रा. नांझा असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या मारेकरी भाच्याचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, कळंब तालुक्यातील नांझा येथील रामेश्वर डबकर (वय २८) वर्ष यांनी कळंब पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनूसार, भाचा सुनील याने सोमवारी रात्री मामा रामकृष्ण यांच्या घरी जावून तुम्ही आम्हाला आमच्या राहत्या जागेवरून हाकलण्यासाठी कोर्टात केस का टाकली या कारणावरून वाद घातला. दरम्यान शिविगाळ करून निघून गेला. त्यानंतर शेतात जावून सुनील मेश्राम याने मामा रामकृष्ण यांची दगडाने ठेचून निघृण हत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणी करीता रूग्णालयात दाखल केला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने, ठाणेदार राजेश राठोड यांनी देखील घटनास्थळी भेट दिली.



या प्रकरणी कळंब पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला असून मारेकरी भाचा सुनील टेकाम याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सागर भारस्कर, महिंद्रा साळवे करीत आहेत.

**राहत्या जागेच्या वादातून भाच्याने चक्क स्वत:च्या मामाची दगडाने ठेचून निघृण हत्या केली.**

### श्वानाने दाखवला मारेकऱ्याचा मार्ग

कळंब तालुक्यातील नांझा येथे खूनाची घटना घडल्यानंतर तातडीने यवतमाळातून श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. दरम्यान घटनास्थळावर आढलेल्या काही क्ल्यू वरून श्वान पथकाने थेट आरोपीचे घरच गाठले.

यावेळी श्वान कॅंडी सह श्वान पथकातील पोलिस उपनिरीक्षक संतोष कडू, सुनील पचगाडे, महेश राठोड उपस्थित होते.

## विदर्भ खो-खोज्युनिअर चॅम्पियनशिपमध्ये जिल्ह्याला विजेतेपद



**महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. १३ :** जिल्ह्याने विदर्भ खो-खो (जुनियर) चॅम्पियनशिप जिंकली असून, यात श्री शिवाजी महाविद्यालयातील खेळाडूंचा सहभाग नोंदवला.

विदर्भस्तरीय खो-खो (ज्युनियर) अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संत गाडगेबाबा क्रीडा मंडळ व अकोला जिल्हा खो खो असोसिएशनने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये विदर्भातील मुलींच्या ११ संघांनी भाग घेतला. अंतिम स्पर्धेमध्ये यवतमाळ जिल्ह्याला मात देऊन अकोला संघ विजयी झाला. या संघामध्ये शिवाजी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यात श्रद्धा नागदेवे, प्राची सरकटे, पल्लवी परदे, ज्योती बिरले, तन्वी मोहोड, अनुष्का वानखडे या खेळाडूंचा समावेश होता. यापूर्वीही महाविद्यालयाच्या चार खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता आणि त्यामध्ये द्वितीय स्थान प्राप्त केले होते. अलिगढ येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या चार खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. या संघास रवी रामटेके यांनी प्रशिक्षित केले. खेळाडूंचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, जिल्हा खोखो असोसिएशनचे अध्यक्ष मीना भाकरे, सचिव अवधूत ढेरे, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. सुशीला मळसने आणि महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय काळे, क्रीडा शिक्षक नितीन वाघमारे यांनी सन्मान केला.



## ट्रेण्डी जॅकेटसारख्या उबदार कपड्यांना मागणी

**हिवाळा येताच उबदार कपड्यांचा बाजारही गरम होण्यास सुरुवात होते.**

**महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि.१३:** सध्या थंडीचे आगमन झाले असून सायंकाळी व सकाळच्या सुमारास तापमानाचा पारा घसरत आहे. यामुळे नागरिकांनी ठेवणीतील उबदार कपडे बाहेर काढण्यास सुरुवात केली आहे. अनेक नवनवीन डिझाइनच्या उबदार कपड्यांसह विविध फॅशनच्या मफलर व मखमली स्टॉल्सच्या खरेदीचा सध्या ट्रेण्ड दिसून येत आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी विविध प्रकारच्या गरम कपड्यांच्या खरेदीसाठी शहरासह ग्रामीण भागातूनही ग्राहक येत आहेत. यामुळे शहरातील आझाद मैदानात तिबेटीयन मार्केटसह शहरातील विविध भागात तात्पुरत्या स्वरूपात सुरु झालेल्या दुकानांमध्येही गर्दी दिसून येत आहे.

हिवाळा येताच उबदार कपड्यांचा बाजारही गरम होण्यास सुरुवात होते. थंडीमध्ये लहान मुले व ज्येष्ठांची जास्त काळजी घेतली जाते. अगदी पायाच्या नखापासून ते डोक्यापर्यंत लोकरीचे कपडे परिधान केले जातात. खासकरून विविध रंगसंगती असलेली वस्त्रे वापरण्याकडे महिलांचा कल वाढला आहे. यंदा समाधानकारक पाऊस झाला असून पिके चांगली आली आहेत. त्यामुळे परिसरातील लोक चांगली खरेदी करतील, अशी अपेक्षा आहे.

### विक्रेत्यांची तिसरी पिढी

१४५४ रोजी चायना देशाने कब्जा केलेल्या भागातील तिबेट मधील हे नागरिक यवतमाळ बाजारात उबदार कपडे विकण्यासाठी अनेक वर्षापासून येतात. सध्या ते कर्नाटक राज्यांतील हुबळी येथे शरणार्थी म्हणून शासनाने दिलेल्या घरात राहतात. ते खानदानी व्यवसाय म्हणून उबदार कपडे विकण्याचा व्यवसाय करत असून त्यांची सध्या तिसरी पिढी व्यवसाय करत आहे. तीन पिढ्यांपासून ते कार्यरत आहेत.

## दिव्यांग व ८५ वर्षांवरील मतदारांच्या मतदानाबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन बीएलओंचे प्रशिक्षण

**महासागर प्रतिनिधी,**
**सिंदखेडराजा , दि.१३:** सिंदखेडराजा विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघांतील सर्व बीएलओंचे प्रशिक्षण आज, दि. ११ नोव्हेंबर रोजी सहकार विद्या मंदिरमध्ये पार पडले. यावेळी दिव्यांग व ८५ वर्षांवरील मतदारांच्या मतदान प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय खडसे होते. दिव्यांग मतदार व ८५ वर्षांवरील मतदारांची निरीक्षण करून यादी सादर करण्यात आली असून असे मतदार गैरहजर असल्यास वोटर स्लिप जपून ठेवावी, वाटप झालेल्या मतदान चिट्ठीबाबत प्रमाणपत्र आणि उरलेल्या स्लिप व साहित्य जमा करण्यात यावे, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या. सर्व बीएलओंनी आपले मतदान साहित्य घेऊन मतदारांना वोटर



स्लिप वाटप घरपोच करावे, अशी सूचनाही यावेळी करण्यात आली. निवडणुकीसंदर्भात दुपारी एक वाजता प्रा. खडसे यांच्या मार्गदर्शनात दुसरी बैठक पार पडली. यावेळी टपाल व्यवस्थापन पथकाच्या माध्यमातून सर्व झोनल अधिकाऱ्यांचा आढावा घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

दिव्यांग मतदार व वर्षांवरील मतदार यादीनुसार एकूण८०६ अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. १४,१५, व १६ नोव्हेंबरपर्यंत घरपोच मतदान प्रक्रिया करून घेण्यात येणार आहे. त्याकरिता २५ पथके तयार करण्यात आली आहेत.

या बैठकीस तहसीलदार अजित दिवटे, तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, गटविकास अधिकारी मुकेश महोर, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, नायब तहसीलदार मनोज सातव, प्रवीण घोटकर, प्रवीणकुमार वराडे, डॉ. आस्मा मुजावर, सायली जाधव उपस्थित होते.



## भरधाव कारची उभ्या कंटेनरला धडक

### एक जागीच ठार, चार जखमी

**महासागर प्रतिनिधी,**
**दुसरबीड, दि. ४ :** भरधाव जाणाऱ्या कारने उभ्या कंटेनरला पाठी मागून जबर धडक दिली. या अपघातात एक जण जागीच ठार झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना समृद्धी महामार्गावरील मुंबई कॉरिडॉर चॅनल क्रमांक ३११.३. वर घडली.

मुंबई कॉरिडॉर चॅनल क्रमांक ३११.३. वर आरजे १४जीएन१५४५ या क्रमांकाचा कंटेनर छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना कंटेनरचे टायर पंक्चर झाले. त्यामुळे चालकाने कंटेनर लेनवर मधोमध उभा करून पंक्चर काढत होता. तर पाठी मागून एमएच०६ ०६ एडब्ल्यू १७८४ या क्रमांकाची कार माहूरगड येथून छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना कार चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून पंक्चर झालेल्या कंटेनरला पाठी मागून धडक दिली.

या अपघातात विक्रम रामचंद्र सावळे (वय ) रा. छत्रपती संभाजीनगर यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर शैलेश विक्रम सावळे (वय २४), चालक अक्षय भाऊसाहेब साळुंके (वय २५), शुभम शिवाजी पंडित (वय २२), विराज पिंपळे (वय ), मेघा विक्रम सावळे (वय ५०) सर्व राहणार छत्रपती संभाजीनगर हे जखमी झाले आहेत. जखमींना रुग्ण वाहिकेने बिबी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. परंतु काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने रुग्ण वाहिका चालक प्रदीप पडघान व डॉ.अशोक पिसे यांनी पुढील उपचारांसाठी त्यांना जालना येथे रवाना केले. अपघात घडताच कंटेनर चालक व क्लिनर हे वाहन सोडून पळून गेले आहेत. यावेळी महामार्ग पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास बिबी पोलिस करत आहेत.

# कारला धडक देत ट्रेलर घुसला गॅरेजमध्येगुरुकुंज मोझरीची घटना

**घटनास्थळी यावेळी कुणीच नसल्याने मोठा अनर्थ टळला.**

**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १३:** अमरावती नागपूर राष्ट्रीय महामार्गावरून तूर डाळ घेऊन नागपूरकडे भरधाव जाणारा ट्रेलर दुभाजक ओलांडून कारला धडक देत लिंबाच्या झाडावर धडकून एका गॅरेजमध्ये घुसल्याची घटना सोमवारी मध्यरात्री गुरुकुंज मोझरी येथे घडली.

या अपघातात जीवितहानी झाली नसली तरी दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ट्रेलर क्रमांक पीबी ०२ इआर ८६१२ हा नागपूरकडे जात होता. मध्यरात्रीच्या सुमारास ट्रेलर चालक बलदेवसिंग यांना अचानक झोपेची डुलकी आल्याने त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रेलर दुभाजक ओलांडून समोरून येणाऱ्या कार क्रमांक एमएच ३०५२५७ -ला धडक देत थेट लिंबाच्या झाडास धडकून साई गॅरेजमध्ये घुसला.

घटनास्थळी यावेळी कुणीच नसल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान अपघाताचा आवाज ऐकून काही नागरिकांसह व्यावसायिकांनी घटनास्थळी धाव घेतली. यात ट्रेलर चालक



बलदेवसिंग (वय ३४) याला किरकोळ दुखापत झाली असून, त्याला अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे, तर कारचालक यश अग्रवाल, अकोला यांना अकोला येथील रुग्णालयात दाखल केले आहे.

गॅरेज मालकाची भरपाईची मागणी या अपघातात गुरुकुंज मोझरी येथील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या सुनील बोबडे यांच्या साई गॅरेजचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे दुकानातील झालेल्या नुकसानीची भरपाई करून देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# बरं झालं न्यायमूर्ती चंद्रचूड रिटायर्ड झाले!



सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या कारकिर्दीत शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांच्या फुटीमुळे निर्माण झालेला पेच त्यांच्या शुक्रवारच्या अंतिम कामकाजा बरोबर ठप्प झाला. पक्षांतर बंदी कायद्याचे पंख छाटले गेलेत. चक्क कायदा ढासळल्याने प्रकरणे कशी लांबवयची याचे एक नवे तंत्र पुढे आले. चंद्रचूड या प्रकरणातील सूत्रधार ठरले व ही चर्चा न्यायाच्या दृष्टीकोनातून योग्य नव्हती. २६ नोव्हेंबर २०२४ ला मुदत संपणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेतील सर्व बंडखोर आता वाचले आहेत. आता सहानुभूतीचा खेळ सुरू होईल. महायुती आणि महाविकास आघाडी अशा दोन शक्तीत ध्रुवीकरण होत असल्याने मोफतच्या योजना जाहीर करण्यात चढाओढ लागली आहे.

युतीने सुरुवात केली आता आघाडी त्याचा शेवट करत आहे. आमदारांच्या प्रलोभनावर चर्चा विसरून जनतेलाच प्रलोभने दाखवली जात आहेत. शिवाय नेत्यांचे जिल्हावार अंडरस्टँडिंग सुरू झाले आहे. या सर्व प्रकरणात न्यायपालिकेने काय काय निर्णय दिले होते, याचा जनतेला पूर्ण विसर पडला आहे. ते सरन्यायाधीश बनले, तेव्हा अनेक लोकांना आशा होती की, ते सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीत बदल करतील, 'बहुसंख्याकवादी सरकार'वर घटनात्मक नियंत्रण ठेवतील आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवणं सोप करतील. मात्र त्यांच्याकडून अपेक्षाभंग झाला. चंद्रचूड यांनी सरन्यायाधीशपदी असताना दिलेले निकाल आणि त्यांचं वैयक्तिक वर्तन या दोन्ही गोष्टींची चर्चा चांगली झाली नाही. भाषणं आणि मुलाखतींच्या माध्यमातून सरन्यायाधीश चंद्रचूड प्रसारमाध्यमांमध्ये जितक्या प्रकाशझोतात होते, तितकं देशाच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील इतर कोणतेही न्यायमूर्ती नव्हते. पण ते बोलत एक होते व कृती दुसरी होती. जेव्हा भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चंद्रचूड यांच्या घरी गणेशपूजेला गेले, तेव्हापासून त्यांच्याबद्दल कींचीतही आदर वाटला नाही. कारण धार्मिक कार्यक्रमांसाठी राजकारण्यांना भेटणं योग्य नसतचं. त्यांच्या काही निकालांनी भविष्यातील खटल्यांसाठी आदर्शवादी तत्त्वांची पायाभरणी केली होती, मात्र त्यातील अनेक प्रकरणांमध्ये प्रत्यक्षात कोणताही दिलासा ते देऊ शकले नाहीत. सरन्यायाधीश हे 'मास्टर ऑफ द रोस्टर' असतात. म्हणजेच कोणत्या प्रकरणाची सुनावणी कधी घेतली जाणार आणि त्या खटल्याची सुनावणी कोणत्या न्यायमूर्तींपुढे किंवा खंडपीठासमोर होणार हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार सरन्यायाधीशांना असतो. अनेकदा कोणत्या न्यायमूर्तीसमोर एखाद्या खटल्याची सुनावणी होते आहे, यावर देखील त्या खटल्याचा निकाल ठरत असतो. काही न्यायमूर्ती पुराणमतवादी असतात, तर काही उदारमतवादी असतात. चंद्रचूड सरन्यायाधीश बनले, तेव्हा एका मुलाखतीत ते म्हणाले होते की, त्यांना न्यायालयं अधिक पारदर्शक बनवायची आहेत. मात्र, कोणत्या न्यायमूर्तीसमोर कोणता खटला चालवला जावा, यासंदर्भातील रोस्टरवरून ही बाब पूर्णपणे लागू झाल्याचं दिसून आलं नाही.

साधं उदाहरण घेवू या, ते म्हणजे चंद्रचूड कोर्टरूमच्या बाहेर महिलांच्या हक्कांवर स्पष्टपणे बोलत असायचे. परंतु त्यांच्या नेतृत्वाखालील कॉलेजियमने सर्वोच्च न्यायालयात तब्बल सतरा न्यायाधीशांची नियुक्ती केली असली तरी त्यापैकी एकही महिलेला स्थान दिले नाही. त्यांनी मनमानीपणे आणि व्यक्तिनिष्ठपणे कार्य केले. संवेदनशील प्रकरणे विशिष्ट खंडपीठांना वाटप केली. त्यांच्याकडून जनतेला खूप अपेक्षा होत्या. पण जनतेला भ्रमात ठेवून त्यांनी 'गोलमाल' निकाल दिले. व्यवस्थेच्या विरुध्द दिसण्याचा प्रयत्न झाला. पण अखेर त्याच बरबटलेल्या व्यवस्थेचा ते हिस्सा बनले. जनतेच्या आशा आकांक्षा त्यांनी धुळीत मिसळल्या. सुरुवातीस वाटत होते की, हे खरे निस्पृह आणि बाणेदार न्यायाधीश म्हणुन काम करतील. पण एखाद दुसरा निर्णय सोडून बाकी सारे गडबडीचेच निर्णय ठरले. चार निर्णय न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांनी असे काही दिले होते की, त्यांच्या बद्दलचा आदर कायमचा कमी झाला. त्यामुळेच एकदाचे ते सेवानिवृत्त झाले हेच बरे झाले. खरं म्हणजे त्यांनी राजीनामा दिला असता तर अधिक बरे झाले असते. त्यांचा इलेक्टोरल बाँडमधील निर्णय धाडसी होता. त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाला सर्व माहिती सार्वजनिक करण्यास भाग पाडले. स्टेट बँक ऑफ इंडियानेही ते सार्वजनिक केले आणि जगाने पाहिले की देणग्या घेऊन कसे करार केले जातात. देणगी घेऊन जामीन मंजूर झाला, देणगी घेऊन आरोपीला साक्षीदार बनवले, हा स्पष्टपणे भ्रष्टाचार होता.

सर्वोच्च न्यायाल्याने हे असंवैधानिक, बेकायदेशीर असल्याचे सांगितले आणि हे सर्व स्पष्ट असतानाही न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांनी काहीही केले नाही. भ्रष्टाचाराचा सर्व पैसा ज्याच्याकडे होता, त्यांच्याकडेच राहिला आणि प्रकरण शांत झाले आणि पैसे जप्त केले नाहीत किंवा कोणाला शिक्षाही झाली नाही. मग चंद्रचूड यांनी नेमका काय निर्णय दिला? याचे कोडे जनतेला पडले आहे. त्यांनी महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे सरकार पाडून स्थापन केलेल्या शिंदे सरकारला 'बेकायदेशीर' म्हटले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला बेकायदेशीर घोषित करूनही सरकार चालूच राहिले. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी कोणताही निर्णय न देता शिंदेंच्या बेकायदेशीर सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला. हरियाणामध्ये पीठासीन अधिकारी अनिल मसिह यांची चोरी सी सी कॅमेरा द्वारे पकडली. अनिल मसिह यांना लोकशाहीचा खूनी म्हटले गेले. निर्णय फिरवला पण चोरी करणाऱ्याला वाचवले.

लोकशाहीचा मारेकरी अनिल मसिह माफी मागून बचावला. चंद्रचूड यांनी या प्रकरणात काय केले? बाबरी मशीदबाबत तर त्यांनी सांगितले की, त्यांनी हा निर्णय 'दैवी आदेशा'नंतर दिला होता. त्यांच्या कथनी व करणीमध्ये मोठी विसंगती होती. अदानीच्या प्रत्येक केसला दडपून ठेवल्याबद्दल आणि उमर खालिद, शर्जील इमाम, खालिद सैफी, गुलफिशा यांना गेली पाच वर्षे सुनावणी न घेता सतत तुरुंगात ठेवले. भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपींना तुरुंगात अक्षरशः डांबून ठेवले. नरेंद्र मोदी व भाजपशी संबंधित बहुतांशी प्रकरणे न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांच्याकडेच त्यांनी सोपविली. या रोस्टरचे मास्टर म्हणून ते लक्षात राहतील. जस्टिस बेला त्रिवेदी हे नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असताना त्यांच्याकडे कायदा सचिव म्हणून काम करीत होते. अशावेळी त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा काय धरावी? खरं म्हणजे जनतेचा त्यांना एकच सवाल होता की, तुम्हाला तुमच्या घरात पंतप्रधानांबरोबर आरती करण्याची काय आवश्यकता होती? तुम्ही हे केलं तरी, त्याचे फोटो प्रसिद्ध करण्याची काय आवश्यकता होती? अलीकडेच सर्वोच्च न्यायालयात एका नव्या इमारतीच्या बांधकामाची पायाभरणी होती. मात्र, तयारी नसताना हा कार्यक्रम करण्याची काय आवश्यकता होती. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रभावात किती घसरण झाली आहे आणि न्यायालयाच्या प्रतिमेला कीती धक्का बसला, हे येणाऱ्या काळातच कळू शकेल. चंद्रचूड यांनी ज्या परिस्थितीत सरन्यायाधीशपदाची जबाबदारी हाती घेतली होती, त्याचा विचार करता त्यांच्या कार्यकाळात न्यायव्यवस्थेत सुधारणा झाली नाही. त्यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या. आता भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्ना यांनी शपथ घेतली. चंद्रचूड यांच्यानंतर संजीव खन्ना हे सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांच्या काळात त्यांनी काही ऐतिहासिक आणि महत्त्वाचे निकाल घेतले आहेत. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ नुकताच सुरू झाला असला, तरी त्यांना धनंजय चंद्रचूड यांच्याप्रमाणे दोन वर्षं मिळणार नसून फक्त सहा महिनेच त्यांना या पदावर राहता येणार आहे. या सहा महिन्यात त्यांनी जर काही क्रांतिकारी निर्णय घेतले तर भारतीय जनता त्यांना डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही. कारण यापूर्वी सर्वोच्च न्यायालयातील काही निकालांनी जनतेच्या मनात संशयाचे घर निर्माण केलं आहे. साधं उदाहरण द्यायचं ठरलं तरी सांगता येईल की, यापूर्वीच्या सरन्यायाधीशांनी दिलेला एक निकाल होय. सर्वात मोठा न्यायव्यवस्थेचा जर खेळखंडोबा केला असेल, तर न्यायमूर्ती लोया मृत्यू प्रकरणात चौकशी न करण्याचा दिलेला निकाल व त्यात शेवटी मारलेला शेरा. ज्यामुळे भविष्यातही याची कोणालाही चौकशी करता येणार नाही. आता काय करणार? त्यापेक्षा गुडबाय धनंजय चंद्रचूड एवढेच आपल्या हाती आहे!




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

# मुलांना आनंदी करणारा ऋतुराज

दरवर्षी पहिले पंतप्रधान जवाहरलाल मोतीलाल नेहरू यांच्या १४ नोव्हेंबर या जन्मदिनी बालदिन साजरा केला जातो, या दिवशी संपूर्ण भारतभर मुलांसाठी अनेक शैक्षणिक आणि प्रेरक कार्यक्रम आयोजित केले जातात. बालदिन हा एक खास बालकांसाठी विशेष दिवस म्हणून जगभर वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो. 20 नोव्हेंबर 1959 रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आमसभेने बालहक्कांची सनद स्वीकारली. 20 नोव्हेंबर 1981 रोजी बालकांच्या हक्क मसुद्यावर सदस्य देशांनी सह्या केल्या.

या सनदेवर आतापर्यंत 191 राष्ट्रांनी सह्या केल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांचा बालकनिधी (युनिसेफ) ही संस्था जागतिक स्तरावर बालकांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन करून अंमलबजावणी करत असते. बालदिन जागतिक स्तरावर विविध देशांत वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो.

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटना जगातील मानवकल्याणासाठी विविध कृतिकार्यक्रम, विशेष दिन राबवून मानवामध्ये जाणीवजागृती करत असते. उदा. जागतिक महिला दिन, एड्स सप्ताह, मानवी हक्क दिन, बालदिन इत्यादी.

यांमध्ये एक दिवसापासून ते एक आठवडा, पंधरवडा, पूर्ण वर्ष, दशक इतक्या कालावधीत नियोजित कार्यक्रम साजरे करून समाजपरिवर्तनाचा प्रयत्न केला जातो. या कालावधीत निश्चित कृतिकार्यक्रम करून जाणीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात तुरुंगवास भोगत असताना इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्रांतून बालशिक्षणाबाबत आपले विचार मांडले आहेत. मुले काय शिकतात यापेक्षा त्यांच्यावर कोणते संस्कार होतात, हे पालक व शिक्षक यांनी पाहिले पाहिजे. त्यांनी मुलांना देवाघरची फुले' मानली. त्यांना प्रेमाने व काळजीने हाताळली पाहिजेत; कारण बालकांमध्येच देशाचे भवितव्य दडलेले आहे; देशाची खरी शक्ती व समाजउभारणीचा पाया बालकेच असतात, असे ते म्हणत.

बाल दिनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे, बालकांच्या गरजा व हक्क यांविषयी जाणीव-जागृती करणे, बालकल्याणकारी योजना वाढीस लावणे, बालकांमध्ये सांप्रदायिक व सांस्कृतिक देवाण-घेवाण करणे, बालकांमध्ये विविध पंथ वा धर्मांबाबत संहिष्णुता निर्माण करून सामंजस्याची भावना वाढीस लावणे, जगभरातील मुलामुलींमध्ये बंधुभाव वाढीस लावणे, बालकांचे बालपण अधिक समृद्ध बनवणे, बालकांमध्ये विश्वकुटुंबाची संकल्पना वाढीस लावणे ई. असे आहे.

बालदिनानिमित्त विभूतिपूजा टाळून, बालकांच्या गरजा व हक्क यांबाबत राष्ट्रातील पालकांमध्ये जाणीवजागृती निर्माण केली जाते. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे जवाहरलाल म्हणजे ऋतुराज. हा ऋतुराज मुलामुलींमध्ये खुलवून त्यांचे जीवन आनंदी बनविण्याचा प्रयत्न केला जातो.

मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यासाठी अशा दीपस्तंभाची गरज असते. ती भागविण्याचा येथे अल्पसा प्रयत्न सुरू आहे; परंतु आज शिक्षणपद्धतीकडे नेहरूंच्या दृष्टीने पाहिले जात नाही. त्यामुळे नको त्या वयात नको ते गुन्हे बालकांकडून घडत आहेत. त्यांची मने कोडगी बनल्यामुळे भावनिक बुद्धिमत्ता कमी झाली आहे, याची पालकांना जाणीव राहिलेली नाही.

बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याचे कारण आपण संस्काराला कमी पडत आहोत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वाढते प्रमाण, प्रादेशिक भाषेतील शाळांमधील घटती विद्यार्थी संख्या; व्यापारी दृष्टिकोनातून शाळा काढून संस्थाचालक संस्थानिक बनले आहेत.

शिक्षक प्रशिक्षणाचा कणाच मोडला आहे. पूर्व माध्यमिक शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे आज भ्रष्टाचार वाढला आहे. त्यासाठी चांगल्या चारित्र्याचे शिक्षक, पालक, संस्थाचालक, राज्यकर्ते इत्यादींची गरज आहे. त्यांची निर्मिती बालशिक्षणातून केली पाहिजे. केवळ बालआनंद मेळावा, बालमहोत्सव, बालदिन या सारख्या दिवशी मनोरंजनात्मक कार्यक्रम साजरे न करता त्यांतून मुलामुलींमध्ये कुटुंब, समाज, देश इत्यादींबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे आणि त्यांप्रती उचित कार्य करण्याची प्रेरणात्मक शिकवण दिली पाहिजे.

---------------

प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

# ग्रंथालयीन सेवा-सुविधांच्या हक्कापासून लाखो शालेय विद्यार्थी वंचित

**(राष्ट्रीय ग्रंथालय आठवडा विशेष १४ - २० नोव्हेंबर २०२४)**

जीवनात शिक्षणाचे स्थान अनमोल आहे आणि शिक्षणात ग्रंथालयाचे स्थान अतुलनीय आहे. शिक्षण मानवाला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उच्च पदे प्राप्त करण्यासाठी, जीवनमान उंचविण्यासाठी चांगल्या संधी उपलब्ध करून प्रगतीच्या मार्गावर पुढे जाण्यास प्रोत्साहित करते, मानवी जीवनातील अंधार दूर करण्यासाठी प्रकाश शिक्षणाच्या रूपात आहे. पुस्तके हा शिक्षणाचा आधार आहे आणि चांगल्या पुस्तकांच्या संग्रहाला ग्रंथालय म्हणतात. ज्ञान स्रोत केंद्रे म्हणजेच शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांची ग्रंथालये शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट पूर्ण करण्यात मोठी भूमिका बजावतात. ग्रंथालयाशिवाय शिक्षण संस्था अपूर्ण आहे. आज आपण आधुनिक युगात प्रगत शैक्षणिक संस्था पाहतो, पुस्तकांचे स्वरूपही डिजिटल आणि आभासी झाले आहे, जगभरातील ज्ञान, नवीनतम माहिती, पुस्तके, कागदपत्रे आपल्याला इंटरनेटच्या एका क्लिकवर घरबसल्या त्वरित उपलब्ध होतात. शिक्षणाबरोबरच प्रत्येक क्षेत्रात ग्रंथालयाचे विशेष स्थान आहे.

---------------------

मानवी जीवनातील शिक्षणाचा प्राथमिक स्तर म्हणजे शाळा, जिथे जीवन विकासाचा पाया, नैतिकता, सभ्यता, मूल्ये आणि ज्ञानाची बीजे पेरली जातात. जेणेकरुन ते मोठे होऊन हिरवेगार, फलदायी वृक्षाप्रमाणे विकसित होऊन देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतील. शाळकरी मुले विविध विषयांचे ज्ञान पटकन आत्मसात करतात आणि नवीन गोष्टी लवकर शिकतात. अशा शैक्षणिक वातावरणात ज्ञानाचा आत्मा म्हणजेच ग्रंथालय ही शिक्षणाची सर्वात मोठी जबाबदारी पार पाडते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुसज्ज ग्रंथालय अत्यंत महत्त्वाचे आहे.

शिक्षणाचे महत्त्व आपल्या सर्वांना चांगलेच माहीत आहे, भारत सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्रशासन देखील शिक्षणात सकारात्मक भूमिका बजावण्यासाठी आणि नवीन यश मिळविण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. शिक्षणाच्या समृद्धीसाठी नवनवीन कार्यक्रम, धोरण राबविण्यात येतात. समग्र शिक्षा अभियानासारख्या अनेक प्रेरणादायी मोहिमा राबवल्या जात आहेत. केंद्रीय विद्यालय संघटन, जवाहर नवोदय विद्यालय, सैनिक स्कूल, स्कूल ऑफ स्पेशलाइज्ड एक्सीलेंस या सारख्या सरकारी शाळा देशातील दर्जेदार शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात.

त्याचप्रमाणे, खाजगी शैक्षणिक संस्थाही चांगली ग्रंथालयांच्या विकासाबाबतही विशेष धोरण व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. निश्चितच अशा शाळांमधून हुशार विद्यार्थी घडतात जे पुढे जाऊन स्वतःचा, शाळेचा आणि देशाचा गौरव करतात. मात्र देशात अशा शाळांची संख्या खूपच कमी आहे.

अनेक राज्यांतील शिक्षण व्यवस्थेत प्रचंड समस्या असून, त्या विकासात अडथळे ठरत आहेत. आजही अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधा नाहीत. वीज, शुद्ध पाणी, क्रीडांगण, क्रीडा साहित्य, प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा आणि भरभराटीचे ग्रंथालय यांचा अभाव आहे. काही ठिकाणी पदे रिक्त आहेत, अनेक पदांवर वर्षानुवर्षे भरती नाही, अनेक ग्रंथालयांमध्ये साहित्यासाठी निधी नाही तर काही ठिकाणी फर्निचर नाही, काही ठिकाणी उध्वस्त होत असलेल्या शाळा इमारती, तर कुठे तांत्रिक ज्ञान आणि कौशल्याबाबत अनभिज्ञ कर्मचारी असल्याचे दिसून येते. मोठी शहरे आणि महानगरांमध्ये परिस्थिती काहीशी चांगली आहे, परंतु ग्रामीण आणि दुर्गम मागास भागात शालेय शिक्षण आणि मूलभूत सुविधांची वानवा आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या पोर्टलवरून प्राप्त माहितीनुसार, राज्यातील ११११८७९ शाळांमध्ये सध्या २०९८९५७२ विद्यार्थी आहेत. यामध्ये खाजगी शाळा ६७८४२ तर खाजगी अनुदानित शाळा ४४०३७ आहेत. या दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये एकूण ६८६४९५ कर्मचारी असून त्यापैकी शिक्षक कर्मचारी ६१३१८१ तर शिक्षकेतर कर्मचारी ७३३१४ आहेत. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा जी.आर. जे २८ जानेवारी २०१९ रोजी प्रसिद्ध झाले होते, त्यानुसार खाजगी अनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या एकूण १६०० अर्धवेळ ग्रंथपालांच्या सेवानिवृत्तीनंतर ही पदे रद्द करण्यात येतील, असे त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

एकूण ४४०३७ खाजगी अनुदानित शाळांपैकी पूर्णवेळ ग्रंथपालांची केवळ २११८ पदे मंजूर करण्यात आली आहेत. म्हणजे दोन्ही मिळून केवळ ३७१८ ग्रंथालय कर्मचारी कार्यरत आहेत. या जीआरच्या तारखेपासून आतापर्यंत अनेक ग्रंथालय कर्मचारी निवृत्त झालेले असावेत, त्यामुळे ही संख्या आणखी कमी होते. यानुसार महाराष्ट्र राज्य शासनाच्या ४४०३७ खाजगी अनुदानित शाळांपैकी ४०३१९ शाळांमध्ये ग्रंथालय कर्मचारी कार्यरत नाहीत किंवा असे म्हणता येईल की, ग्रंथालय सेवेची सोयच नाही.

महाराष्ट्र सरकारने १००१ पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या हायस्कूलमध्येच ग्रंथपाल पदाचा नियम केला आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे की शाळेतील शिक्षकांच्या पगारावर सरकार दरमहा कोट्यवधी रुपये खर्च करते, परंतु ग्रंथालयाच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्याने लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन सेवा सुविधांपासून वंचित आहे.

महाराष्ट्र राज्यातील फार कमी शाळांमध्ये ग्रंथपाल आहेत. मी स्वतः सुद्धा महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित शाळांमध्ये ग्रंथालय पदांसाठी वर्षानुवर्षे भरती पाहिली नाही. शाळांमध्ये ग्रंथपाल नियुक्त करण्याबाबत संबंधित विभाग, प्रशासन, शासकीय अधिकारी उदासीन असल्याचेही स्पष्ट दिसून येत आहे. आश्चर्याची बाब म्हणजे विविध समित्या व आयोगांचे अहवाल, शासन निर्णय आदींनंतरही समृद्ध शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाचे सरकारी शाळांमध्ये ग्रंथपाल नेमण्याचे कोणतेही विशेष धोरण नाही. ग्रंथपालांशिवाय आजच्या शालेय विद्यार्थ्यांचे, म्हणजे उद्याचे भावी नागरिकांचे भवितव्य अंधारात असणार.

केवळ उच्च माध्यमिक शाळांशी संलग्न असलेल्या शाळांमध्येच ग्रंथपालाची नियुक्ती होऊ शकते, अशी खेदजनक स्थिती प्राथमिक शाळांमध्ये ग्रंथपालांसह ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. शाळेच्या पहिल्या वर्गापासूनच विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवेची सुविधा मिळावी.

देशातील एका राज्यातील सरकारी अनुदानित शाळांची ही बाब आहे, सर्वच राज्यातील परिस्थिती पाहिल्यास मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या भयावह ठरू शकते. अशा स्थितीत देशाची शिक्षण व्यवस्था कशी बळकट होणार आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशाच्या जोरावर होणार?

शालेय ग्रंथालयाच्या जाहीरनाम्यानुसार, प्रत्येक शाळेत पूर्णवेळ पात्र ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. शालेय ग्रंथालय विकास नियोजन आणि व्यवस्था ही महत्त्वाची जबाबदारी आहे. ग्रंथपालांना मदत करण्यासाठी पुरेसा सहायक कर्मचारीवर्ग नेमला जावा. भारतातील बहुतेक शालेय ग्रंथालये पात्र ग्रंथपालांद्वारे चालवली जात नाहीत असाही एक सामान्य समज आहे. जेव्हा ही सर्व ग्रंथालये प्रशिक्षित, कुशल, पात्र ग्रंथपालांद्वारे चालविली जातील, तेव्हा ग्रंथपालपदाची व्याप्ती, आकार आणि शालेय स्थिती बदलेल. एक वचनबद्ध केंद्र आणि राज्य सरकार, मजबूत शालेय ग्रंथालय संघटना, शालेय ग्रंथालयांबाबत राष्ट्रीय धोरण, एलआयएस अभ्यासक्रमात शालेय ग्रंथपालपदाचा समावेश आणि शालेय ग्रंथालयांवर एक मजबूत राष्ट्रीय मिशन असावे.

देशातील अशा शाळांमध्ये ग्रंथालयांची खरी समस्या काय आहे आणि त्यावर उपाय काय असू शकतो हे आपल्या सर्वांना माहीत आहे. समग्र शिक्षा अभियानाच्या यशस्वीतेसाठी आणि सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय विद्यालय संघटनेच्या धर्तीवर दर्जेदार शिक्षण आणि नोकरभरती राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक शालेय विद्यार्थ्याला त्याच्या मूलभूत सुविधा मिळण्याचा अधिकार आहे.

■ ■ ■ ■

# बालपण हरवलेला 'बालदिन'

*'लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा।।*
*ऐरावत रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार।।*
*ज्याचे अंगी मोठेपण। तया यातना कठीण।।*

या एका अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले कि त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले, तरी आजमितीला लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे.

देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ साजरा होणारा बालदिन दरवर्षी शाळांमध्ये उत्साहाने साजरा होतो. बालकांच्या हक्काचा वषार्तील हा एकमेव दिवस असला,तरी आजच्या लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे लक्षात येते.

विज्ञानाने जग प्रगतशील झाले असे म्हणतात; मात्र याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही यांसारख्या साधनांनी मुलांना वेगळ्याच जगात नेले. मित्र मैत्रिणींसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. ज्यामुळे हल्ली बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत. क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारे आई बाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांमधील त्यांच्याविषयीची प्रेम आणि आपुलकी कुठेतरी उणावू लागली आहे. त्यामुळे हल्लीची मुले पालकांना किंवा मोठ्यांना उलट उत्तरे देताना जराही विचार करत नाहीत.

सातत्याने हिंस्त्र व्हिडीओ गेम्स, रिल्स पाहून लहान मुलांमध्येही मनोविकार, दोष वाढू लागले आहेत. सध्याच्या स्पर्धात्मक जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक त्यांना शाळेसोबत कोचिंग क्लासेस, प्रायव्हेट ट्युशन्सना घालत आहेत. हे कमी म्हणून कि काय त्याच्या जोडीला जिम्नॅस्टिक, स्पोर्ट्स, सिंगिंग, डान्स क्लासेसनाही मुलांना जावे लागत आहे.

या सर्वांच्या ओझ्याखाली बालवयातच मुले राब-राब राबत आहेत. पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलताना मुलांचे बालपण मात्र हरवत चालले आहे. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे . बाल गुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक चढू लागला आहे. १०-१२ वर्षांची लहान मुले सुद्धा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी उलट बोलले, अपमान केला किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत.

बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी आज दुकानांत, चहाच्या टपरीवर, छोट्या कारखान्यांमध्ये लहान मुले राबताना दिसतात. सिग्नलवर, रेल्वे आणि बसेसमध्ये लहान मुलांकडून भीक मागून घेणे हाही एक व्यवसाय झाला आहे. मुलांचे हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे? पालकांचे, समाजाचे कि सरकारचे?

------------

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.

# मिरगी : सावध असायला हवे

एपिलेप्सी हा मेंदूचा आजार आहे, त्यामुळे जास्त ताणतणाव याला कारणीभूत ठरू शकतो आणि दौरे होऊ शकतात. जर तुम्हाला नीट झोप येत नसेल तर त्यामुळे मिरगीचा त्रासही होऊ शकतो.

प्रत्येकाचे स्वतःचे ट्रिगर असू शकतात. हे आपण स्वतःच्या अनुभवातून शोधले पाहिजे. समजा एखाद्याला कॉफी प्यायच्या दिवशी नेहमीपेक्षा जास्त फेफरे आली आणि त्याला अधिक समस्यांना तोंड द्यावे लागले. अशा परिस्थितीत, कॅफिन हा त्या व्यक्तीसाठी ट्रिगर पॉइंट असतो. त्याचप्रमाणे, सर्व रूग्ण स्वतःचे ट्रिगर पॉइंट शोधू शकतात आणि ते टाळून, ते काही प्रमाणात फेफरे नियंत्रित करू शकतात.

एपिलेप्सीच्या बहुतेक प्रकरणांमध्ये, चक्कर आल्यास कोणत्याही आपत्कालीन वैद्यकीय मदतीची आवश्यकता नसते. याचा अर्थ असाही होतो की जर एखाद्याला झटका येऊ लागला तर तो थांबवता येत नाही. या काळात झटका आलेल्या व्यक्तीच्या जवळ असाल तर पळून जाण्याऐवजी त्याच्या जवळ राहणे गरजेचे आहे.




झटका सौम्य असेल तर खालील गोष्टी लक्षात ठेवा.

झटका संपेपर्यंत आणि तो शुद्धीवर येईपर्यंत त्याच्याबरोबर रहा.

जेव्हा ती व्यक्ती शुद्धीवर येते तेव्हा त्याला सुरक्षित ठिकाणी न्या. शक्य असल्यास, त्याला त्याच्या घरी सुरक्षितपणे घेऊन जा.

या काळात तुम्ही शांत राहा आणि आजूबाजूच्या लोकांना शांत राहण्यास सांगा.

जेव्हा व्यक्ती शुद्धीवर येते तेव्हा त्याच्या आवश्यक औषधांबद्दल विचारून किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांशी फोनवर बोलून औषधे दिली जाऊ शकतात.

जर तुम्हाला टॉनिक-क्लोनिक दौरा असेल, म्हणजे अनियंत्रित धक्के असतील, तर तुम्ही पुढील गोष्टी करू शकता.

व्यक्तीला जमिनीवर आरामात झोपायला लावा.

त्याला श्वास घेण्यासाठी, झोपायला लावा.

जर झटके येत असतील तर ते सामान्य करण्याचा प्रयत्न करा.

कोणत्याही प्रकारची धोकादायक वस्तू दूर ठेवा.

व्यक्तीच्या डोक्याखाली काहीतरी मऊ ठेवा.

■ ■ क्रमशः ■ ■

## अशोकायन

### तुम मुझे..!

तुम मुझे खुन दो
मै तुम्हे आझादी दुंगा
असे आवाहन करताच
युवकांची आझाद हिंद सेना
झाली लढण्या तय्यार !

आज तुम मुझे व्होट दो
मै तुम्हे सब मोफत दुंगा
असे म्हणून जनतेला
दिशाहीन नेताजी
कां बनवत आहे
आळशी, षंढ, लाचार ?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# स्टिकर्स, संकल्प पत्र, फलकांद्वारे घरोघरी मतदार जागृती

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. १२:** विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मंगळवारी महापालिकेतर्फे घरोघरी स्टिकर्स, संकल्प पत्र व फलकांद्वारे मतदार जागृती करण्यात आली. लोकसभा निवडणुकीत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाचे उद्दिष्टसमोर ठेवण्यात आले. मात्र हे साध्य झाले नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत यापेक्षा जास्त मतदान होण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. मतदार साक्षरता अभियान अर्थात स्वीप (सिसस्टेमॅटिक व्होटर्स एज्युकेशन अँड इलेक्टोरोल पार्टीसिपेशन) अंतर्गत उपक्रम राबवण्यात येत आहेत. दरम्यान मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या भागातील



घरोघरी जाऊन मतदान जनजागृतीचे स्टीकर लावणे व मतदारांकडून संकल्प पत्र भरून घेणे तसेच संकल्प फलकांव्दारे मोठ्या प्रमाणात मतदार जनजागृती करण्याचे कार्य सुरू आहे. यासाठी मनपा उपायुक्त गीता ठाकरे यांच्या नियंत्रणाखाली राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, आशा सेविका आणि मनपा कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या ६५ पथक कार्यान्वित करण्यात आली आहेत. या पथकांद्वारे कमी मतदान असलेल्या मतदान केंद्र निहाय भागांमध्ये मतदारांना प्रत्यक्ष गृहभेट देऊन जनजागृती करण्यात येत आहे. यापूर्वी भिंतीचित्रांद्वारे जनजागृती विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाद्वारे शहरातील विविध भागात भिंतीचित्रांद्वारे मतदान जनजागृती करण्यात येत आहे. यापूर्वी महानगरपालिकेच्या दीनदयाल अंत्योदय राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कार्यालयाव्दारे शहरातील विविध भागात बैठका व रॅलीच्या सहाय्याने मतदान जनजागृती करण्यात आली. या प्रसंगी परिसरातील नागरिकांकडून मतदानाचे संकल्प घेण्यात येत आहे.

# आगीमुळे घरातील साहित्य जळून खाक

■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. १२ :** चिखली तालुक्यातील अंत्री खेडेकर येथील एका घराला शॉट सर्किटमुळे आग लागली. या आगीत घरातील साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेत घर मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून त्यांचे कुटूंब उघड्यावर आले आहे. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.

चिखली तालुक्यातील अंत्री खेडकर येथे दगडू खेडेकर हे आपल्या कुटुंबासह वास्तव्यात आहेत. त्यांचा एक मुलगा प्रल्हाद हा मुलाबाळांसह घराच्या पाठीमागेच राहतो. घरची परिस्थीती हलाखीची असल्यामुळे दगडु खेडेकर व त्यांची मुले दुसऱ्याच्या शेतात मोल मजुरी करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात. दरम्यान, सकाळीच घरातील कामे आटोपून त्यांची पत्नी प्लॉटच्या



कामाला गेली होती. मुलगा प्रल्हाद खेडेकर व त्याची दोन्ही मुले बाहेर खेळत होती.

काही वेळानंतर शॉट सर्किट होवून घराला आग लागली. अवघ्या काही वेळातच संपुर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

घराला आग लागल्याचे माहित पडताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेवुन पाण्याचा मारा सुरू केला. परंतु घरातून आगीचे लोळ उठत असल्याने त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले. या आगीत घरातील सोफा, दिवाण, कपडे कुलर, फ्रीज, कपडे, टिव्ही व इतर साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेत घर मालकाचे नुकसान झाले आहे. आगीची माहिती ग्रामपंचायत सदस्य भिका पाटील, संजय खेडेकर, राजू खेडेकर यांनी तलाठ्यास दिली. त्यानंतर ग्रामसेवक व कोतवाल यांनी पाहणी करून अहवाल तहसीलदारांना पाठवला. घर मालकास मदत देण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

## पत्नीवर दुसऱ्यांदा हल्ला ; पतीला जन्मठेप

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. १२ :** भातकुली तालुक्यातील बुधागड येथील एका व्यक्तीने त्याच्या पत्नीवर पाच वर्षांपूर्वी कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केला. त्यानंतर पत्नीला जखमी अवस्थेत सोडून घर पेटवून दिले होते. विशेष म्हणजेच याच व्यक्तीने त्यापूर्वी २००६ मध्ये पत्नीवर पहिल्यांदा कुऱ्हाडीनेच जीवघेणा हल्ला केला होता. त्यावेळी त्याला पाच वर्षांची शिक्षा झाली होती. दरम्यान त्याने दुसऱ्यांदा त्याच प्रकारचा गुन्हा केल्यामुळे येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्रमांक ) एच. एल. मनवर यांच्या न्यायालयाने त्याला मंगळवारी आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

विधी सूत्रांच्या माहितीनुसार, बंडू भीमराव खडसे (५३, रा. बुधागड) असे आरोपीचे नाव आहे. १० जानेवारी २०१४ रोजी रात्री बंडू खडसेने त्याची पत्नी सुनंदाच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर पत्नीला घरातच ठेवून राहते घर पेटवून दिले. नागरिकांनी आग विझवून सुनंदाला जखमी अवस्थेत घरातून बाहेर काढले. या प्रकरणी बंडू खडसेच्या मुलाने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी बंडू खडसेविरुद्ध गुन्हा दाखल केला. नंतर तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान सरकारी वकील मिलिंद जोशी यांनी युक्तिवाद केला. त्यांनी आठ साक्षीदारांच्या साक्ष तपासल्या. दरम्यान बंडू खडसेने गुन्हा केल्याचे सिद्ध झाल्याने न्यायालयाने त्याला आजन्म कारावास तसेच हजार रुपये दंडही ठोठावला आहे.

म्हणून आजन्म कारावास बंडू खडसेने ८ जानेवारी २००६ ला पत्नी सुनंदाच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. त्या प्रकरणी खोलापूर पोलिसात बंडूविरुद्ध गुन्हा दाखल होता. त्या प्रकरणात न्यायालयाने २५ जानेवारी २००७रोजी बंडूला पाच वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली होती. दरम्यान शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर बंडूने पुन्हा २०१४ मध्ये पत्नीवर त्याच प्रकारचा हल्ला करून तिला संपवण्याचा प्रयत्न करत घर पेटवले होते. एकच आरोपी ज्यावेळी एकाच व्यक्तीवर हल्ला करतो किंवा एकसारखा गुन्हा करतो, त्यावेळी त्याला आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली जाते. त्यामुळेच न्यायालयाने त्याला आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली.

# एकादशीनिमित्त श्रीं'च्या पालखीची मंदिर परिक्रमा

■ महासागर प्रतिनिधी,
**शेगाव , दि. १२:** प्रबोधिनी एकादशी सोहळा श्री गजानन महाराज संस्थान च्या वतीने पारंपरिक पद्धतीने विविध धार्मिक कार्यक्रमांनी आज मंगळवार नोव्हेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

जय हरी विठ्ठल, श्री हरी विठ्ठल, जय गजानन श्री गजाननचा गजर करत शेगाव येथे पन्नास हजाराहून अधिक भाविकांच्या उपस्थितीत आज १२ नोव्हेंबर रोजी कार्तिक एकादशीचा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी हजारोंच्या वर भाविकांनी श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. कार्तिक एकादशी निमित्त आज श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा काढण्यात आली. दरम्यान, आज सकाळी ४ वाजे पासूनच श्री संत गजानन महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. कार्तिक एकादशी निमित्त आज



सायंकाळी ५ वाजता टाळ, मृदंगाच्या निनादात व हरिनामाच्या गजरात श्रीची पालखी मंदिर परिक्रमेसाठी मार्गस्थ झाली टाळकरी, वारकरी, पताका धारी वारकऱ्यांचा सहभाग पालखी सोबत होता. तत्पूर्वी संस्थानच्यावतीने श्रींच्या रजत मुखवट्याचे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात पारंपारीक पूजन केले. त्यानंतर श्री विठ्ठलाच्या तैल चित्राचे पूजन करण्यात आले. गण गण गणात बोते मंत्राचा नाम जप करीत श्रींची पालखी



मंदिरात दाखल झाली.

# प्रकाश आंबेडकर, वंचितबाबत आक्षेपार्ह पोस्ट कारवाई करण्यासाठी युवा आघाडीची पोलिस ठाण्यावर धडक

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. १२ :** प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीबाबत सामजमाध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट टाकण्यात आल्याने मंगळवारी युवा आघाडी आक्रमक झाली. पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी थेट सिव्हील लाइन्स पोलिस ठाण्यात धाव घेत आक्रमक पवित्रा घेतला. पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली असून, तातडीने गुन्हा दाखल करून कारवाई न केल्यास जिल्हा जाम करण्याचा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीने दिला आहे. यावर ठाणेकरांकडून बुधवारी संध्याकाळपर्यंत चौकशीचे आश्वासन देण्यात आले. सध्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुराळा उडत आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.



प्रकाश आंबेडकर यांचे विरोधात बदनामी करणारी तर पोलिस जबाबदार निवडणुकीत गैरप्रकार करून, खोटा प्रचार करून मतदारांची दिशाभूल करण्यात येत आहे असल्याचा आरोप वंचितने केला आहे. निवडणूक प्रक्रियेत बाधा निर्माण करून एका विशिष्ट राजकीय पक्षाला राजकीय फायदा व्हावा, अशा पद्धतीने सदर पोस्ट करण्यात आली आहे.त्यामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट आहे. तातडीने कठोर कारवाई न झाल्यास सबब शांतता सुव्यवस्था बिघडू शकते व याला जबाबदार पोलिस प्रशासन राहिल, असा इशाराही वंचितने दिला आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **KHAN SHABAN ISRAFEEL.** NOW MY NEW NAME IS **SHABAN KHAN ISRAFEEL KHAN PATHAN.**
**ADD. :** NAGSENVAN LAST BUS STOP, DR. AMBEDKAR MARG, NAGPUR 440017 MS.

MY OLD NAME WAS **SHAKIL.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHAKIL.**
**ADD :** PLOT NO.131, WATHODA LAYOUT, MURLINANDAN NAGAR, NAGPUR MS.

MY OLD NAME WAS **ANJUM.** NOW MY NEW NAME IS **ANJUM KAUSAR.**
**ADD :** PLOT NO.131, WATHODA LAYOUT, MURLINANDAN NAGAR, NAGPUR MS.

## गुन्हेगारांवर वार, एका दिवसात 'तडीपार'; नागपूर पोलिसांचा गुन्हेगारांवर जोरदार हंटर

**नागपूर :** भयमुक्त वातावरणात गुन्हेगारीमुक्त व पारदर्शक निवडणूक पार पडावी यासाठी नागपूर पोलिसांनी शहरातील गुन्हेगारांवर जोरदार हंटर उगारला. विशेषमोहीमराबवतपोलिसांनी गुन्हेगारांवर एकाच दिवसात तडीपारीची कारवाई केली. हा नागपूर पोलिसांचा अनोखा विक्रमच ठरला असून यामुळे गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे. निवडणुकीच्या काळात गुन्हेगार सक्रिय होतात व राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या माध्यमातून प्रभाव दाखविण्याचा प्रयत्न करतात. अनेक जण छुप्या पद्धतीने काम करत असतात. यामुळे गुन्हेगारीचा धोका तर असतोच, शिवाय निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पाडणे अडचणीचे ठरते. या बाबी लक्षात घेऊन नागपूर पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली व गुन्हेगारांविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले.

# रुग्णाची व्याधी समजून त्याला औषधोपचार, मानसिक बळ द्या

### इफेक्टिव्ह लिसनिंग स्किलवर व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. १२:** रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील नाते अत्यंत महत्वाचे आहे. रुग्णाची नेमकी व्याधी समजून घेत त्याला औषधोपचारासोबतच मानसिक बळ देणे आवश्यक असते. भविष्यात डॉक्टर झाल्यानंतर तुम्हाला याची अनुभूती येईल. परंतु तुम्ही आतापासूनच तयारी केली, तर एक चांगले डॉक्टर म्हणून उदयास याल, असा आशावाद व्यक्त करतानाच तशी खात्री अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे ओएसडी रवींद्र धुरजड यांनी व्यक्त केली.

अमरावतीत नव्यानेच सुरु झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (जीएमसी) सभागृहात आज, सोमवारी विद्यार्थ्यांसाठीचे पहिले अतिथी व्याख्यान झाले. यावेळी धुरजड इफेक्टिव्ह लिसनिंग स्कील या विषयावर ते बोलत होते.

अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले अध्यक्षस्थानी होते. गेल्या आठवड्यात सुरू झालेल्या जीएमसीमध्ये सध्या १० दिवसीय फाउंडेशन कोर्स सुरू आहे. त्याअंतर्गत या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

रवींद्र धुरजड यांची पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. नवनिर्मित वैद्यकीय महाविद्यालयाचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन करत त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तासाभराच्या व्याख्यानादरम्यान त्यांनी रुग्ण



आणि डॉक्टरांदरम्यानचा आभासी संवाद निर्माण करत अनेक पैलूंना स्पर्श केला.

डॉक्टरांमार्फत रुग्णांशी होणारा थेट संवाद, रुग्णाच्या हालचालींवरून ओळखायची लक्षणे, त्याची व्याधी ओळखाण्याबाबत वापरावयाची कौशल्ये आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रुग्णाला ऐकून घेण्याची (लिस्निंग) तऱ्हा याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपअधिष्ठाता डॉ. नितीन अंभोरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मिनोती पोकळे यांनी केले.

आभार प्रा. डॉ. कुमुद हरले यांनी मानले. या वेळी विभागप्रमुख डॉ. सुधीर पंडील व डॉ. अरुण तडस, प्रा. डॉ. आशिता कावरे, डॉ. अर्चना मंडपे, डॉ. वीरेंद्र जाधव, डॉ. प्रतिक ब्राम्हणे, प्रशासकीय अधिकारी संजय मैदानकर, कल्याणी अजमिर उपस्थित होते.

डॉ. सावजी, डॉ. सातव यांचे १८ ला व्याख्यान फाउंडेशन कोर्सच्या अनुषंगाने १८ नोव्हेंबरला प्रयास संस्थेचे डॉ. अविनाश सावजी आणि मेळघाटातील महान संस्थेचे डॉ. आशिष सातव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही व्याख्याते वेगवेगळ्या विषयांची मांडणी करणार आहेत.

# राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलन

समस्यांवर प्रबोधन करणारी सामाजिक प्रबोधन मालाही ते स्वत: सादर करतात.



### अध्यक्षपदी प्रा.अरुण बुंदेले यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. १२ :** २३ व्या राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त प्राध्यापक तथा कवि, अभंगकार अरुण बुंदेले यांची निवड करण्यात आली आहे. आगामी२६ व २७नोव्हेंबर रोजी आयोजित हे संमेलन मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे होईल. सर्वोदय शिक्षण समितीद्वारा संचालित महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच वऱ्हाड विकास परिवाराने या संमेलनाचे यजमानपद स्वीकारले आहे. बुंदेले यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीचा ठराव समाजभूषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड यांनी मांडला. त्याला उपस्थित सर्व सहकाऱ्यांनी अनुमोदन दिल्यानंतर ही घोषणा करण्यात आली. या निवडीबद्दल बुंदेले यांचे उपेक्षित समाज महासंघाचे सदस्य भगवान बुंदेले, शरद गढीकर, सत्यशोधक समाज समितीचे अध्यक्ष विनोद इंगळे, गझलकार देविलाल रौराळे, विद्रोही कवी प्रवीण कांबळे आदींनी अभिनंदन केले आहे.

### अशी आहे बुंदेले यांची साहित्य संपदा

अभंगकार प्रा.अरुण बुंदेले यांची सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक विषयावरील निखारा व अभंग तरंग या दोन काव्यसंग्रहासह अकरा पुस्तके प्रकाशित झालेली असून चार पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांची शैक्षणिक प्रबोधन माला विविध शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवृद्धीसाठी वापरली जाते.

शिवाय समाजातील विविध

## कार्यालय नगरपंचायत हिंगणा
### ता. हिंगणा, जि. नागपूर

याद्वारे नागरिकांना सुचित करण्यात येते आहे की, नगरपंचायत हिंगणा परिसरातील खालील नमुद केलेल्या मालमत्तेचे फेरफार करण्याबाबत अर्जदारांनी कार्यालयात अर्ज सादर केलेले आहे. दिनांक : १३.११.२०२४

| अ.क्र | मालमत्ता धारकाचे नाव | मालमत्ता/प्लॉट क्र. | प.ह.नं. | अर्जदाराचे नाव | सादर केलेले दस्तावेज |
|---|---|---|---|---|---|
| १ | आशिष नारायण मेश्राम तर्फे नितीन नामदेव इंगळे तर्फे रामचंद्र नत्थुजी आंबुलकर | ४२७६/६७ | ४९ | आकाश सुधाकर उमरेडकर, निलेश हरिभाउ उमरेडकर | विक्रीपत्र |
| २ | लक्ष्मण कृष्णराव दलाल | ४६३२/२८ | ४९ | रेखा सिताराम लामतुरे | विक्रीपत्र |
| ३ | १) अरविंद महादेव पिसाळ 2) कृणाल गजानन पिसाळ व इतर | ४६८७/२६ | ४९ | तुकाराम केशव काकडे | विक्रीपत्र |
| ४ | १) अरविंद महादेव पिसाळ 2) कृणाल गजानन पिसाळ व इतर | ४६८८/२७ | ४९ | तुकाराम केशव काकडे | विक्रीपत्र |
| ५ | इंदीरा जवाहरलाल गुंजरकर | २९७०/२१ | ४९ | अभिजित संजय चवरे | रजिस्टर दुरूस्तीपत्र |
| ६ | सुधिर दत्तोपंत मोहरीर | २९९९/१० | ४९ | प्रविण श्रीराम बुटटे | विक्रीपत्र |
| ७ | प्रांजल बबनराव मालखेडे | ३३६०/८४ | ४९ | आसाराम रूपचंद जाधव | विक्रीपत्र |
| ८ | श्रावण गणबा रंदई | ६५१/अ | ४९ | वैशाली गणेश ढोणे | नोटरी संमतीपत्र |
| ९ | कांताबाई भैय्याजी दुवे | २४९९/३६ | ४९ | अर्चना नामदेव मडावी | विक्रीपत्र |
| १० | तसब्बुर मुजफ्फर खान | ५३२८/८ | ४९ | मोहसिना आसिफ शेख | विक्रीपत्र |
| ११ | शंकर नत्थुजी वाघमारे | ४२६६/६६ | ४९ | शोभा नरेन्द्र माहुरे | विक्रीपत्र |
| १२ | मनोज नामदेव भाकरे | २९७९/२६ | ४९ | सतीश नारायण बावणकुळे | विक्रीपत्र |
| १३ | एकनाथ आनंदराव चपटकर | ३११८/२३/अ | ४९ | प्रविण एकनाथ चपटकर | नोटरी |
| १४ | प्रदिप दादारावजी बुधे | ४२१९/९० | ४९ | रिना आशिष वैद्य | विक्रीपत्र |
| १५ | संदीप गोपीचंद बडवाईक व इतर | ५२२९/४८ | ४९ | हरीषकुमार मनोहर घावेकर | विक्रीपत्र |
| १६ | संदीप गोपीचंद बडवाईक व इतर | ५२२९/४८ | ४९ | हरीषकुमार मनोहर घावेकर | विक्रीपत्र |
| १७ | लक्ष्मण कृष्णराव दलाल | ४६६०/५६ | ४९ | अर्चना सुनिल बोंदाडे | विक्रीपत्र |
| १८ | रामभाउ श्रीराम बिडवाईक | ५४६४/९ | ४९ | धर्मेंद्र संतोष पोइनकर | विक्रीपत्र |
| १९ | जिजाबाई मनोहर बनसुले व इतर | ५४३३/३१ | ४९ | कमल अशोक तिजारे | विक्रीपत्र |
| २० | गोमा व्यंकटराव सहारे | ९६८ | ४९ | १)कलावती गोमाजी सहारे २) प्राचु गोमाजी सहारे | ॲपेडेव्हिड वारसाण प्रमाणपत्र |
| २१ | सौ. शेख मुनताज शेख ईसाक तर्फे शेख ईसाक शेख सरदार | ५४००/४ | ४९ | आकाश सुधाकर उमरेडकर | विक्रीपत्र |
| २२ | सुकराम गणपत टिपले | ३९३६/५१/१ | ४९ | निकीता निलेश अवचट | विक्रीपत्र |

उपरोक्त नमुद मालमत्ते वरील वारसान व त्या व्यतिरिक्त त्यांचा हक्क त्यांनी सदर्हु मालमत्तेबाबत कोणताही आक्षेप असल्यास हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन आवश्यक दस्ताऐवजासह लेखी आक्षेप ७ दिवसाचे आत मुख्याधिकारी नगरपंचायत हिंगणा ला सादर करावा.

नमुद मुदतीच्या आत कोणत्याही स्वरूपाने आक्षेप प्राप्त न झाल्यास वर नमुद अर्जाचे अनुषंगाने दायीत्व बदलविण्याचा निर्णय घेण्यात येईल, तरी सबंधीतांनी नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिंगणा

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भूमीच्या अपेक्षा

बॉलिवूडमधल्या नातेसंबंधांबाबत सतत चर्चा होत असते. इथे कोणाचं कोणासोबत कधी सूत जुळेल आणि कोणाचं कधी बिनसेल हे सांगता येत नाही. त्यातच पती-पत्नीचं नातं हे पूर्णपणे वेगळं असतं. या नात्याकडून प्रत्येकाच्याच काही अपेक्षा असतात. अभिनेत्री भूमी पेडणेकरच्या नातेसंबंधांबाबत काही अपेक्षा आहेत. या अपेक्षा तिने व्यक्त केल्या आहेत. आपल्या आयुष्यात प्रेम फुलावं, संसार सुखाचा व्हावा, असं प्रत्येकीलाच वाटत असतं. बॉलिवूड अभिनेत्रीही याला अपवाद नाहीत. बॉलिवूडमधल्या अनेक अभिनेत्रींनी संसार थाटला. अनेक जणी सुखाने संसार करत आहेत. मुलांना खेळवत आहेत. भूमी पेडणेकरही प्रेम, नातेसंबंध याबाबत व्यक्त झाली आहे. तिला याबाबत अनेकदा विचारणा होत असते. आता तिने याबाबत दिलखुलास उत्तरे दिली आहेत. आपल्याला कशाचीच घाई नसल्याचं तिने म्हटलं आहे. योग्य व्यक्तीवर प्रेम जडणं महत्त्वाचं असतं, असं तिचं म्हणणं आहे. भूमी म्हणते, योग्य माणसाशी लग्न होणं खूप गरजेचं आहे. कारण आता मला पुन्हा वाईट नात्यामध्ये अडकायचं नाही. ती सांगते, माझं लग्न कधी होईल हे माहीत नाही. ते आजपासून दहा वर्षांनी, वीस वर्षांनी किंवा अगदी उद्याही होऊ शकतं. पण त्यासाठी योग्य व्यक्ती आयुष्यात यायला हवी. डेटिंगबद्दलही ती आपली मतं व्यक्त करते. डेटिंग म्हणजे फक्त दुसऱ्या माणसासोबत वेळ घालवणं नाही तर स्वत:ला जाणून घेणं. स्वत:सोबत वेळ घालवणं, असं भूमी सांगते. तुमच्या आयुष्याच्या प्रवासात आनंद शोधणं हे खऱ्या अर्थाने डेटिंग आहे, असं भूमीचं म्हणणं आहे. तसंच दिसण्यापेक्षाही व्यक्तिमत्त्व महत्त्वाचं ठरतं, असंही भूमी सांगते. भूमीने आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे तिला हवी तशी व्यक्ती तिच्या आयुष्यात यावी, अशी आपण आशा करू या.






## दिवाळी धमाका!

बॉक्स ऑफिसवर सध्या 'कांटे की टक्कर' पहायला मिळते आहे. 'सिंघम अगेन' आणि 'भुलभुलैय्या २' हे दोन्ही बिग बजेट आणि बहुप्रतिक्षित चित्रपट एकाच दिवशी प्रदर्शित झाले. या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दिवाळी धमाका केला आहे, असं म्हणायला हरकत नाही. दिवाळीच्या मुहुर्तावर प्रदर्शित झालेले 'भुलभुलैय्या ३' आणि 'सिंघम' अगेन एकमेकांना चांगलीच टक्कर देताना दिसत आहेत. कार्तिक आर्यनच्या 'भुलभुलैय्या ३' ने ११ दिवसात २२२.७६ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. या चित्रपटाने पहिल्याच आठवड्यात १६८.८६ कोटी रुपयांचा व्यवसाय केला. 'भुलभुलैय्या ३' आणि 'सिंघम' अगेन हे दोन्ही चित्रपट एक नोव्हेंबरला दिवाळीच्या मुहुर्तावर प्रदर्शित झाले. या दोन्ही चित्रपटांबाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. त्यामुळे या दोनपैकी कोणता चित्रपट बाजी मारणार याबाबत कुतुहल निर्माण झालं होतं. मात्र हे दोन्ही चित्रपट एकमेकांना टक्कर देत असल्याचं बॉक्स ऑफिसवरील आकड्यांवरून दिसून येत आहे. सुरूवातीला 'भुलभुलैय्या ३' ने ॲडव्हान्स बुकिंगमध्ये आघाडी घेतली होती. 'सिंघम अगेन'ही फारसा मागे नव्हता. या चित्रपटानेही बॉक्स ऑफिसवर दमदार सुरूवात केली. मात्र संमिश्र प्रतिक्रियांमुळे 'सिंघम अगेन'च्या तिकिटविक्रीवर परिणाम झाल्याचं दिसून आलं. दरम्यान मागील ११ दिवसात ९६ लाख लोकांनी 'भुलभुलैय्या ३' पाहिल्याचं एका आकडेवारीवरून समोर आलं आहे. दिवाळीच्या मुहुर्तावर प्रदर्शित झालेल्या आणि चांगली कामगिरी करणाऱ्या चित्रपटांमध्ये 'भुलभुलैय्या ३' चा समावेश झाला आहे. प्रेक्षकसंख्येच्या बाबतीत 'भुलभुलैय्या ३' ने 'आमरण' आणि 'लकी भास्कर' या दाक्षिणात्य चित्रपटांना मागे टाकलं आहे. मात्र 'सिंघम अगेन'ने प्रेक्षकसंख्येच्या बाबतीत 'भुलभुलैय्या ३' ला मागे टाकल्याचं दिसून येत आहे. या चित्रपटाने प्रेक्षकसंख्येअ च्या बाबतीत एक कोटींचा आकडा पार केला आहे. कमाईच्या बाबतीत सांगायचं तर 'सिंघम अगेन'ने अकरा दिवसांमध्ये २३०.३० कोटी रुपयांची कमाई केली आहे. 'सिंघम अगेन'ने कमाईच्या बाबतीत हृतिक रोशनच्या 'फायटर'ला मागे टाकलं असून आता तो 'स्त्री २' नंतरचा यंदाचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. समिक्षक तसंच प्रेक्षकांच्या संमिश्र प्रतिक्रिया आणि 'भुलभुलैय्या ३' च्या स्पर्धेमुळे 'सिंघम अगेन'ची कमाई तुलनेने कमी राहिल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे. या दोन चित्रपटांच्या निमित्ताने दिवाळीच्या मुहुर्तावर बॉक्स ऑफिसवर तगडी स्पर्धा पहायला मिळाली. 'स्त्री २' ला मिळालेल्या तुफान यशानंतर हॉरर कॉमेडीला चांगले दिवस आले आहेत. त्यातच 'भुलभुलैय्या' फ्रँचायजीबाबत लोकांमध्ये प्रचंड उत्सुकता पहायला मिळाली आहे. सकारात्मक परिक्षणांचा लाभ 'भुलभुलैय्या ३' ला मिळाला आहे. रोहित शेट्टीच्या 'सिंघम' फ्रँचायजीचंही प्रेक्षकांना आकर्षण आहे. या चित्रपटांमधली जबरदस्त ॲक्शन प्रेक्षकांना भुलवते. त्यामुळे हे दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरल्याचं दिसून येत आहे.



## ट्रेंड रि-रिलिजचा

अनेक हिंदी चित्रपट चित्रपटगृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित केले जात आहेत. या चित्रपटांना चांगला प्रतिसादही मिळत आहे. प्रेक्षकांनी पुन्हा एकदा चित्रपटगृहांकडे वळावं, यासाठी हा प्रयत्न केला जात आहे. त्यातच आता प्रेक्षकांनी पुन्हा एकदा टीव्हीकडे वळावं यासाठी जुन्या मालिका पुन्हा प्रदर्शित केल्या जात आहेत. जुनं ते सोनं असं म्हटलं जातं. अनेक जुने चित्रपट पुन्हा पुन्हा पाहिले जातात. हे चित्रपट बघताना प्रेक्षकांना कंटाळा येत नाही. त्यातच सध्या ओटीटीमुळे चित्रपटगृहांकडे वळणाऱ्या प्रेक्षकांची संख्या कमी झाली आहे. बॉलिवूडपटांना मर्यादित यश मिळताना दिसत आहे. त्यामुळे जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याचा ट्रेंड गेल्या काही महिन्यांपासून पहायला मिळतो आहे. यात अगदी जुन्या चित्रपटांपासून एक-दोन वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या चित्रपटांचाही समावेश आहे. ओटीटीमुळे टीव्हीची प्रेक्षकसंख्याही कमी होते आहे. त्याच त्या रटाळ, एकसुरी मालिका बघण्याचा प्रेक्षकांनाही कंटाळा येत असल्याचं चित्र आहे. प्रेक्षकांना पुन्हा टीव्हीकडे वळवण्यासाठी वाहिन्या हीच रि-रिलिजची शक्कल लढवत आहेत. 'बडे अच्छे लगते हैं' ही एकेकाळी तुफान गाजलेली मालिका पुन्हा प्रदर्शित केली जात आहे. विशेष म्हणजे या मालिकेला रात्री आठचा प्राईम टाईम मिळाला आहे. राम कपूर आणि साक्षी तंवर अभिनित या मालिकेला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला होता. ही मालिका पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आली असून त्यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार आहे. यासोबतच 'सीआयडी' आणि 'आहट' या एकेकाळी गाजलेल्या मालिका मराठीत डब करण्यात आल्या असून त्यांचंही पुन्हा प्रक्षेपण सुरू झालं आहे. 'सीआयडी' या मालिकेने जवळपास २० वर्ष प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. यातले एसीपी प्रद्युम्न, इन्पेक्टर दया, अभिजीत, डॉक्टर साळुंखे ही पात्र घराघरात पोहोचली होती. आता हीच मालिका मराठी प्रेक्षकांना आपल्या भाषेत बघता येणार आहे. 'आहट' या मालिकेचा थरारही मराठी अनुभवता येणार आहे. हिंदी 'आहट'ला प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला होता. या मालिकेने हॉरर मालिकांच्या विश्वात नवी क्रांती केली होती. त्यानंतर आता ही मालिका मराठी प्रेक्षकांना पाहता येणार आहे. या प्रयोगाला यश मिळालं तर प्रेक्षकांना काही जुन्या मालिका पुन्हा पहायला मिळू शकतात.



## विकीचा 'महावतार' लूक


अभिनेता विकी कौशलचा 'छावा' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. विकीचा हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असताना आता अजून एका नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. या चित्रपटातील विकी कौशलचा फर्स्ट लूक शेअर करण्यात आला. त्याचा हा लूक पाहून प्रेक्षकांना धक्काच बसला आहे. विकी कौशलच्या आगामी चित्रपटाचे नाव आहे 'महावतार'. हा सिनेमा पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. सात चिरंजीवींमधील एक 'परशुराम' यांच्यावर हा सिनेमा आधारित आहे. विकी कौशलचा सिनेमातील लूक रिव्हील करण्यात आला. 'छावा'चे निर्माते दिनेश विजन यांच्याच मॅडॉक फिल्म्सने 'महावतार'ची निर्मिती केली आहे. शस्त्र, शास्त्रात पारंगत, अधर्मीयांचा नाश, निसर्ग संवर्धनाला हातभार, स्त्रीसबलीकरणाला प्रोत्साहन, वैदिक धर्माचा प्रसार आणि मातृ पितृ भक्ती अशी ख्याती असलेले भगवान परशुराम यांच्यावर हा चित्रपट बनवण्यात येणार आहे. रिव्हील केलेल्या लूक पोस्टरमध्ये लांब दाढी- केस, भगवे कपडे, हातात परशु, डोळ्यात आग असा महावताराचाच लूक विकीचा दिसत आहे. मॅडॉक फिल्म्स आणि विकी कौशलने सोशल मीडियावर फर्स्ट लूक शेअर केला आहे. 'महावतार' हे सिनेमाचं टायटलही घोषित करण्यात आलं आहे. धर्माचं रक्षण करणारा योद्धा चिरंजीवी परशुराम यांची कहाणी असं त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं आहे. 'महावतार' मधील लूक मध्ये विकी कौशल अजिबातच ओळखू येत नाहीये. विकीचा हा लूक पाहताच नेटकऱ्यांना धक्काच बसला. 'फक्त विकीच या भूमिकेला न्याय देऊ शकतो' अशी कमेंटही केली आहे. 'महावतार' पुढील वर्षी डिसेंबर मध्ये रिलीज होणार आहे. अमर कौशिक यांनी सिनेमाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी घेतली आहे. विकी कौशलचा 'छावा' सिनेमाही पुढील महिन्यात प्रदर्शित होत आहे. यामध्ये त्याने छत्रपती संभाजी राजांची भूमिका साकारली आहे. दिनेश विजननेच सिनेमाची निर्मिती केली असून लक्ष्मण उतेकर यांनी दिग्दर्शन केले आहे. दरम्यान विकीचा हा लूक पाहून विकीच्या 'महावतार' या चित्रपटासाठी प्रेक्षकांमध्ये एक वेगळीच उत्सुकता आणि कुतूहल दिसत आहे.



## 'कंतारा पार्ट १'साठी उभारलं भव्य साम्राज्य

'कंतारा पार्ट १' साठी उभारलं भव्य साम्राज्य २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कांतारा' या चित्रपटावर जगभरातून कौतुकाचा वर्षाव करण्यात आला. या चित्रपटाने ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला. याच चित्रपटासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. चित्रपटानं भारताच्या मध्यभागी असलेली एक विलक्षण कथा आणली देशाला समृद्ध वारसा आणि सांस्कृतिक मूल्यांची जगाला ओळख करून दिली. चित्रपटाचा प्रीक्वल 'कांतारा चॅप्टर १'च्या घोषणेपासून सगळ्यांनी पुन्हा एकदा या चित्रपटाबद्दल उत्सुकता दाखवली आहे. 'कांतारा अध्याय १' हा एक अद्भूत प्रकारचा अनुभव असल्याचं वचन देतो. हा चित्रपट कर्नाटकातील कदंब काळातील आहे. कदंब हे कर्नाटकातील काही भागांचे महत्त्वपूर्ण शासक होते आणि त्यांनी या प्रदेशातील वास्तुकला आणि संस्कृतीला आकार देण्यात मोठी भूमिका बजावली. हा काळ मोठ्या पडद्यावर पुन्हा निर्माण करण्यासाठी निर्माते, होंबळे फिल्म्स आणि अभिनेता ऋषभ शेट्टी यांनी कुंदापूर येथे कदंब साम्राज्य जीवंत केले आहे.

निर्मात्यांनी या कथेला जिवंत करण्यासाठी खूप प्रयत्न केले असून अगदी चित्रपटासाठी संपूर्ण स्टुडिओ तयार करण्यापर्यंत खूप मेहनत घेतली आहे. सुरुवातीला, त्यांनी एक विस्तृत सेटिंग तयार करण्यासाठी ८० फूट उंचीचा एक भव्य सेट शोधला परंतु त्यांना तो योग्य वाटला नाही. त्यामुळे त्यांनी एक पाऊल पुढे टाकून स्वतःचा स्टुडिओ बांधला. या प्रीक्वल मधून चित्रपटाच्या विविध बाजू दिसणार आहेत. निर्माते या युगाची पुनर्निर्मिती करण्यासाठी कोणतीही कसर सोडत नसून ते हा चित्रपट साकारण्यासाठी अनेक आव्हाने स्विकारत आहेत.



## 'आनंदडोह' ची घोषणा

संत विचारांवर महाराष्ट्र समृध्द झाला आहे. या संतांनी अभंग-श्लोक-ओव्या अशा रचनांमधून साहित्याचा अलौकिक ठेवा मराठी भाषेला दिला. अध्यात्म, रुढी-परंपरांकडे पाहण्याची एक निर्मळ दृष्टीही आपल्याला दिली. आजच्या काळात या दृष्टीची आपल्याला नितांत आवश्यकता आहे. 'शिवराय अष्टक' नंतर आता संत साहित्याचे समृद्ध संचित घराघरांमध्ये पोहोचावे यासाठी त्यांनी पाऊल उचलले आहे. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाच्या निर्मितीनंतर, आता जगदगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेवरील 'आनंदडोह' ची घोषणा केली. 'साईराम एंटरप्राईजेस' निर्मित, योगेश सोमण लिखित आणि दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'आनंदडोह' हा भव्य मराठी चित्रपट २०२५ मध्ये प्रेक्षक भेटीला येणार आहे. मुक्ता बर्वे, योगेश सोमण, अजय पूरकर, समीर धर्माधिकारी, आदिनाथ कोठारे असे मराठीतले नामवंत कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत.

जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची अभंगगाथा हा मराठी साहित्यातील फार अनमोल ठेवा आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेशी झगडताना त्यांनी बहुजन समाजाला ज्ञानमार्ग दाखवतील असे अनेक अभंग रचले. यातले अनेक अभंग म्हणींच्या स्वरूपात सुद्धा अलंकृत झालेले पहायला मिळतात. संत तुकाराम महाराजांची ही गाथा इंद्रायणी नदीच्या डोहात बुडविण्यात आली. संत तुकारामांच्या भक्तीचा चमत्कार म्हणून हे अभंग इंद्रायणीतून तरले, असे सांगण्यात येते. हीच अद्वित्तीय अभंगगाथा इंद्रायणी डोहात बुडल्यापासून ते तरल्या पर्यंतच्या तेरा दिवसात जगदगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, त्यांची पत्नी आवली, त्यांचे कुटुंब,संपूर्ण तत्कालीन समाज आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पाईक या सगळ्यांवर काय परिणाम झाला याची कथा 'आनंदडोह' चित्रपटात असणार आहे.






# फोडाफोडीच्या राजकारणामुळे त्यांची विश्वसनीयता कमी

## सुप्रिया सुळे यांनी हाणला टोला..

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :
विरोधी पक्ष नेते असताना देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खूप आदराने बघितले जात होते, मात्र त्यांनी जेव्हा मी दोन पक्ष फोडून आलो, असे वक्तव्य केले ते आम्हाला अपेक्षित नव्हते. राज्यात महायुती सरकार आल्यानंतर त्यांच्याविषयी विश्वसनीयता कमी झाली, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) नेत्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.

हिंगणा विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रमेश बंग यांच्या प्रचारासाठी त्या नागपुरात आल्या असता त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

मला खरेतर देवेंद्र फडणवीस यांच्याकडून खूप अपेक्षा होती. आघाडी सरकार असताना विरोधी पक्ष नेते म्हणून काम करीत होते, त्यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या, युवा कर्तुत्ववान नेता पाच वर्ष मुख्यमंत्री म्हणून काम केले होते, अशा युवा नेत्याकडून विरोधात असले तरी अपेक्षा होत्या. विरोधक दिलदार असावा तेव्हा राजकारण करताना मजा येते होती, मात्र त्यांनी पक्ष फोडाफोडीचे राजकारण केले हे राज्यातील जनतेला पटणारे नाही, यामुळे त्यांची विश्वसनीयता कमी झाली, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.



सिंचनासंदर्भात ७० हजार कोटीचे आरोप फडणवीस यांनी अजित पवार आणि राष्ट्रवादीवर केले होते. त्या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. जे आरोप झाले होते त्याबाबतीत पुढाकार फडणवीस यांनी घेतला पाहिजे. खरे तर फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री होते त्याचवेळी या प्रकरणाची चौकशी होणे अपेक्षित होते.

फडणवीस यांनी गोपनीयतेची शपथ घेतली, ज्या व्यक्तीवर, पक्षावर आरोप केले,त्या व्यक्तीला घरी बोलावून त्यांनी फाईल दाखवली, मुख्यमंत्र्याच्या घरात बसून अजित पवारांना ती फाईल दाखवली, हे मी म्हणत नाही तर अजित पवार स्वतः म्हणाले होते. आम्हाला भ्रष्टाचारी म्हणून म्हटले जात असेल तर आता भ्रष्टाचार मुक्त भारताचे काय झाले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**पवारांविषयीचे वक्तव्य दुर्दैवी**
शरद पवार यांची शेवटची निवडणूक असल्याचे वक्तव्य सत्तापक्षाकडून केले जात असेल तर दुर्दैव आहे. कुठलाच वैरी असे म्हणणार नाही. गेल्या सहा दशकाच्या राजकारणात शरद पवारांनी कधीही मतदारांना भावनिक केले नाही, त्यांनी विकासावर मत मागितले. शरद पवाराना खूप मोठे आयुष्य आहे, नरेंद्र मोदी विरोधक असले तरी त्यांनी शंभर वर्ष जगावे असेही त्या म्हणाल्या.

**अजित पवार यांनी खुलासा करावा**
अदानीसोबत बैठक झाली की नाही याबाबत माहिती अजित पवारांना विचारावी लागेल. मला त्याबाबत काही माहिती नाही. बॅग तपासणीवरुन उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले जात आहे .त्यांनी आवाज उठवल्यावर आता सर्वाच्या बॅग तपासणी होत आहे आणि हेच आम्हाला अपेक्षित होते असेही त्या म्हणाल्या.

# नागपूरकर दहशतीत

## रोहित पवार यांचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :
नागपुरात देवेंद्र फडणवीस यांची दहशत असून काही लोक नाराज आहेत, लोक समोर येऊन बोलत नाही, असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते रोहित पवार यांनी केला.



राज्यात महाविकास आघाडीला सर्वच ठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आमच्या जवळपास १७० जागा निवडून येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला पूर्व नागपूरचे राष्ट्रवादीचे उमेदवार दुनेश्वर पेठे यांच्या प्रचारार्थ रोहीत पवार नागपुरात आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. नागपूर भाजपचा गड राहिला नाही, असा आरोप रोहित पवार यांनी केला.

आपल्या हातातून निवडणूक जात असल्यामुळे कोणताही पर्याय नसतो त्यामुळे अनेकदा खोटे बोलून वेळ मारुन न्यावी लागते तसे अजित पवार यांचे झाले आहे. खोटे बोलून आपले उमेदवार निवडून यावे असा त्यांचा केविलवाना त्यांचा प्रयत्न असावा, असे रोहीत पवार म्हणाले.

**न्यायालयाकडून अपेक्षा भंग**
घडयाळ चिन्हाच्या बाबतीत सुनावणी झाली नाही. आम्ही अपेक्षा ठेवली नाही. उच्च न्यायालयाकडून आमची अपेक्षा खूप होती मात्र निवडणुकीच्या तोंडावर प्रकरण लाबवण्यात आले. आमचा न्यायालयावर विश्वास आहे. मात्र उशीर झाल्याने न्यायव्यवस्थेवर आम्ही काही प्रमाणात नाराज आहे. आम्ही निवडणूक तुतारी वाजवणाऱ्या माणसाच्या चिन्हावर लढत आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची बॅग सुरक्षा यंत्रणानी तपासली. त्यांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांच्या बॅगाही तपासा अशी मागणी सर्वस्तरातून होऊ लागली. त्यामुळेच सत्ता पक्षातील नेत्यांची बॅगची तपासणी निवडणूक आयुक्त तपासायला लागले आहे. ज्या लोकांनी बॅग तपासली त्यांना अभिनंदन पत्र निवडणूक आयोगाने दिले ही चांगली गोष्ट आहे पण बॅग न चेक करणाऱ्यावर काय कारवाई केली ? ते पत्र समोर यायला हवे असेही पवार म्हणाले. राज्यात पोलीस असताना मध्यप्रदेश पोलिसांना बॅग तपासणी करण्यासाठी कशाला आणले आहे .लोकांना दाखवण्यासाठीच का होईना, मात्र सत्तेतील लोकांची बॅग तपासणी होत आहे हे चांगली गोष्ट आहे असेही पवार म्हणाले.

शरद पवार मराठी माणसाचे प्रतीक आहे. भाजपने महाराष्ट्राचा कमी आणि गुजरातचा जास्त विचार केला आहे. त्यामुळे आम्ही निश्चय केला. काही केले तरी महाविकास आघाडीचे सरकार आणायचे. राज्याला विकासाचे एक नंबरचे राज्य बनून दाखवायचे आहे.

# माझ्यात मुख्यमंत्री बदलण्याची ताकद

■ वृत्तसंस्था
छ. संभाजीनगर, दि. १३ :
विद्यमान आमदार अब्दुल सत्तार यांनी वादग्रस्त विधान केले आहे. मी मुख्यमंत्री बदलण्याची ताकद ठेवू शकतो, तर हे किरकोळ लोक माझे काय करणार, असे अब्दुल सत्तार म्हणाले. अंजिठा येथे झालेल्या सभेत अब्दुल सत्तार यांनी हे वक्तव्य केले.



अब्दुल सत्तारांचे वादग्रस्त वक्तव्य

सत्तार हे जालना जिल्ह्यातील सिल्लोड विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते सातत्याने प्रचार करत आहेत. अब्दुल सत्तार यांनी अजिंठा या ठिकाणी जाहीर सभा घेतली. सभेत अब्दुल सत्तार यांनी नाव न घेता रावसाहेब दानवे आणि विरोधकांवर टीका केली.

सध्या विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळे ते खालच्या पातळीवर जाऊन जातीपातीवर मतं मागत आहेत. महाराष्ट्रात मोजून चार पाच नेते आहे, त्यात माझं नाव आहे. पण काही लोक त्यामुळे माझ्यावर जळतात, असे अब्दुल सत्तार म्हणाले.

माझ्यात मुख्यमंत्री बदलण्याची ताकद आहे. हे किरकोळ लोक माझ्याशी काय सामना करणार आहेत. मी गेल्या २५ वर्षांमध्ये कोट्यवधी रुपयांची काम केली आहेत. जो विकास कामे करतोय, त्याला मतदान करा, असे आवाहन अब्दुल सत्तार यांनी केले.

दरम्यान, जालना जिल्ह्यातील सिल्लोड विधानसभा मतदारसंघ हा राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा मतदारसंघ अशी ओळख आहे. विद्यमान मंत्री अब्दुल सत्तार हे या मतदारसंघातून पुन्हा रिंगणात आहे.

अब्दुल सत्तार यांनी तीन वेळा या मतदारसंघातून विजय मिळवला आहे. आता त्यांना चौथ्यांदा आमदार व्हायचंय, यासाठी ते जाहीर सभा घेत जोरात प्रचार करताना दिसत आहेत.

# म्हणून मविआचे सरकार गेले...

■ वृत्तसंस्था, सांगली, दि. १३ :
संजय राऊतांच्या अंगात आलं म्हणून सरकार बनलं, पण राऊतांच्या अंगातलं कधी उतरलंच नाही म्हणून सरकार गेलं, असे विधान माजी राज्यमंत्री विश्वजित कदम यांनी केले.



२०१९ ला महाविकास आघाडीचं सरकार बनलं. मी विनोदाने अनेकदा म्हणतो की संजय राऊतांच्या अंगात आलं म्हणून सरकार बनलं. पण अडचण एवढी झाली की राऊतांच्या अंगातलं कधी उतरलंच नाही म्हणून सरकार गेलं. कदमांच्या या वक्तव्याने महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा वाद निर्माण होण्याचे संकेत आहेत.

# राज्यात अपक्षांचे सरकार येणार!

## बच्चू कडूंचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :
राज्यात महाविकास आघाडी अथवा महायुतीचे नाही तर अपक्षांचे सरकार येईल असे बच्चू कडू यांना वाटत आहे. राज्यात १०० टक्के अपक्षांचे सरकार येईल असा दावा त्यांनी केला आहे.



अपक्ष आणि छोट्या पक्षांचं सरकार येईल शंभर टक्के येईल. एक तर मोठ्या पक्षांना अपक्ष बाहेरून पाठिंबा देतील अथवा अपक्षांच्या सरकारमध्ये आताचे बडे पक्ष सामील होतील असा दावा त्यांनी केला आहे. यंदा राज्यात खिचडी सरकारचा प्रयोग होण्याचे मोठे संकेत बच्चू कडू यांनी दिले.

रवी राणा आणि नवनीत राणा यांच्या टीकेवर उत्तर देताना त्यांना एक दिवस लक्षात येईल आणि ते माझ्याबद्दल चांगले बोलायला लागतील, असा दावी त्यांनी केला.

रवी राणा हे त्यांचा पक्ष वाढवत आहेत. त्यांनी पद्धतशीरपणे भाजपा कमी केली आहे. येथील अनेक मोठ्या नेत्यांची भाजपामधून हाकलपट्टी झाली आहे. ज्यांनी पक्षासाठी लाठ्या काठ्या खाल्लया ते भाजपचे नेत दयनीय अवस्थेत आहेत. तर आता राणा दाम्पत्याने भाजपा संपवल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी डॉ. अनिल बोंडे यांच्यावर खरपूस टीका केली.

# राज्यात सव्वादोन लाख ईव्हीएमवर होणार मतदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
राज्यात विधानसभा निवडणुकीत 2.26 लाख मतदान यंत्रावर मतदान होणार असून 1 लाख 186 मतदान केंद्रावर 9.70 कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. त्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सज्ज केले जात असून प्रत्यक्ष मतदानासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा?यांना प्रशिक्षण दिले जात आहे. राज्यभरात 1 लाख 186 मतदान केंद्र स्थापन करण्यात आले असून यामध्ये शहरी भागात 42604 तर ग्रामीण भागात 57582 मतदान केंद्राचा समावेश आहे.

या मतदान केंद्रावर राज्यभरातील 9.70 कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी 2 लाख 26624 मतदान यंत्र लागणार असून 1 लाख 26 हजार 911 कंट्रोल युनीटचा समावेश आहे. तसेच 1 लाख 37 हजार 119 व्हिव्हीपॅट उपलब्ध करण्यात आले आहेत.

राज्यातील आवश्यक त्या मतदान केंद्रावर दिव्यांगांसाठी रॅम्प, तीन चाकी सायकल उपलब्ध करण्यात आली असून या शिवाय मतदारांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. यावेळी जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी प्रशासनाकडून गाव पातळीवर जनजागृती केली जात आहे. राज्यात 9.70 कोटी मतदार मतदान करणार आहेत. यामध्ये 18 ते 19 वर्ष वयोगटातील 22 लाख 22 हजार 704 मतदार आहेत.

# बियाणींचा मर्डर कोणी केला?



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री धनंजय मुंडे यांनी नाशिकच्या सभेत बोलताना जोरदार हल्लाबोल केला होता. जितेंद्र आव्हाड यांच्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली, असा आरोपही त्यांनी केला.

यावर आता जितेंद्र आव्हाड यांनी पलटवार केला आहे. डॉ. बियाणी यांचा मर्डर कोणी केला? खऱ्या बापाचा पोरगा असेल तर उत्तर देईल, असे म्हणत आव्हाड यांनी हल्लाबोल केला आहे.

आव्हाड म्हणाले, धनंजय मुंडे याला फक्त माझा एकच प्रश्न विचारा, बियाणीचा मर्डर कोणी केला? त्याच्यामागचे कारण काय होते. हिम्मत असेल आणि खऱ्या बापाचा पोरगा असेल तर याचे उत्तर देईल. नाही तर आमच्या एक भगिनी आहेत करुणा मुंडे नावाच्या, त्यांना बाजूला मी घेऊन बसतो आणि त्यांना सांगायला लावतो. जो खुद शीशो के घरो मे रहते हे, वो दुसरो के घरो पर पत्थर नही मारा करते, असे म्हणत आव्हाड यांनी धनंजय मुंडे यांना इशारा दिला आहे.

# शिंदे जेलमध्ये जाणार होते

## संजय राऊतांचा गौप्यस्फोट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी राज्यात एकाच टप्प्यात मतदान पार पडत आहे. तर लगेचच दोन दिवसांनी निकाल जाहीर होणार आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महाविकासआघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होत आहे. त्यातच आता शिवसेना खासदार संजय राऊतांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबद्दल एक खळबळजनक खुलासा केला आहे. एकनाथ शिंदे हे जेलमध्ये जाणार होते, असा दावा संजय राऊतांनी केला आहे.



आम्ही हिंमत केली नसती तर उद्धव ठाकरे आणि त्यांच्या लोकांनी शिवसेना विकली असती, अशी टीका एकनाथ शिंदेंनी केली होती. त्यावर आता संजय राऊतांनी प्रत्युत्तर दिले आहे. एकनाथ शिंदे आणि हे सर्वजण ईडी, सीबीआयला घाबरुन पळून गेले आहेत. यातील अर्धे लोक जेलमध्ये जाणार होते. या सर्वांची यादी भाजप नेते किरीट सोमय्यांकडे आहे. त्यात एकनाथ शिंदेंसह अनेकांची नावे आहेत, असा गौप्यस्फोट संजय राऊतांनी केला. राजकारणात एकनाथ शिंदे यांनी कोणती हिंमत दाखवली हे त्यांनी सांगावे. त्यांनी जे काही केले, ते सर्व पैशाच्या जोरावर केले आहे. सर्व काही मॅनेज केले आहे, असेही संजय राऊत म्हणाले.

# दुश्मन एकत्र येतात तर आम्ही का नाही?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघांच्या एकत्र येण्याचा विषय अधून-मधून राजकारणात येतोच. आता दस्तूरखुद्द मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या मुद्दावर त्यांचे मौन सोडले आहे. राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा स्फोटक विधान केलं आहे.



राज ठाकरे यांच्या वक्तव्याने राजकीय खळबळ

एका मुलाखतीत राज ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. उद्धव ठाकरे आणि मी एकत्र येऊ नयेत, यासाठी अनेक लोक प्रयत्न करत असल्याचा घणाघात त्यांनी केला. यामध्ये काही आतले आणि काही बाहेरचे लोक आहेत.

हे सगळेच जण प्रयत्न करत आहेत. माझ्याकडून मी अलर्ट असतो. कोण काय बोलतो हे मला कळतं, पण मी त्याकडे दुर्लक्ष करतो, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. राज ठाकरे यांनी कुणाचे नाव घेतले नसले तरी त्यांनी ही कोण मंडळी आहे, याकडे इशारा जरूर केला आहे.

जगातील दुश्मन एकत्र येतात. वर्षानुवर्षाचे दुश्मन वाद मिटवून एकत्र येत असतील. तर आम्ही दोघांनी एकत्र येण्यावर चर्चा तर हवी, असे राज ठाकरे म्हणाले.

निवडणुकीच्या तोंडावर राज ठाकरे यांच्या वक्तव्याने आता उद्धव सेना आणि मनसे यांच्यात चर्चा होईल का? ते दोघे एकत्र येतील का? हा खल कायम आहे. कारण निवडणुकीत दोघांचे पण उमेदवार अनेक ठिकाणी आमने-सामने आहेत.

उद्धव ठाकरे यांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी जवळची वाटते. पण भाऊ वाटत नाही, असा आरोप त्यांनी केला. पण राज ठाकरे यांनी एक सुरूवात केली आहे. त्याला ठाकरे सेनेतून काय प्रतिक्रिया येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळच्या निवडणुकीत राज ठाकरे यांनी त्यांचा मुलगा अमित ठाकरेला माहिममधून उभे केले असून, या मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरेंचाही उमेदवार आहे, त्यावरूनही वाद सुरू आहे.

# शरद पवारांचे फोटो वापरु नका

## अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
विधानसभा निवडणुकीत महाविकासआघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होत आहे. त्यातच आता सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला मोठा झटका दिला आहे. विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र पक्ष म्हणून लढा, असे निर्देश अजित पवार गटाला दिले आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार असे दोन गट पडले होते. यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाने पक्ष आणि चिन्हासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तसेच अजित पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश पाळले जात नसल्याचा आरोपही शरद पवार गटाने केला होता.

या याचिकेवर ७ नोव्हेंबर रोजी सुनावणी करण्यात आली होती. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला घड्याळ चिन्हाचा मुद्दा न्यायप्रविष्ट असल्याचे सांगत ३६ तासात वृत्तपत्रात जाहिरात द्या असे आदेश दिले होते. यानतंर आज पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली.

नुकत्याच झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादी अजित पवार गटाला काही महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. अजित पवार गटाने स्वतंत्र पक्ष म्हणून निवडणूक लढावी. एक इलेक्ट्रॉनिक परिपत्रक काढा.

तसेच तुमचे उमेदवार, कार्यकर्त्यांना शरद पवारांचे फोटो, व्हिडीओ वापरू नका, असा सूचना करा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच आम्ही दिलेल्या सूचनांचं तंतोतंत पालन करा. सगळ्या ठिकाणी हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असा मजकूर लिहा, असेही कोर्टाने अजित पवार गटाला सांगितले.

अजित पवार गट आणि शरद पवार गटाने निवडणुकांवर लक्ष केंद्रीत करावे, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. अजित पवारांकडून वारंवार शरद पवारांच्या फोटोचा वापर केला जातो, अशी तक्रार शरद पवारांच्या वकिलाने केली आहे. याप्रकरणी कोर्टाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवलं. दरवेळी मतदारांवर व्हिडीओ वगैरेचा प्रभाव पडेलच असे नाही, कधी कधी तो प्रभाव पडतो. आपल्या देशातील जनता खूप हुशार आहे, त्यांना कोणी फसवू शकत नाही, असा सल्ला कोर्टाने दिला.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी जरी तो व्हिडीओ जुना असेल किंवा काहीही असले तरी तुम्ही शरद पवारांचा चेहरा का वापरता? असा सवाल अजित पवारांना विचारण्यात आला.

# कटेंगे, बटेंगे नको.. जोडेंगे और जितेंगे..



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १३ :
चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या भूयार पासून थेट नागपूर जिल्ह्याच्या सीमेवरील खरबी, लोहारा, जवाहरनगर, परसोडी पर्यंत विस्तारलेल्या भंडारा विधानसभा मतदारसंघाचे चित्र झपाट्याने पालटू लागले आहे.

महायुती आणि आघाडीच्या अधिकृत उमेदवारांनी त्यांचा प्रचार जोरात सुरू ठेवला असला तरी काही अपक्षांनी या प्रचारात रंगत आणली असून, त्यात देवांगणा गाढवे यांची प्रचाराची अनोखी पद्धत मतदारांना भुरळ घालू लागल्याचे दिसून येत आहे.

आज बुधवारी पवनी तालुक्याच्या आसगाव, वलनी, पांजरा आणि अन्य गावांमध्ये प्रचार करताना त्यांनी समाजात दुही माजविण्याचे काम करणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. काही नेते कटेंगे, बटेंगे... एक, सेफ असे वक्तव्य करीत समाजात फुट पाडण्याचे काम करीत आहेत. प्रत्यक्षात सर्व भारतीय समान असून, संविधानाने प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे, जाती धर्मात तेढ निर्माण करण्याऐवजी एकोपा राखण्याचे काम केले पाहिजे.

जोडेंगे और जितेंगे या हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून आपण काम करीत असून, सामान्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे देवांगणा गाढवे यांनी या गावातील गृहभेटीदरम्यान सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हंसाताई खोब्रागडे, संजय गाढवे प्रामुख्याने उपस्थित होते.

वर्षातून तीन पिके घेतला जाणारा पवनी तालुक्यातील हा परिसर समृद्ध मानला जात असला तरी येथील नागरिकांच्या अनेक समस्या कायम आहेत. आतापर्यंतच्या लोकप्रतिनिधींनी या समस्या सोडविण्यासाठी कायम कानाडोळा केला असून, आश्वासनाशिवाय काहीच पदरात पडले नाही, असे सांगत वलनीच्या महिलांनी संताप व्यक्त केला. परिसरातील गावखेड्यात रस्त्यांची बिकट समस्या असल्याचे अनेक नागरिकांनी सांगितले.

उमेदवारी मिळण्याची पूर्ण खात्री असताना काँग्रेस नेत्यांना आपल्याला दगा दिला. परिणामी, आपण काँग्रेसपासून फारकत घेतल्याचे सांगत येथील समस्त लाडक्या बहिणींनी देवांगणा गाढवेंची हातगाडी जोरात चालवावी, असे आवाहन हंसाताई खोब्रागडे यांनी केले.

दरम्यान, आजच्या दौऱ्यात एक वेगळेच चित्र अनुभवता आले. गावात प्रवेश करताच तेथील तरूणी आणि महिलांनी उमेदवार देवांगणा गाढवे यांचे औक्षण करीत स्वयंस्फूतीने स्वागतही केले.

नागपूर
महासागर वृत्तसागर
■ गुरुवार, दि. १४, नोव्हेंबर २०२४ ■

# दरोड्याच्या तयारीतील टोळी जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

अंबाझरी पोलिसांनी मंगळवारी रात्री गस्तीदरम्यान गुंडांच्या एका टोळीला दरोड्याच्या तयारीत असताना अटक केली. आरोपींकडून देशीकट्टा, खंजीर, लोखंडी रॉड आणि इतर साहित्य जप्त केले. समीर विजय कावळे (21) रा. आदिवासीनगर, बोरगाव, दानिश वसीम खान (31) रा. आयबीएम रोड, भीम टेकडी, अभिषेक उर्फ अभी योगेश तागडे (22) रा. दाभा चौक आणि स्वप्निल उर्फ लट्या विष्णू कांबळे (25) रा. तेलंगखेडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबाझरी पोलिसांचे पथक गुन्हेगारांच्या शोधात फिरत होते. रात्री 12 वाजताच्या सुमारास पोलिसांना रामनगरच्या टेनिस ग्राऊंडजवळ अंधारात काही संशयित लोक दिसले. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळ काढला. अंधाराचा लाभ घेऊन एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला, मात्र वरील चौघे पोलिसांच्या हाती लागले.

झडतीमध्ये आरोपींकडे देशी पिस्तूल, खंजीर, लोखंडी रॉड, दोरी आणि इतर साहित्य आढळले. चौघांनाही अटक करून त्यांचा रेकॉर्ड तपासला असता स्वप्निलविरुद्ध खुनाचा प्रयत्न, मारहाण आणि आर्म्स अक्टचा गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळाली.

इतर तिघांविरुद्धही अंमली पदार्थांची विक्रीसह इतर गुन्हे नोंद आहेत. माहिती मिळाली आहे की, आरोपी गत काही दिवसांपासून परिसरात हैदोस घालत होते. रामनगर परिसरात शस्त्राचा धाक दाखवून येणाऱ्या-जाणाऱ्यांना धमकावत होते. पोलिसांनी पाचही आरोपींवर आर्म्स ॲक्ट आणि दरोड्याची तयारीचा गुन्हा नोंदविला आहे.

गेल्या काही दिवसात नागपूर शहर आणि ग्रामीण भागात गुन्हेगारांनी उच्छाद मांडला असुन पोलीसही कमालीचे त्रस्त आहेत.

# निवडणुकीच्या धामधुमीत ९९ आरोपी तडीपार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

विधानसभा निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पार पडावी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी शहर पोलिसांनी विशेष तडीपार मोहीम राबविली. या मोहिमेत तब्बल ९९ आरोपींना शहरातून तडीपार करण्यात आले. गेल्या १० वर्षातील सर्वात मोठी कारवाई असून यामुळे अनेक गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे.

येत्या २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणूक आहे. मतदानाच्या दिवशी कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका लावला आहे. शहरातील गुन्हेगारांवर कारवाई करण्याचा सपाटा पोलिसांनी लावला असून एकाच दिवसात तब्बल ९९ गुन्हेगारांना शहरातून तडीपार केले आहे. यासोबतच १ हजार ६७९ आरोपी संशयाच्या कक्षेत असल्यामुळे त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. शहरातील ५२० आरोपींना न्यायालयाकडून आलेले अजामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले. एमपीडीए कायद्याअंतर्गत ७ आरोपींना मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले. तसेच शहरातील अवैध दारुविक्री करणाऱ्यांवर वचक निर्माण व्हावा, यासाठी पोलिसांनी एका आठवड्यात ४९० ठिकाणी छापे घालून ११ लाख ७५ हजार रुपये किंमतीची दारु जप्त केली तसेच ५२८ आरोपींना अटक करुन गुन्हे दाखल केले.

शहरात चाकू, तलवारी आणि पिस्तूल वापरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे निवडणुकीदरम्यान वाढता धोका लक्षात घेता भारतीय शस्त्र कायद्याअंतर्गत कारवाई करीत १२७ आरोपींकडून शस्त्र जप्त करुन अटक करण्यात आली. शहरात ड्रग्स, गांजासह अन्य अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांची संख्या वाढली होती. त्यामुळे गेल्या आठवड्यापासून ते आजपर्यंत ३२ ठिकाणी छापे घालून ४८ आरोपींना अटक करुन कारागृहात रवानगी केली. शहरात प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखूची विक्री आणि सेवन वाढले होते. त्यामुळे पोलिसांनी तब्बल ३२ ठिकाणी छापे घालून ४८ आरोपींवर गुन्हे दाखल केले. तसेच १५ लाख ४८ हजार रुपयांचा गुटखा-तंबाखू जप्त केला. आचारसंहिता लागू झाल्यानंतर पोलिसांनी ४५ लाख ४६ हजार रुपयांची रोख रक्कम अवैधरित्या वाहतूक करताना जप्त केली.


विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त राहुल माकणीकर यांनी शहरातील गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी विविध अभियान राबविण्यास सुरुवात केली. त्यामुळे शस्त्र वापरणाऱ्या गुन्हेगारांची धरपकड आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या युवकांची परेड घेण्यात आली. त्यानंतर पोलिसांचा वचक निर्माण करण्यासाठी कुख्यात गुन्हेगारांना मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले तर शस्त्राचा वापर करणाऱ्यांवर लगेच गुन्हे दाखल करुन अटक करण्याची कारवाई करण्यात आली.

## डॉ.जानवी आनंदराव गोडे यांना आचार्य पदवी

**नागपूर:** प्रा.जानवी आनंदराव गोडे (खडके) यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दि.३० मार्च २०२४ रोजी गॅझेटनुसार आचार्य (पीएच.डी) पदवी प्रदान केली आहे. त्यांचा विषय होता "नागपूर महानगरपालिका शाळेत माध्यमिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची स्थिती आणि आव्हाने विशेष संदर्भासह गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि धोरणाचा अर्थ सामाजिक कार्य हस्तक्षेपाचा अभ्यास" मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.ज्योति निसवाडे, मातृसेवा संघ समाजकल्याण महाविद्यालय नागपूर हे होते.

## प्रकाश घुडे यांचे देहदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :



प्रकाश रामभाऊ घुडे यांचे मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी, दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांचा देह वैद्यकीय विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता लता मंगेशकर हॉस्पिटल ला 13 नोव्हेंबर रोजी दान करण्यात आला. आणि अंतदर्शन त्यांच्या राहत्या घरी सकाळी १० वा . करण्यात आले. मृत्युसमयी त्यांचे वय ७४ वर्ष होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलगा, मुलगी व जावई असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## अज्ञात युवकाचा मृतदेह आढळला

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १३ :



रामटेक पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या रामटेक तुमसर बायपास मार्गावरील नागारा तलावात अंदाजे ३० ते ३५ वर्षीय अज्ञात युवकाचा मृतदेह दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास आढळून आले असून अजूनही मृतकाची ओळख पटलेली नसून ओळख पटल्यास रामटेक पोलिसांना कळविण्याची विनंती रामटेक पोलिसांकडून करण्यात आली आहे. माहितीनुसार,रामटेक तुमसर बायपास मार्गावरील नागारा तलावाकडे काल रात्री ९ वाजताच्या सुमारास एक अनोळखी तरुण जातांना परिसरातील काही मुलांना दिसले. याची माहिती रामटेक पोलिसांना देण्यात आली. रात्री रामटेक पोलिसांनी तलाव परिसर गाठले मात्र अंधार असल्याने कुणीच आढळून आले नाही. मात्र सकाळच्या सुमारास नागारा तलावात त्याच अनोळखी युवकाचे मृतदेह आढळून आले.

रामटेक पोलिसांनी व वाईल्ड चॅलेंजर टीमने मृतदेह तलावाच्या बाहेर काढून शवविच्छेदन केंद्र रामटेक येथे घेऊन गेले. अधिक तपास रामटेक पोलीस करीत असून सदर अनोळखी युवकाची ओळख पटल्यास रामटेक पोलिसांना कळविण्याची विनंती रामटेक पोलिसांनी केली आहे.

## प्रतिबंधित गुटखा-तंबाखू जप्त

**नागपूर :** जुनी कामठी पोलिसांनी गस्तीदरम्यान एका दुकानदाराच्या घरी धाड टाकली. मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित तंबाखू आणि पान मसाला जप्त करून आरोपीला अटक केली. आरिफ इकबाल मोहम्मद अश्फाक (39) रा. पिवळी हवेली असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. मंगळवारी दुपारी जुनी कामठी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान आरिफ घरून सरकारने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखू आणि पान मसाला विकत असल्याची माहिती मिळाली. घराच्या झडतीत विविध कंपन्यांचा तंबाखू आणि पान मसाला असा एकूण 23,717 रुपयांचा माल मिळाला.

# शिवछत्रपती किल्ले स्पर्धा २०२४ चा निकाल जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

रोहित लाडसावंगीकर यांच्या शिवगौरव ग्रुप चा "सुवर्णदुर्ग " प्रथम, तर वैभव गणोस्कर च्या वैभव दुर्ग प्रतिष्ठान चा "प्रतापगड" ला द्वितीय व तृतीय क्रमांकावर दोन किल्ले विजयी ठरले यात मंदार उठ्ठलवार चा "जयगड" व चेतन सावरकर चा "सुवर्णदुर्ग" हे आहेत.

शिवकिल्ल्यातच विभव साठे चा 'अजिंक्यतारा", प्रवीण दिग्रसकर चा "प्रतापगड, कुणाल शेंडे चा "सुवर्णदुर्ग", अजय तरवारकर चा "यशवंतगड" व संकेत नादे च्या "सिंहगड' ला विशेष पारितोषिक जाहीर झाले. शिवकिल्ल्यातच उत्तेजनार्थ म्हणून शौर्य काळबांडे "सिंहगड", देवांशु गाभणे "सिंधुदुर्ग, ऋषिकेश पारधी चा "सिंहगड", दर्शन दळवी चा "सिंहगड", अजय इंगळे चा "पारगड" यांची निवड करण्यात आली. सतत तीन दिवस शहराच्या विविध भागात या स्पर्धेचे परीक्षण सुरु होते. या वर्षीचे वैशिष्ठ म्हणजे अनेक नवीन स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला व जवळपास ८० च्या वर स्पर्धक्कांचा यात सहभाग होता.परीक्षक म्हणून आचार्य शीतल वैद्य, धनंजय डेगवेकर, सचिन चावरे, उदय टेकाडे हे विशेष आमंत्रित परीक्षक म्हणून उपस्थित होते.

टी.डब्लू. जेचे प्रणव शेखर, सुमित ठाकरे तसेच किल्लेदार मंगेश वारसागडे हे परिक्रमेत उपस्थित होते. हि स्पर्धा अभिरक्षक मध्यवर्ती संग्रहालय नागपूर, रोटरी डाऊन टाऊन, टी.डब्लू. जे, छत्रपती सेवा प्रतिष्ठान व शिवराज्याभिषेक सोहळा समिती महाल नागपूर ह्याच्या सहकार्याने पार पडली.

स्पर्धेचे उदघाटन श्रीमंत मुधोजी राजे भोसले, जागतिक विक्रमवीर शेफ विष्णू मनोहर, डॉ. प्रतीक्षा माई, मृदुला सुदामे, प्रसन्न बारलिंगे, शरदराव निंबाळकर, राजीव भाई राठी, रमेशजी सातपुते, दत्तात्रय सोनेगावकर ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

बक्षीस वितरण समारंभ दिनांक २४/११/२४ ला बालजगत, लक्ष्मी नगर, येथे सकाळी दहा वाजता संपन्न होईल. सहभाग प्रमाणपत्र सवार्ना देण्यात येणार आहे अशी माहिती आयोजक अतुल गुरु, दुर्ग प्रतिष्ठान, नागपूर यांनी कळविले आहे.

इतर वेगवेळ्या गटातील निकाल व विजेते खालील प्रमाणे आहेत,

काल्पनिक गट (शालेय) सक्षम विद्यालय-बर्डी, हिंदू विद्याभवन - हनुमान नगर, सरस्वती विद्यालय - शंकरनगर काल्पनिक गट (शालेय) - विशेष पारितोषिक पार्शिवनाथ पब्लिक स्कुल दुग्धामना, बालजगत - लक्ष्मीनगर, काल्पनिक गट (वयक्तिक) आराध्य जाधव, श्रीकांत तुपकर, वल्लभ नागपुरे, वैदर्भीय गट- रुद्राक्ष देशमुख, प्रशांत आपती महिला गट- सुप्रिया जाधव - अजिंक्यतारा, करिया काळे व ग्रुप - सिंहगड, अंजली चितळे - काल्पनिक, विशेष बक्षिसे- सौरभ रेकडे, आहान बनसोड, शर्वरी गावंडे, केदार कर्वे, वरिष्ठ नागरिक- रूपकिशोर कनोजिया, शालिक नेवारे, वरिष्ठ महिला स्पर्धक- माधुरी दशपुत्रे, मीनल बोकारे

# नेता नव्हे तर मतदार मोठा असतो : विकास ठाकरे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

लोकशाहीत एका मताचा अर्थ सर्व जनतेला माहीत आहे. तुम्ही एका मताने निवडून दिलेला लोकप्रतिनिधी मोठा नेता बनतो. यानंतर हा नेता जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी वारंवार निवडणुका लढवत राहतो. या लोकशाहीत एक मत देऊन जो नेता मोठा नाही तर त्याला मोठा करणारा मतदार राजा मोठा असतो. असे प्रतिपादन प्रसिद्धी पत्रका द्वारे पश्चिम नागपुरचे विद्यमान आमदार, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी व्यक्त केला.

जन-आशीर्वाद यात्रेत बुधवारी वंदे मातरम गार्डन परिसरात एका छोटेखानी सभेत विकास ठाकरे म्हणाले की, प्रत्येक लोकप्रतिनिधींनी आणि प्रत्येक मोठ्या नेत्याने लक्षात ठेवायला हवी. परंतु, सामान्य माणसाला नेता बनवणाऱ्या भोळ्या जनतेला तोच नेता मत देण्याची भाषा करतो. तसेच तो फक्त मी केलेल्या डेव्हलपमेंटचे दाखले देण्याचे भाषणे देत बसतो.

त्या नेत्याची भाषा ही बदलले आपल्या दिसते. यात तो जनतेला म्हणतो की, आता मी तुमच्याकडे मत मागायला येणार नाही. तसेच कुणालाही चाय पाजणार नाही. तुम्हाला मत द्यायचे असेल तर द्या मी तर पाच लाखांच्या लिड मतांनी येणार. अश्या शेक्या मारणाऱ्या नेत्याला जनता गल्ली बोळात फिरवते हे आपण ३ महिन्यापूर्वी आपल्या लक्षात आहे. गत लोकसभेत जे पश्चिम नागपुरच्या जनतेने मला जो आशिर्वाद दिला. त्याचप्रमाणे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आपण मला असाच आशिर्वाद द्याल हिच आपणास नम्र विनंती. मी प्रत्येक मतदारांचे एक वोट मागण्यापूर्वी मी आपणास सांगतो की, मी हे नाही म्हणार की शंभर टक्के विकास कामे पश्चिम नागपुरात केले आहे.

जन-आशीर्वाद यात्रेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसादातून ठाकरेंचा दुसऱ्यांदा विधानसभेत पाठविण्याचा संकल्प केल्याचे बुधवारी दिसून आले. जन आशिर्वाद यात्रेत विकास ठाकरे यांनी जाहिर केलेल्या वचननामाचे वाटप नागरिकांना करण्यात आले. भव्य असलेली रैली पुढे कृष्णा टॉकीज, भोईपूरा 6 नल, सम्राट गेस्ट हाऊस, बजरिया चौक, कुंभारपूरा रोड, मारवाडी चाळ, वंदे मातरम गार्डन, मराठी तेलीपुरा, गणेश पंचकमेटी, शिवहरे मेडिकल्स, बैद्यनाथ चौक, बाजपेयी मंदिर यात्रेचा बजेरिया येथे समारोप करण्यात आले.

# लाडकी बहीण योजनेचा महिलांना आर्थिक आधार : मुख्यमंत्री मोहन यादव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :



मध्यप्रदेशानंतर आता महाराष्ट्रातही लाडकी बहीण योजना लागू झाल्यामुळे राज्यातील सर्व महिलांना आर्थिक आधार मिळाला आहे. आगामी काळातही महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी केले. विधानसभेच्या निवडणूकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर सर्व भाजपच्या उमेदवारांच्या प्रचार सभेसाठी ते नागपुरात असता अजनी येथील मुन्ना यादव यांच्या निवासस्थानासमोर आयोजित सभेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, मध्यप्रदेशात गोवर्धन पूजेला शासकीय सुटी देण्यात आली आहे. यानंतर महाराष्ट्रातही सुटी दिल्या जाईल. लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी गोवर्धन पूजा साजरी करण्याची आपली परंपरा आपण सर्वांनी कायम राखली आहे. याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून आणि तेथील प्राण्यांचे भगवान इंद्राच्या कोपापासून संरक्षण केले होते. त्यामुळे हा दिवस आपण सर्वांनी आनंदाने साजरा करावा,यासाठीच शासकीय सुटी देण्यात आली आहे.

आगामी काळात श्रीकृष्ण जन्मस्थळांसोबतच इतर सर्व धार्मिक स्थळांचा तीर्थ स्थळ म्हणून विकास केल्या जाणार आहे. त्याचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. वर्षानंतर अयोध्येत श्रीरामाचे भव्य मंदिर बांधल्यामुळे काँग्रेसचे नेते कोमात गेल्यासारखे वागत आहे. भारतीय नागरिकांचे धार्मिक श्रध्दास्थळ असलेल्या अनेक शहराचा काँग्रेसने विकास केलाच नाही. मात्र आम्ही सर्व धार्मिक स्थळांचा सर्वांगिण विकास करण्याचे ठरविले असून त्यादृष्टीने वेगाने कामास लागलो आहोत.

संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना राजकारणापासून दूर पाप काँग्रेसने केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव झाल्यानंतर आनंद साजरा करणारे हेच काँग्रेसचे नेतेमंडळी महाविकास आघाडी करीत जनतेला खोटे आश्वासन देत आहे. ही आघाडी नव्हे तर महाबिघाडी जनतेच्या हितासाठी नसल्याने काँग्रेसला मतदारांनी त्यांची जागा दाखवून द्यावी, असे आवाहन मोहन यादव यांनी केले.

## गांजा विक्रेत्याच्या घरी धाड

**नागपूरः** कळमना पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीवरून एका गांजा विक्रेत्याच्या घरी धाड टाकली. 1.293 किलो गांजा जप्त करून आरोपीला अटक केली. शेख चांद शेख इस्माईल (55) रा. राहुल गांधीनगर झोपडपट्टी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान चांद हा घरून गांजाची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी त्याच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये त्याच्याजवळ एक किलो 293 ग्रॅम गांजा मिळाला. पोलिसांनी 23 हजार रुपये किंमतीचा माल जप्त करून चांदला अटक केली. त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे : आंचल गोयल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :




नागपूर शहरातील वायू गुणवत्ता निदेशांक मध्यम मध्यम श्रेणीत येत असल्यामुळे शहरातील वायू प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी मनपासह केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नीरी, वाहतूक पोलिस या सर्व विभागांनी सामूहिक प्रयत्न करावे अशा सूचना मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी दिल्या.

नागपूर शहरातील वायू गुणवत्ता व्यवस्थापना संदर्भात बुधवारी(ता.13) मनपा मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेत बैठक पार पडली. बैठकीत उपायुक्त सर्वश्री विजय देशमुख, डॉ. गजेंद्र महल्ले, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, नीरीच्या चीफ सायंटिस्ट डॉ. पद्मा राव, प्रिंसिपल सायंटिस्ट डॉ. संगीता गोयल सहायक पोलिस आयुक्त (वाहतूक) माधुरी बावीस्कर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी मनोज ओटकरी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे राजेंद्र पाटील, सार्वजनिक आरोग्य अभियंता संदीप लोखंडे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सल्लागार डॉ. संदीप नारनवरे यांच्यासह मनपाचे अधिकारी स्तरीय समितीचे अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील शहराकरिता श्रेणीबद्ध प्रतिसादकृती आराखडयाच्या अंमलबजावणीबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे. यात नागपूर शहरातील वायू गुणवत्ता निदेशांक मध्यम श्रेणीत येत असल्याने याबाबत शासनाकडून निर्देशित केलेल्या उपाय योजना राबविण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी वायू प्रदुषण नियंत्रणाच्या बाबतीत विविध मुद्यांवर चर्चा केली.

नागपूर शहराच्या काही भागांमध्ये वायू गुणवत्ता संनियंत्रण स्थानक उभारण्यात आलेले आहेत. या स्थानकांवर शहरातील हवेची गुणवत्ता दर्शविली जाते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिशा निर्देशानुसार काही ठिकाणचे स्थानक हे स्थानांतरीत करण्याची गरज असल्याचे मत यावेळी नीरीच्या वैज्ञानिकांनी व्यक्त केले. तसेच नागपूर शहरातील वायू गुणवत्ता संचालन सयंत्र स्थानांतरीत करण्याबबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

शहरात सुरू असलेल्या बांधकामाच्या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता कमी होत असून, अनेक ठिकाणी बांधकाम सुरू असल्यामुळे धुळीचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. बांधकाम स्थळी पाण्याची फवारणी केल्यास धुळ कमी करता येऊ शकेल, ग्रीन नेटचा वापर करता येऊ शकेल. बांधकामाची परवाणगी देतांनाच निघणार्या सी ॲन्ड डी वेस्टची योग्य विल्हेवाट लावण्याची सोय करण्यात यावी, परिसरात कचरा जाळू नये याची दक्षता घ्यावी, अशी देखील सूचना वायू प्रदूषणाच्या नियंत्रणाकरिता बैठकीत मांडण्यात आल्या.

# विद्यापीठात 'न्यूरोएंडोक्रिनोलॉजी' वर कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'न्यूरोएंडोक्रिनोलॉजी' या विषयावर १० ते १६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान पॅन इंडियन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा औषधी निर्माणशास्त्र विभाग, जर्नल ऑफ न्यूरोएंडोक्रिनोलॉजी आणि ब्रिटिश सोसायटी ऑफ न्यूरोएंडोक्रिनोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा होत आहे. कार्यशाळेचा उद्घाटनीय कार्यक्रम माननीय प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून कॅम्ब्रिज, युके येथील एमआरसी, लॅबोरेटरी ऑफ मॉलिक्युलर बायोलॉजीचे डॉ. मायकल हेस्टिंग्स, विशेष अतिथी म्हणून यूएसए मधील वेस्ट व्हर्जिनिया विद्यापीठाच्या फिजियोलॉजी, फामाकोलॉजी आणि टॉक्सिकोलॉजी विभागातील प्रोफेसर डॉ. रॉबर्ट गुडमॅन, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. दादासाहेब कोकरे यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. हेस्टिंग्स यांनी न्यूरोएंडोक्राइन संशोधनातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आगामी संशोधनातील तफावत कमी करण्याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. गुडमॅन यांनी एंडोक्राइन सिस्टिमच्या न्यूरोबायोलॉजीबाबत त्यांना असलेल्या सखोल ज्ञानामुळे संपूर्ण माहिती दिली. सोबतच मेटाबोलिक आजारांवरील संशोधनाच्या वर्तमान परिस्थितीवर विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ राजेंद्र काकडे यांनी विद्यार्थ्यांमधील संशोधन कौशल्यांच्या विकास आणि कार्य पूर्ण करण्यासाठी संसाधनांची निर्मिती कशी करावी यावर मार्गदर्शन केले. तसेच, न्यूरोॲनाटॉमी विषयी मांडणी केली. मेंदू आणि शरीर कसे एकमेकांसोबत समन्वय साधून आवश्यक शारीरिक क्रिया नियंत्रित करतात हे त्यांनी स्पष्ट केले. औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक यांनी न्यूरोएंडोक्रिनोलॉजीच्या विषयावर प्रकाश टाकला आणि कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विभागाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. संयोजक डॉ. दादासाहेब कोकरे यांनी विभागाच्या स्तरावर न्यूरोएंडोक्रिन संशोधनाच्या प्रगतीचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांसाठी आणि नवोदित संशोधकांसाठी त्याच्या उज्ज्वल भविष्यासंदर्भात होत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.




उद्घाटन कार्यक्रमातील बीजभाषण किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी, लखनऊ येथील डॉ. विनोद कुमार यांनी केले. डॉ. विनोद कुमार यांनी न्यूरोएंडोक्राइन संशोधनाचा वारसा त्यांच्या भाषणात अधोरेखित केला. पक्ष्यांच्या स्थलांतरावरील न्यूरोएंडोक्राइन कार्यक्षमतेच्या प्रभावावर विस्तृतपणे चर्चा केली आणि पर्यावरणीय घटकांचे परिणाम स्पष्ट केले. डॉ. रिता वडेतवार यांनी उद्घाटन सत्राचे संचालन केले तर डॉ. राजेश उगाले यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला माजी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, टेक्नॉलॉजी आणि एनर्जी पार्कचे संचालक डॉ. प्रकाश इटनकर, डॉ. प्रमोद सालवे आणि डॉ. सतेन्द्र प्रसाद यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. भारत भरातील विविध विद्यापीठ आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते.

# कोंढाळी येथे गितगायन स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

## ध्येय प्राप्तीकरिता परिश्रमाची गरज : सुधीर बुटे



■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. १३ :

स्थानिक लाखोटिया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे बुधवार दि 13 नोव्हेंबरला " गीतगायन स्पर्धा"व बक्षीस वितरण कार्यक्रम यशस्वी पार पडला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर चं. बुटे, प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ पर्यवेक्षक मनोज ढाले,पर्यवेक्षक हरीश राठी परीक्षा विभाग प्रमुख सुनिल सोलव,प्रिया धारपुरे यांची उपस्थिती होती. स्पर्धेत प्रथम तन्मय देशमुख वर्ग 10 ब द्वितीय क्रमांक वेदांत देशमुख वर्ग 08 इ तृतीय क्रमांक प्रतीक्षा वंजारी वर्ग 12 विज्ञान अ चतुर्थ क्रमांक कु. रूपाली कालभूत वर्ग 12 विज्ञान, पाचवा क्रमांक यामिनी वाढवे वर्ग 9 फ तर प्रोत्साहन पर बक्षीस पल्लवी घागरे वर्ग 9 फ, दृष्टी देवघरे वर्ग 11 वि अ यांनी पटकाविला.

सर्व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेला परीक्षकांची भूमिका आम्रपाली बागडे, संध्या भुते, चंद्रकला गायधने यांनी बजावली. कार्यक्रमाचे नियोजन विविध स्पर्धा विभाग प्रमुख तथा संयोजक रुपेश वादाफळे ,नियोजक हरीश राठी, प्रवीण गांजरे, समीर लोणारे यांचे सहकार्य लाभले.

ध्वनिक्षेपण व्यवस्थापन शुभम राऊत यांनी केले. या कार्यक्रमाला 8ते 12मधील शेकडो विद्यार्थी, संस्थेचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संचालन हरीश राठी तर आभार समीर लोणारे यांनी केले.

विजेत्यांना प्रमाणपत्र व बक्षीसे देण्यात आली. विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यास परिश्रमाची गरज प्राचार्य सुधीर बुटे ध्येय प्राप्ती करिता अथक परिश्रम व सातत्याने प्रयत्न असल्यास कोणतेही टार्गेट प्राप्त करणे सोपं जाते. जो विद्यार्थी दशेत अधिक परिश्रम घेतो. तो भविष्यात आनंदी जीवन जगू शकतो असा आशा वाद कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर बुटे यांनी व्यक्त केला.

# बंटी शेळके यांना जनतेचे आशीर्वाद

## जनआशीर्वाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे उमेदवार बंटी बाबा शेळके यांच्या प्रचाराचा भाग म्हणून नागपूर, मध्य नागपुरात जन आशीर्वाद यात्रा काढण्यात आली. बंटी शेळके यांच्या जनआशीर्वाद यात्रेला सर्वसामान्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि लोकांचे आशीर्वाद मिळत आहेत. जनआशीर्वाद यात्रेत सहभागी होऊन मतदारांनी बंटी शेळके यांच्या समर्थनार्थ उत्साह वाढवला. गणेशपेठच्या व्यायामशाळा चौकातून रविवारी जनआशीर्वाद यात्रेला सुरुवात झाली.

दरम्यान, मध्य नागपुरातील काँग्रेसचे उमेदवार बंटी शेळके यांनी सर्वप्रथम पहाडी माता मंदिरात पोहोचून आशीर्वाद घेतले. यानंतर बंटी शेळके यांनी साने गुरुजी शाळा, सिंधी खाना गली, स्वप्नील बावनकर निवास परिसर, गंगा माता मंदिर चौक, कुंभलकर कॉलेज गली, दूध डेरी चौक, शशांक मोरे निवास परिसर येथे लोकांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. लोकांनीही त्याला जोरदार पाठिंबा दिला. मोरे यांच्या निवासस्थानी यात्रेच्या समापन झाला. यानंतर बांगलादेशातील पाचपौली परिसरात दुसरी जन आशीर्वाद यात्रा यशस्वीपणे पार पडली. बांगलादेश पोलीस चौकी परिसरातून यात्रेला सुरुवात झाली. बंटी शेळके यांनी चंद्रभागानगर दत्त मंदिर गाठून आशीर्वाद घेतले. यानंतर जन आशीर्वाद यात्रा मोरबा स्वामी विहीर, राधेश्याम शाळा परिसर, विनकर कॉलनी, दारव्हेकर दंगल, लाडपुरा, नंदागिरी रोड, कुंभारपूर मार्गे पाचपोली रोड येथे संपली. बंटी शेळके यांच्या जनआशीर्वाद यात्रेचे बांगलादेश भागातील नागरिकांनी जोरदार स्वागत केले.

दरम्यान, बंटी शेळके यांनी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी युक्तिवाद केला. यावेळी हेमंत काथवते, सतीश चौहान, राजेश कुंभलकर, रवी सूर्यवंशी, भूषण मरस्कोलहे, स्वप्निल बावनकर, सागर चौहान या यात्रेत उपस्थित होते.

# १८ प्रमुख स्थानकांच्या फूट ओव्हर ब्रिजवर बसवले सीसीटीव्ही कॅमेरे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

प्रवाशांची सुरक्षा आणि सुरक्षितता वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने 18 प्रमुख स्थानकांवर फूट ओव्हर ब्रिजेस (FOBs) वर CCTV कॅमेरे बसवले आहेत.

चोवीस तास देखरेख करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम, संपूर्ण विभागातील प्रवाशांसाठी सुरक्षित प्रवासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी मध्य रेल्वेची वचनबद्धता दर्शवते. या सुरक्षा वर्धनांतर्गत समाविष्ट स्थानकांमध्ये खापरी, बुटीबोरी, वर्धा, वरोरा, वणी, सेवाग्राम, धामणगाव, चंद्रपूर, बल्हारशाह, काटोल, घोराडोंगरी, आमला, मुलताई, बैतूल, परासिया, अजनी, नागपूर आणि पांडुर्णा या प्रमुख स्थानांचा समावेश आहे. हे सीसीटीव्ही कॅमेरे रिअल-टाइम निगराणीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील, रेल्वे अधिकाऱ्यांना गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी, विशेषतः गर्दीच्या वेळेत सुधारित क्षमता प्रदान करतील.

कॅमेरे बसवल्यामुळे, नागपूर विभाग प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आपली बांधिलकी अधिक दृढ करत आहे, असे श्री मनीष अग्रवाल, नागपूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक म्हणाले. या प्रणाली केवळ चोवीस तास हालचालींवर लक्ष ठेवणार नाहीत तर बेकायदेशीर क्रियाकलापांना आळा घालण्यासाठी आणि सर्व प्रवाशांसाठी सुरक्षित वातावरण प्रदान करण्यासाठी एक सक्रिय उपाय म्हणून देखील काम करतील. कोणत्याही सुरक्षेच्या बाबतीत रेल्वे संरक्षण दल कर्मचारी आणि स्थानक अधिकाऱ्यांकडून जलद प्रतिसाद मिळू शकेल. हे वर्धित पाळत ठेवणे विभागातील काही सर्वात व्यस्त स्थानकांवर सु-नियमित आणि सुरक्षित वातावरण राखण्यात मदत करेल.

फूट ओव्हर ब्रिजेसवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे हा मध्य रेल्वेने हाती घेतलेल्या व्यापक सुरक्षा उपक्रमांचा एक भाग आहे, सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे आणि प्रवासी कल्याण आणि सेवा उत्कृष्टतेसाठी रेल्वेची बांधिलकी अधोरेखित करते.

# दुचाकीच्या धडकेत इसमाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

भरधाव मोटारसायकलच्या चालकाने बाजारातून घरी जात असलेल्या पादचाऱ्याला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी इसमाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. बबलू श्रीराम उईके (55) रा. अमरनगर रोड, एमआयडीसी असे मृताचे नाव आहे. गत गुरूवारच्या रात्री बबलू घराजवळच राहणाऱ्या विनोद फुलचंद धुर्वे (28) याच्यासोबत भाजीपाला खरेदी करण्यासाठी बाजारात गेले होते. रात्री 9 वाजताच्या सुमारास बाजार घेऊन दोघेही आयसी चौक ते हिंगणा रोडने पायदळ घरी जात होते. पाण्याच्या टाकीजवळून रस्ता ओलांडत असताना भरधाव असलेल्या मोटारसायकलच्या चालकाने बबलू यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. बबलू यांना गंभीर दुखापत झाल्याने उपचारार्थ एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# गार्डन क्लब, नागपूर तर्फे १५ नोव्हेंबरला लाल फुलांचा शो

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

गार्डन क्लब, नागपूर तर्फे लाल फुलांचा शो हा कार्यक्रम शुक्रवारी १५ नोव्हेंबरला धरमपेठ कन्या शाळा, उत्तर अंबाझरी रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. हा शो भारताचे माजी दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी आयोजित करण्यात येतो. सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना या शोसाठी आमंत्रित करण्यात येत आहे. या शोमध्ये अशा स्पर्धा होतील.गुलाबाचे एक लाल फुल, २ लाल गुलाबाशिवाय इतर कुठलेही लाल रंगाचे फुल,३ लाल फुलांचा गुच्छ, (कमीत कमी तीन फुले) वय वर्ष ०८पर्यंतच्या मुलांनी केलेली फुलांची मांडणी,वय वर्ष ८ ते १२ पर्यंतच्या मुलांनी केलेली फुलांची मांडणी,वय वर्ष १२ ते १५ पर्यंतच्या मुलांनी केलेली फुलांची मांडणी.



या मांडणीमध्ये कमीत कमी एक लाल रंगाचे फुल ( कुठल्याही रंगछटेचे) असणे अनिवार्य आहे. शोच्या वेळा अशा राहतील नोंदणी आणि फुलांची मांडणी :- सकाळी ०८.०० ते ०९.००,खेळ आणि मनोरंजनाचे कार्यक्रम ०९.०० ते १०.००बक्षीस वितरण समारंभ सकाळी १०.०० ते ११.०० या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन नागपूर गार्डन क्लबच्या अध्यक्षा अनुजा परचुरे यांनी केलेले आहे.

# गुंजन दमाहे कुस्ती स्पर्धेत राज्यात ठरली दुसरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

दि.१०/११/२०२४ ला महाराष्ट्र कुस्ती संघ अंतर्गत राज्यस्तरीय महिला कुस्ती स्पर्धा इंदापुर तालुक्यातील लोणी देवकर येथे आयोजित केल्या होत्या. या कुस्ती स्पर्धेत श्री.उमराव महिला व पुरुष कुस्ती तालिम संघ नगरधन येथे प्रशिक्षण घेणारी कु.गुंजन निलेश दमाहे हीने १५ वषार्खालील मुलीच्या ३३ किलो वजनगटात राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. गुंजन दमाहेला कुस्ती कोच ईश्वर मेश्राम व तिचे वडील निलेश दमाहे यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भात भौतिक सुविधाचा अभाव असतानाही हे उत्कृष्ट यश संपादन केल्याबद्दल जि.प.सदस्य



दुधराम सव्वालाखे, रामटेक पंचायत समितीचे उपसभापती नरेंद्र बंधाटे, रामटेक कुस्ती संघाचे अध्यक्ष भिमराव ठकरेले, सचिव सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष वामनराव बान्ते, मोरेश्वर घरजाळे, किशोर भाऊ उदगिरवार, सहसचिव शेषराव बान्ते, धर्मेश भागलकर, नरेश मसुरके, कोषाध्यक्ष राजेंद्र नागपुरे, राकेश देशमुख, इंद्जीत वलोकर, गजानन मेश्राम, क्रीडा शिक्षक बबलू यादव, तुषार चव्हाण, माजी प्राचार्य दीपक मोहोड आदिंनी शुभेच्छा दिल्या. गुंजनच्या यशामुळे रामटेकच्या परिसरात क्रीडामय वातावरणात निर्माण झाले आहे.

# समर्थ महाविद्यालयाची विद्यार्थिनी हिना मसूरके राज्यस्तरीय कुस्ती क्रीडा स्पर्धेत चमकली

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १३ :

अहिल्यानगर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत समर्थ हायस्कूल व महाविद्यालय, रामटेक वर्ग अकरावी विज्ञान शाखेत शिकणारी विद्यार्थिनी हिना नरेश मसूरके हि चमकली.

५३ किलो वजन गटात कु. हिना नरेश मसूर के हिने राज्यस्तरावर तृतीय क्रमांक पटकावला. हिनाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ. एम. एम. लोखंडे यांच्या हस्ते हिना चा सत्कार करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षात तालुका स्तरीय



स्पर्धेपासून ते राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंतचा प्रवास अत्यंत थरारक व प्रेरणादायी राहिला आहे, अशी भावना हीनाने व्यक्त केली.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. गायकवाड, पर्यवेक्षक संजय जाधव व फंदे मॅडम यांनी सत्कार करून कौतुक केले. हीनाने तिच्या यशाचे श्रेय तिचे वडील नरेश मसुरके, क्रीडा मार्गदर्शक प्रा. आर. एस. ठाकरे व वर्ग शिक्षक प्रा. पी. जे. चव्हाण यांना दिले.

# रामटेक न.प. तर्फे पथ नाट्य द्वारे मतदार जनजागृती



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १३ :

रामटेक विधानसभाचे निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन , सहायक निवडणूक अधिकारी व तहसीलदार रमेश कोळपे यांचा मार्गदर्शनात रामटेक नगर परिषद तर्फे ११ नोव्हेंबर ला रामटेक शहरात पथनाट्य द्वारे विविध्य ठिकाणी मतदार जनजागृती अभियान राबविन्यात आले.

यावेळी मुख्याधिकारी नितीन लुंगे यांनी मतदाराना आव्हान केले की २० नोव्हेंबर २०२४ ला विधानसभा सार्वत्रिक निवडणूकित मतदान करावे तसेच म्हणाले की "मतदान हे एक राष्ट्रीय कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकांनी मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावावा.

यावेळी नगर रचना सहाय्यक देवश्री उईके, सिटी कॉर्डिनेटर अपेक्षा नाहारकर सहित नगर परिषद मधील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

# निवडणूक निरीक्षक अजय कुमार यांच्या विविध कक्षांना भेटी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूर जिल्ह्यासाठी नियुक्त निवडणूक निरीक्षक अजय कुमार यांनी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण कक्षासह विविध कक्षांना भेटी देत कामकाजाची पाहणी केली. जिल्हा माहिती माहिती अधिकारी तथा माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी विनोद रापतवार यांनी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण कक्षाच्या कामकाजाची माहिती त्यांना दिली. यावेळी माहिती अधिकारी अतुल पांडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक विवेक लामतुरे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक कामकाजा संदर्भात सी व्हिजिल, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण कक्षाला भेटी देत कक्षप्रमुखांना त्यांनी दक्षतेच्या सूचना दिल्या. तसेच त्यांनी कामकाजाचा आढावा घेतला.

# घराचे स्लॅब अंगावर पडून मजुराचा मृत्यू

**नागपूर** : घराचे स्लॅब अंगावर कोसळल्याने एका मजुराचा मलब्याखाली दबून मृत्यू झाला. ही दुदैवी घटना पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. कृष्णकुमार केवट (30) रा. रीवा, मध्यप्रदेश असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टेकानाकाच्या चार खंबा चौकात राहणारे नियाजुद्दीन शेख यांचे घर पाडण्याचे काम सुरू आहे. कृष्णकुमार येथे मजुरीचे काम करीत होता. सर्वजण कामाला सुरूवात करण्याच्या तयारीत होते. कृष्णकुमार अर्धवट पडलेल्या घराच्या स्लॅबखाली उभा होता. दरम्यान अचानक स्लॅब खाली उभ्या कृष्णकुमारच्या अंगावर कोसळला. कृष्णकुमार स्लॅबच्या मलब्याखाली दबल्या गेला. मजुरांमध्ये खळबळ उडाली. तत्काळ जेसीबीच्या मदतीने कृष्णकुमारला मलब्यातून बाहेर काढत रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

# हिंगणा विधानसभेत मेघेची हॅट्रिक बंग रोखणार काय?

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १३ :

हिंगणा विधानसभा सन २००८ मध्ये तयार झाले असून पहिली निवडणूक २००९ मध्ये घेण्यात आली. यापूर्वी हिंगणा तालुक्यातील गावे कळमेश्वर विधानसभा क्षेत्रात येत होती यातील तीन चुरशीच्या लढतीत बंग यांनी हॅट्रिक साधली होती. मेघे यांना यावेळी हॅट्रिकची संधी असून बंग संधी रोखणार काय? हिंगणा विधानसभा क्षेत्रात भाजपचे उमेदवार सलग तिन्ही वेळा विजय झालेत यामुळे भाजपने हॅट्रिक मिळविले आहे.

बंग यांनी कळमेश्वर विधानसभेत हॅट्रिक मिळविले आहे. दोन वेळा समीर मेघे विजय झालेत तर रमेश बंग दोन वेळा पराभूत झाले आहेत. कळमेश्वर विधानसभेत सन१९९५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे उमेदवार रमेश बंग याना ३५११८ मते मिळवून अपक्ष उमेदवार पांडुरंग मते यांना पराभूत केले होते. मते यांना २७८६९ मते मिळाली होती. सन १९९९ मध्ये झालेल्या निवडणुकीत पुन्हा रमेश बंग यांनी ३४५८० मते घेवून काँग्रेसचे उमेदवार नाना गावंडे यांना पराभूत केले आहे.



गावंडे यांना ३१११७ मते मिळाली होती. सन २००४ मध्ये झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रमेश बंग यांनी ४८६४३ मते घेत नाना गावंडे यांच्या पत्नी कॉंग्रेसच्या उमेदवार सुनिता गावंडे यांचा पराभव केला होता. सुनिता गावंडे यांना ४५५७९ मतें मिळाली होती. या तिन्ही निवडणूक निकालात तिसऱ्या क्रमांकावर शिवसेनेचे उमेदवार रमेश अडावू यांना अनुक्रमे २४१६०, ३१०९० आणि ४३५६० मतें मिळाली होती. हिंगणा विधानसभेची पहिली निवडणुक सन २००९ मध्ये घेण्यात आली.

यावेळी भाजपचे अधिकृत उमेदवार म्हणून विजय घोडमारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रमेश बंग यांचा केवळ ७०० मतांनी पराभूत केले होते. घोडमारे याना ६५०३९ तर बंग यांना ६४३३९ मते मिळाली होती. यावेळी तिसऱ्या क्रमांकावर बहुजन समाज पाटीर्चे राजाराम पांडे होते. त्यांनी ९२६२ मतें घेतली होती. दुसरी निवडणूक सन २०१४ ला घेण्यात आली होती.

यावेळी भारतीय जनता पाटीर्ने प्रथमचं समीर मेघे यांना संधी दिली आणि मेघे यांनी ८४१३९ मते मिळवून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रमेश बंग यांना ६०९८१ मते मिळाली होती यात मेघे विजय झाले होते, तिस-या क्रमांकावर कॉग्रेसच्या उमेदवार कुंदा राऊत होत्या त्यांना २०५७३ मते मिळाली होती. तिसरी निवडणूक सन २०१९ ला घेण्यात आली.

यावेळी सुध्दा समीर मेघे यांच्यावर पक्षाने विश्वास दाखवला आणि दुस-यावेळी संधी दिली त्यांनीं १२०९१७ मते घेतली. हिंगणा विधानसभेत प्रथम विजय झालेल्या विजय घोडमारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये प्रवेश करीत ७४९२२ मते मिळवली होती यावेळी समीर मेघे यांनी विजय घोडमारे यांचा पराभव केला होता यावेळी तिसऱ्या क्रमांकावर नितेश जंगले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार होते.

# गीतांजली चौक परिसरात तृतीयपंथीयांनी केली मतदान जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी संपूर्ण नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या जनजागृती अभियानाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. बुधवारी (ता.१३) गीतांजली टॉकीज चौक परिसरामध्ये शहरातील तृतीय पंथीयांनी मतदान जनजागृती केली. मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग अर्थात स्वीप कार्यक्रम अंतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार नागपूर शहरामध्ये शंभर टक्के मतदान व्हावे याकरिता मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.



या अभियानामध्ये तृतीयपंथीयांनी सहभाग नोंदविला. बुधवारी (ता.१३) हंसापुरी गीतांजली टॉकीज चौक परिसरामध्ये मतदार जनजागृती करणारे फलक हातात घेऊन तृतीयपंथीयांनी मतदानाचा जागर केला. यावेळी मनपाचे गांधीबाग झोनचे झोनल अधिकारी श्री. सुरेश खरे, लोकन्यायालयाच्या न्यायाधीश विद्या कांबळे, तृतीयपंथी राखीबाई, मुस्कानबाई, विद्याबाई यांच्यासह अनेक तृतीयपंथी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्वांनी शंभर टक्के मतदानासाठी पुढाकार घेण्याची शपथ घेतली. मतदान आपला अधिकार असून प्रत्येकाने मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. भारतीय संविधानाने लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी प्रत्येक व्यक्तीच्या मताला सारखे महत्व दिले आहे. त्यामुळे लोकशाहीत प्रत्येक मत अमूल्य असून प्रत्येकाने सशक्त लोकशाहीसाठी मतदान नक्की करावे, असे आवाहन यावेळी तृतीयपंथी समुदायाकडून करण्यात आले.

# रेशन किट वाटपावरून राडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

पश्चिम नागपुरातील मतदारांना रेशन किटचे वाटप करून आकर्षित केल्यावरून गदारोळ सुरू आहे. मोठ्या प्रमाणात रेशन किट सापडत आहेत. यावरून सोमवारी रात्री उशिरापर्यंत अवस्थीनगरात गोंधळ आणि तणाव होता. पोलिसांनी गिट्टीखदान ठाण्यात एक आणि मानकापूर ठाण्यात दोन गुन्हे नोंदवून 5 जणांना अटक केली आहे. भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून डीसीपी राहुल मदने यांनी पाचही आरोपींना कार्यालयात बोलावून चांगलेच फटकारले आहे.

अपक्ष उमेदवार रियाज फाजीम काझी (46) रा. झिंगाबाई टाकळी यांनी ताजनगर झोपडपट्टीच्या गल्ली क्र. 7 मध्ये मतदारांना वाटण्यासाठी रेशन किट जमा करून ठेवल्याची माहिती पश्चिम नागपुरात तैनात भरारी पथकाचे अधिकारी निखिल रमेश तितरे यांना सोमवारी रात्री मिळाली होती. त्यांनी पोलिस पथकासह गोदामात धाड टाकून 2 हजारांहून अधिक रेशन किट जप्त केली. चौकशीत त्या किट रियाज काझीने ठेवल्याची माहिती मिळाली. रियाजविरुद्ध मानकापूर ठाण्यात एनसी नोंदविण्यात आली. आचार संहिता आणि निवडणुकीदरम्यान अनुचित प्रकार घडण्याच्या संशयातून रियाजला अटक केली.

### किट पकडल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये जुंपली

किट पकडल्यानंतर काँग्रेस आणि अपक्ष उमेदवाराचे कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच जुंपली. त्यामुळे अवस्थीनगर चौकात तणावाचे वातावरण निर्माण झाले. दोन्ही बाजूने समर्थकांची गर्दी जमल्याची माहिती मिळताच डीसीपी मदने घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला. दोन्ही पक्षांकडून गिट्टीखदान आणि मानकापूर ठाण्यात तक्रार करण्यात आल्याने प्रकरणा नोंदविण्यात आले. गिट्टीखदान पोलिसांनी मोहम्मद रिजवान मोहम्मद आरिफ शेख (26) रा. अनंतनगर, राठोड लेआऊटच्या तक्रारीवरून सय्यद फैजलउल्ला (47) रा. प्रशांत कॉलनी, बोरगाव, खलिल खान (45) रा. अवस्थीनगर आणि खानू इरफान खान (35) रा. गोरेवाडा रिंग रोडविरुद्ध गुन्हा नोंदविला. त्याचप्रमाणे फैजलउल्लाच्या तक्रारीवरून रिजवान आणि त्याच्या साथीदाराविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिसांनी वरील चौघांनाही अटक केली.

### अशी घडली घटना

रात्री 11 वाजताच्या सुमारास रिजवान हा त्याचा मित्र प्रमोद ठाकूर याच्यासोबत अवस्थीनगर चौकात उभा होता. दरम्यान फैजल, खलिल आणि खानू तेथे आले. आरोपींनी प्राईड अपार्टमेंटसमोर गरीबांना वाटप करण्यासाठी जमा केलेल्या रेशन किट पकडून दिल्यावरून वाद घालत मारहाण सुरू केली. रिजवानने मध्यस्थीचा प्रयत्न केला असता तिघांनीही मिळून त्याला शिविगाळ करीत मारहाण केली. वाद चिघळल्याने दोन्ही बाजूचे कार्यकर्ता गोळा झाले आणि परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले. तणावाची स्थिती पाहता परिसरात तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला. त्यानंतर फैजलने मानकापूर ठाण्यात तक्रार केली. तक्रारीनुसार, रिजवान आणि त्याच्या साथीदारांनी अवस्थीनगर चौकात त्याच्याशी अपक्ष उमेदवाराचा प्रचार करण्यावरून वाद घालत मारहाण केली.

# महिला दारू विक्रेत्यावर धाड

**नागपूर :** गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथक (एएचटीयू)ने गोपनिय माहितीवरून एका महिला दारू विक्रेत्याच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये मोठ्याप्रमाणात देशी-विदेशी दारूचा साठा पोलिसांच्या हाती लागला. माया सुखद गेंडरे (57) असे अटकेतील महिलेचे नाव आहे. मंगळवारी दुपारी गुन्हे शाखेचे पथक कळमना पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान विजयनगर परिसरात राहणारी माया स्वतःच्या घरून अवैधरित्या दारूची विक्री करते. मंगळवारी देवउठनी एकादशी असल्यामुळे शहरात दारूविक्री बंद आहे. त्यामुळे मायाने मोठ्याप्रमाणात माल बोलावला असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून तिच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये 90 एमएलच्या 750 बॉटल देशी दारू, 180 एमएलच्या 96 बॉटल आणि 90 एमएलच्या 40 बॉटल विदेशी दारू मिळाली. पोलिसांनी सर्व माल जप्त करून मायाविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.

## स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानाअंतर्गत मनपाने जमा केला २८०२२ किलो कचरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

मनपा अंतर्गत 21 ते 31 ऑक्टोबर पर्यंत राबविण्यात आलेल्या स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी या अभियानाअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमापैकी एक उपक्रम म्हणजे दिवाळीनिमित्त घरोघरी होणाऱ्या साफसफाई मध्ये नागरिकांनी उपयोगात नसणाऱ्या पण पुनर्वापर होऊ शकेल अशा वस्तूंचे संकलन कचरा संकलन केंद्रात करून कचरा पुनर्वापर करण्यास मदत करण्याचे आवाहन केल्या गेले होते. या अभियानांतर्गत 21 हजार 732 कुटुंबाने यामध्ये सहभाग दर्शविला व या अंतर्गत दहाही झोन मिळून 818.5 किलो चा कागद, 925 किलोचा ई वेस्ट, 1348.1 किलोचे प्लास्टिक, 21,669.5 किलोचे कपडे व 2532.5 किलोच्या इतर वस्तू जमा करण्यात आल्या. असा एकूण 28,022 किलोचा पुनर्वापर करण्याजोगा कचरा मनपाद्वारे जमा करण्यात आला. या कामाची अंमलबजावणी करण्याचे काम तेथील बचत गटाच्या महिलांना सोपविण्यात आले आहे.

# ४.२७ लाखांत पडले देवदर्शन

**नागपूर :** कुटुंब देवदर्शनाला गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत 4.27 लाख रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना सोनेगाव पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आशिष आनंद महाजन (43) रा. सावित्री विहार, सोमलवाडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत शनिवारी महाजन कुटुंब घराला कुलूप लावून देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने मुख्य दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचे दागिने व रोख 70 हजार व 50 ऑस्ट्रेलियन डॉलर असा एकूण 4 लाख 27 हजार रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. रविवारी दुपारी महाजन कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

# आमला येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री मनीष अग्रवाल, आणि डॉ. जी. एस. मंजुनाथ, मुख्य वैद्यकीय अधीक्षक/नागपूर, नागपूर विभागीय रेल्वे रुग्णालय यांच्या मार्गदर्शनाखाली पधार रुग्णालय, पधार (जिल्हा बैतुल) यांच्या सहकार्याने आमला उपविभागीय रुग्णालय येथे १३ रोजी बहुउद्देशीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



नोव्हेंबर 2024आयोजित आवळा परिसरातील रेल्वे लाभार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर केवळ रेल्वे कर्मचाऱ्यांसाठीच नाही तर सेवानिवृत्त कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठीही आयोजित करण्यात आले होते. पधार रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक आणि मध्य रेल्वेचे वैद्यकीय कर्मचारी यांनी मिळून सर्व लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. सामान्य आरोग्य तपासणी, स्त्रीरोग, अस्थिव्यंग आणि दंततज्ञ सेवा आरोग्य तपासणी दरम्यान प्रदान केल्या गेल्या.

याव्यतिरिक्त, BMI, दृष्टी चाचणी, यादृच्छिक रक्त शर्करा, रक्तदाब निरीक्षण आणि इतर रक्त चाचण्या देखील आयोजित केल्या गेल्या. लाभार्थ्यांना औषधे देखील देण्यात आली आणि ज्यांना अधिक उपचारांची आवश्यकता असेल त्यांना नागपूर रेल्वे रुग्णालयात पाठविण्यात आले.

या शिबिरात डॉ. लवी आर्य - सीएमपी/एनजीपी, डॉ. थॉमस कुरियन भानू - ऑर्थोपेडिक सर्जन, डॉ. वांका रोधा अनुषा -स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. जिमी मॅथ्यूज-दंतवैद्य या आरोग्य अधिकारी यांनी सेवा दिली. या आरोग्य शिबिरास नागपूर विभागीय रेल्वे रुग्णालय व आमला उपविभागीय रुग्णालयातील पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. या शिबिरात एकूण 227 लाभार्थी उपस्थित होते, ज्यामध्ये 50 कर्मचारी आणि 177 कुटुंबीयांचा समावेश होता. या शिबिराला लाभार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि त्यांनी रेल्वे वैद्यकीय पथकाच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

हा उपक्रम मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य आणि कल्याणाप्रती असलेली सततची वचनबद्धता दर्शविते आणि आरोग्य सेवांच्या क्षेत्रात हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते.

# बसमधून महिलेचे दागिने लंपास

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १३ :

बसमधून प्रवासादरम्यान एका महिलेच्या बॅगमधून सोन्याचे दागिने असलेली पर्स अज्ञात आरोपी महिलेने लंपास केली. या प्रकरणी प्रतापनगर पोलिसांनी मंदा रमेश पिसाळकर (33) रा. दारव्हा रोड, यवतमाळच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

मंदा काही कामाने नागपूरला आल्या होत्या. मंगळवारी सकाळी यवतमाळला परत जाण्यासाठी त्या वर्धा मार्गावरील स्नेहनगर बस थांब्यावर आल्या. बसमध्ये चढत असताना गर्दीचा लाभ घेत अज्ञात महिला आरोपीने त्यांच्या बॅगची चेन उघडून त्यात ठेवलेली छोटी पर्स लंपास केली. पर्समध्ये मंगळसूत्र आणि चपलाकंठी हारसह 3 लाख 60 हजार रुपये किंमतीचे दागिने होते.

बसमध्ये बसल्यावर संशय आल्याने मंदा यांनी बॅग तपासली असता चेन उघडी होती आणि पर्स गायब होती. त्यांनी तत्काळ बसमधून उतरत प्रतापनगर पोलिस स्टेशन गाठले आणि तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# दिव्यांग मतदारांना विशेष सुविधा उपलब्ध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. संपूर्ण राज्यात निवडणुकीचे वातावरण बघायला मिळत आहे. एकीकडे राजकीय पक्ष जोरदार प्रचारात व्यस्त आहे तर दुसरीकडे मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्नरत आहे.



याशिवाय काही सुजाण नागरिकही मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देत आहे. नागपूरच्या अशाच एका ८० वर्षीय सुजाण ज्येष्ठ नागरिक यांनी दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे.

नागपूरचे रहिवासी प्रकाश रंगारी यांनी दिव्यांग मतदारांसाठी दोनप्रकारची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. साधारणतः दिव्यांग मतदारांना कारसारख्या चारचाकी वाहनातून मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यात येते. मात्र असे अनेक दिव्यांग मतदार असतात ज्यांना कारमध्ये प्रवास करताना अडचण येते, अशा दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअर सहायक कार उपलब्ध करून देण्याची घोषणा रंगारी यांनी केली आहे. सध्या प्रकाश रंगारी यांच्याकडे दोन दिव्यांग फ्रेंडली कार उपलब्ध आहेत.

निवडणुकीच्या दिवशी या दोन वाहनासह त्यांच्या मित्रमंडळीकडे असणाऱ्या इतर चार दिव्यांग फ्रेंडली वाहनांचा वापर केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. दुसरीकडे, असे अनेक मतदार आहेत जे पहिल्या किंवा त्याच्यावरील माळ्यावर राहतात. अशा दिव्यांग मतदारांना खाली उतरविण्यासाठी जिन्यावर लागणारी व्हीलचेअर देखील ते उपलब्ध करून देणार आहे. शहरातील सहाही मतदारसंघात ही सेवा मोफत उपलब्ध राहणार आहे.

या दोन्ही सेवेचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक दिव्यांग मतदारांनी संपर्क करण्याचे आवाहन प्रकाश रंगारी यांनी केले आहे. या सेवेचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांना आपले नाव, दिव्यांगत्वाचा प्रकार यासह संपूर्ण पत्ता आणि लोकेशन पाठवायचा आहे. यासाठी ९१६७२०८५७० या व्हाट्सॲप क्रमांकावर संपूर्ण माहिती पाठवायची आहे. मर्यादित संसाधनांमध्ये अधिकाधिक दिव्यांग मतदारांनी या सेवेचा लाभ घ्यावा.

यासाठी निवडणुकीच्या दोन दिवसांपूर्वी नाव नोंदविण्याची विनंती प्रकाश रंगारी यांनी केली आहे. उल्लेखनीय आहे की लोकसभा निवडणुकीच्या वेळीही रंगारी यांनी ही सुविधा उपलब्ध करून दिली होती. आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा ही सेवा उपलब्ध करून दिली जात आहे. मतदानाचा हक्क हा मौल्यवान आहे आणि यापासून कुणीही वंचित राहू नये या हेतूने कार्य करत असल्याचे रंगारी यांनी सांगितले.





# महासागर वृत्तपत्र समुहातर्फे दिवाळी मिलन कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

विदर्भातील बहुप्रसारित महासागर वृत्तपत्र समुहाच्या वतिने नागपूर कार्यालयातील कर्मचारी आणि कौटुंबिक सदस्यांसाठी दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. माहेश्वरी भवन, टेकडी रोड येथे बुधवारी दुपारी आयोजित या कार्यक्रमात संगीतमय खुर्ची आणि अन्य स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना महासागरचे संस्थापक संपादक श्रीकृष्ण चांडक यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला संपादक श्रीकृष्ण चांडक, निर्मला चांडक, संचालक राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, सरिता चांडक, ममता चांडक, सीईओ युएस लाल यांच्यासह वृत्तपत्राच्या विविध विभागातील कर्मचारी, चांडक कुटुंबातील सदस्य आणि स्नेही उपस्थित होते.

